सोलापूर
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | शनिवार, ७ सप्टेंबर २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ३९ वे अंक ३०८ | पाने १२ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com




# विदेशी गुंतवणुकीत महाराष्ट्र अव्वल

**• देशातील एकूण गुंतवणुकीच्या ५२ टक्के एकट्या महाराष्ट्रात • उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली माहिती**

**मुंबई, ६ सप्टेंबर**

२०२४-२०२५ या आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत सर्वाधिक म्हणजे देशातील एकूण गुंतवणुकीच्या ५२,४६ टक्के विदेशी गुंतवणूक एकट्या महाराष्ट्रात झाली आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज ट्विट करून ही माहिती दिली.




राज्यात येणारे उद्योग, प्रकल्प परराज्यात पळवले जात असल्याचा आरोप विरोधकांकडून केला जात असताना, महायुतीकडून राज्यात आतापर्यंत मोठ्या प्रमाणात विदेशी गुंतवणूक झाल्याची आकडेवारी प्रसिद्ध करीत फडणवीसांनी विरोधकांना सडेतोड उत्तर दिले.

देवेंद्र फडणवीस यांनी एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे, अतिशय आनंदाची बातमी! देशातील एकूण गुंतवणुकीच्या ५२.४६ टक्के विदेशी गुंतवणूक एकट्या महाराष्ट्रात झाली आहे. मागील दोन वर्षे सातत्याने विदेशी गुंतवणूक आकर्षित करण्यात क्रमांक १ वर असलेल्या आपल्या महाराष्ट्रात २०२४-२०२५ या आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत सुद्धा सर्वाधिक गुंतवणूक आली आहे. एप्रिल ते जून २०२४ या पहिल्या तिमाहीत एकूण ७० हजार ७९५ कोटी रुपयांची गुंतवणूक आली.

सर्व राज्यांमधील विदेशी गुंतवणुकीच्या बेरजेपेक्षाही अधिक गुंतवणूक एकट्या महाराष्ट्रात आली. थोडक्यात सांगायचे तर, या तिमाहीत देशात आलेली एकूण गुंतवणूक ही १ लाख ३४ हजार ९५९ कोटी रुपये इतकी असून, त्यापैकी ७० हजार ७९५ कोटी अर्थात् ५२.४६ टक्के गुंतवणूक एकट्या महाराष्ट्रात आली.

राज्यात २०१४ ते २०१९ या काळात सत्तेत असताना एकूण ३ लाख ६२ हजार १६१ कोटी रुपये विदेशी गुंतवणूक आली होती. अडीच वर्षांत आम्ही ५ वर्षांचे काम करून दाखवू, हे पहिल्याच दिवशी ठणकावून सांगितले होते. आता सव्वा दोन वर्षांत ३ लाख १४ हजार ३१८ कोटी रुपयांची गुंतवणूक आम्ही आणून दाखवली. *(तभा वृत्तसेवा)*




## आज श्रीगणेश चतुर्थी



प्रारंभी विनंती करूं गणपती विद्या-दया सागरा ।
अज्ञानत्व हरोनी बुद्धि मति दे आराध्य मोरेश्वरा ।
चिंता क्लेश दरिद्र दु:ख अवघे देशांतरा पाठवी ।
हेरंबा गणनायका गजमुखा भक्तां बहु तोषवी ॥

## ▶▶ महत्त्वाचे...

### पावसाच्या सरींनी होणार बाप्पांचे स्वागत

**पुणे** : मान्सून आता देशातून परतीच्या मार्गावर असतानाच पश्चिम मध्य आणि लगतच्या उत्तर-पश्चिम बंगालच्या उपसागरावर कमी दाबाचे क्षेत्र तयार झाले. त्यामुळे राज्यातील काही भागांत आणि अन्य काही राज्यांत आगामी दोन दिवस पाऊसधारा बरसणार आहेत. बंगालच्या उपसागरातील हा कमी दाबाचा पट्टा सध्या उत्तर बंगालच्या भागात आहे. हा पट्टा मैदानी प्रदेश, उत्तर ओडिशा आणि बांगलादेशच्या किनाऱ्याभोवती तीव्र दाबाच्या क्षेत्रात प्रभावी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पुढील दोन दिवस पावसाचे राहणार आहेत. हवामान खात्याच्या माहितीनुसार, गुजरात, महाराष्ट्र आणि पूर्व राजस्थानमध्ये ८ सप्टेंबरपर्यंत मुसळधार ते अति मुसळधार पाऊस पडू शकतो. ८ ते १० सप्टेंबर दरम्यान तेलंगणा, आंध्रप्रदेश, पूर्व आणि ईशान्य भारतातही मुसळधार पावसाची शक्यता आहे. ९ सप्टेंबरपर्यंत मध्य महाराष्ट्रातील घाट भागात, ७ ते ९ सप्टेंबर दरम्यान कोकण आणि गोव्यात अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे.

# कलम ३७० कधीच परत येणार नाही

## जम्मू-काश्मीरसाठी भाजपाचे संकल्पपत्र

**नवी दिल्ली, ६ सप्टेंबर**

जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणुकीसाठी भाजपाने शुक्रवारी पक्षाचे संकल्पपत्र प्रसिद्ध केले. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह म्हणाले की, मोदी सरकारने कलम ३७० कायम चे निष्प्रभ केले आहे. आता कुणी कितीही प्रयत्न केले तरी, ते कलम कधीच परत येणार नाही.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना दरवर्षी ३ हजार रुपये वाहतूक भत्ता देण्याची तसेच दहावीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना टॅबलेट आणि लॅपटॉप देण्याची ग्वाही अमित शाह यांनी दिली.



येथील युवकांना दरवर्षी पाच लाख नोकऱ्या दिल्या जातील. उज्ज्वला योजनेच्या लाभार्थ्यांना दरवर्षी दोन मोफत एलपीजी सिलेंडर दिले जातील. अटल आवास योजनेच्या माध्यमातून भूमिहीनांना जमीन मोफत दिली जाणार आहे. माँ सम्मान योजनेच्या माध्यमातून प्रत्येक कुटुंबातील ज्येष्ठ महिलेला दरमहा १८ हजार रुपयांची आर्थिक मदत, महिला बचत गटांच्या कर्जमाफीची घोषणा, प्रगती शिक्षा योजनेंतर्गत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना दरवर्षी तीन हजार रुपये वाहतूक भत्ता, प्रशासकीय परीक्षेच्या तयारीसाठी दोन वर्षांसाठी दहा हजार रुपये कोचिंग फीचे अर्थसहाय्य, श्रीनगरला जागतिक दर्जाचे पर्यटन स्थळ बनवले जाईल, आदींचा या संकल्पपत्रात समावेश आहे.

# कुस्तीपटू आता राजकीय आखाड्यात

## काँग्रेससोबत केली 'हात'मिळविणी

**वृत्तसंस्था,**
**नवी दिल्ली, ६ सप्टेंबर**

महिला कुस्तीपटू विनेश फोगाट आणि कुस्तीपटू बजरंग पुनिया यांनी आज काँग्रेसमध्ये प्रवेश केला. हरयाणा विधानसभा निवडणुकीत हे दोघे काँग्रेसचे उमेदवार राहण्याची शक्यता आहे.

काँग्रेस महासचिव के. सी. वेणुगोपाल यांच्या उपस्थितीत काँग्रेस मुख्यालयात आयोजित कार्यक्रमात विनेश फोगाट आणि बजरंग पुनिया यांनी पक्षप्रवेश केला. यावेळी काँग्रेस नेते पवन खेरा, हरयाणाचे प्रभारी दीपक बाबरिया आणि हरयाणा काँग्रेसचे अध्यक्ष उदयभान उपस्थित होते. तत्पूर्वी फोगाट आणि पुनिया यांनी आज सकाळी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली.





या भेटीनंतर खडगे यांनी समाजमाध्यमात एक छायाचित्र जारी करीत 'चक दे इंडिया, चक दे हरयाणा', असे म्हटले. तुम्हा दोघांचा आम्हाला अभिमान असल्याचेही ते म्हणाले. काँग्रेसमध्ये प्रवेश करण्यापूर्वी विनेश फोगाट यांनी रेल्वेतील आपल्या नोकरीचा राजीनामा दिला. अडचणीच्या वेळी काँग्रेस आमच्या पाठीशी उभी राहिल्याचा उल्लेख बजरंग पुनिया यांनी केला. आम्ही भाजपाच्या सर्व महिला खासदारांना पत्र पाठवले होते, पण कोणीही मदतीसाठी आले नाही, असे पुनिया म्हणाले. तुमच्यासोबत कोणीही नसेल तर, मी आणि काँग्रेस पक्ष तुमच्या पाठीशी राहू, असे विनेश फोगाट म्हणाल्या.



सोलापूर : शनिवारी श्री गणेशाचे धुमधडाक्यात आगमन होत असून शुक्रवारी सायंकाळी श्री गणेशाला भक्तीभावाने घरी नेताना सोलापुरातील एक कुटुंब.

# ८५ टक्के जिल्हे हवामानाच्या दृष्टीने अत्यंत धोकादायक

## नव्या अभ्यासातील निष्कर्ष

**नवी दिल्ली** : भारतातील ८५ टक्क्यांहून अधिक जिल्हे पूर, दुष्काळ आणि चक्रीवादळ यासारख्या हवामानाच्या दृष्टीने अतिशय धोकादायक गंभीर घटनांना सामोरे जातात, असे एका नवीन अभ्यासात दिसून आले आहे. आयपीई ग्लोबल आणि एसरी इंडियाच्या अभ्यासात असेही आढळून आले आहे की, ४५ टक्के जिल्ह्यांमध्ये स्वॅपिंग ट्रेंडचा अनुभव येत आहे, जेथे पारंपरिकपणे पूर-प्रवण अवर्षणप्रवण होत आहेत. शास्त्रीय विश्लेषणाचा वापर करून या अभ्यासात १९७३ ते २०२३ या ५० वर्षांच्या कालावधीत स्थानिक आणि ऐहिक मॉडेलिंगचा वापर करून अत्यंत प्रतिकूल हवामानातील घटनांची माहिती संकलित करण्यात आली. मागील दशकात या हवामानाच्या टोकाच्या घटनांमध्ये पाच पटीने वाढ झाली असून, विशेषत: पुराच्या घटनांमध्ये चार पट वाढ झाली आहे. पूर्व भारतातील जिल्ह्यांमध्ये पूर येण्याची अधिक शक्यता असते. त्यानंतर देशाच्या ईशान्य आणि दक्षिणेकडील भाग जवळून येतात. अभ्यासात असेही दिसून आले की, दुष्काळाच्या घटनांमध्ये दुप्पट वाढ झाली आहे, विशेषतः कृषी आणि हवामानशास्त्रीय दुष्काळ आणि चक्रीवादळ घटनांमध्ये चारपट वाढ झाली आहे. बिहार, आंध्रप्रदेश, ओडिशा, गुजरात, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, महाराष्ट्र, उत्तरप्रदेश आणि आसाममधील ६० टक्क्यांहून अधिक जिल्हे तीव्र हवामानाच्या घटनांचा सामना करीत आहेत.









सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# पंढरपूर, मंगळवेढ्यासाठी प्रत्येकी ५ कोटी निधी

**आ. समाधान आवताडे : वैशिष्ट्यपूर्ण योजनेतून राजमाता अहिल्यादेवीसाठी २५ लाख, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे स्मारकासाठी १५ लाख**



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ६ सप्टेंबर-**

पंढरपूर आणि मंगळवेढा शहरातील विविध विकास कामांसाठी राज्य शासनाच्या वैशिष्ट्यपूर्ण योजनेतून प्रत्येकी ५ असे एकूण १० कोटी रुपये मंजूर झाले आहेत. यामध्ये पंढरपूर शहरातील राजमाता अहिल्यादेवी होळकर २५, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकासाठी १५ लाख रुपये शिवाय मंगळवेढा शहरातील ४० तर पंढरपूर शहरातील ४७ कामांसाठी हा निधी मंजूर असल्याची माहिती आ. समाधान आवताडे यांनी दिली.

आ. आवताडे म्हणाले की, राज्य शासनाच्या नगरविकास विभागातील वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत पंढरपूर नगरपरिषदेच्या हद्दीतील विकास कामांसाठी ५ कोटी आणि मंगळवेढा नगरपरिषदेच्या हद्दीतील विकास कामासाठी ५ कोटी असे एकूण १० कोटी रुपये मंजूर झाल्याचा आदेश ३ सप्टेंबर रोजी निघाला आहे. या निधीतून पंढरपूर शहरातील राजमाता अहिल्यादेवी होळकर स्मारकातील सुधारणांसाठी २५ लाख रुपये, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे स्मारकाच्या कामासाठी १५ लाख रुपये, लिंगायत स्मशानभूमी सुधारणा साठी १५ लाख रुपये, हजरत बाराईमाम दर्ग्यातील कामांसाठी १० लाख रुपये, जिजाऊ नगर, एकता नगर, मंगळवेढा नगर,इसबावी येथील शिक्षक सोसायटी, चंद्रमा रेसिडेन्सी, बालाजी नगर,रुक्मिणी नगर, पदमशाली धर्मशाळा येथील खुल्या जागा विकसित करणे, याशिवाय २७ रस्त्यांचे सिमेंट काँक्रीटीकरणसाठी प्रत्येकी १० लाख रुपये, जुनी वडार गल्ली येथे सभापंडप,पद्मावती झोपडपट्टी,अण्णाभाऊ साठेनगर, विश्वेश्वर नगर, नवीन कोर्टाजवळ ख्रिस्ती कॉलनी, भगवान नगर, परदेशी नगर येथे सभामंडप बांधण्यासाठी प्रत्येकी १० लाख रुपये,मटण मार्केट येथे फुटपाथ करणे अशा कामासाठी एकूण ५ कोटी रुपयांचा निधी मंजूर आहे.

> साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकाचे काम पंढरपूरमध्ये सुरू आहे. आ. समाधान आवताडे यांच्या माध्यमातून या स्मारकासाठी वैशिष्टयपूर्ण योजनेतून १५ लाख रुपयांचा निधी मिळाला आहे. यामुळे आता या निधीतून अण्णाभाऊंच्या स्म ारकाचे काम गतीने पूर्ण होईल. गेल्या अनेक वर्षांपासून पंढरपूर येथील अण्णाभाऊंच्या स्मारकाचे काम प्रलंबित होते, ते पूर्ण होईल. **- अमित दुर्योधन अवघडे,**
> संस्थापक अध्यक्ष, साहित्यरत्न प्रतिष्ठान

आ. अवताडे म्हणाले कि, पंढरपूर शहराबरोबर मंगळवेढा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा समोर हायमास्ट बसवणे, लतिफ़बाबा दर्गाह जवळ शादी खाना बांधकामासाठी ५० लाख रुपये, दर्गा परिसरात संरक्षित भिंत बांधणे,कृष्णानगर, संभाजी नगर, गोवे प्लॉट, दामाजी हौसिंग सोसायटी येथे पथदिवे, विजेचे खांब बसवणे, दत्तू गल्ली, खंडोबा गल्ली, पटेल घर, नागणे गल्ली, मुढे गल्ली, मोहिनी बुवा मंदिर, बुरुड गल्ली, आठवडा बाजार, रोहिदास चौक, माने गल्ली, बोराळे नाका चौक, शिवाजी तालीम, मेटकरी गल्ली, मंगळवेढा न्यायालय ते उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, कारखाना चौक ते बठाण रोड, खंडोबा गल्ली, माळी गल्ली, सराफ गल्ली, कोंडुभैरी गल्ली अशा भागातील रस्ते काँक्रीटीकरण, भूमिगत ड्रेनेज, नगरपालिका सभामंडप बांधणे, पत्राशेड बांधणे, नाणे वाडी येथे सभामंडप बांधणे, संरक्षक भिंत बांधणे पथदिवे बसवणे अशा विविध कामांसाठी ५ कोटी रुपये निधी मंजूर झालेला आहे. राज्य शासनाच्या वैशिट्यपूर्ण योजनेतून दोन्ही शहरांसाठी हा १० कोटी रुपये निधी मंजूर केलेला आहे. यामुळे दोन्ही शहरातील नारिकाना या निधीतून मूलभूत सुविधा मिळतील असा दावा आ. समाधान आवताडे यांनी केला आहे.

## संक्षिप्त वृत्त



### संदेश घाडगे यांचा राष्ट्रशिल्पकार पुरस्काराने सन्मान

**बार्शी दि. ६ सप्टेंबर-**

५ सप्टेंबर शिक्षक दिनानिमित्त भारत विकास परिषद पश्चिम महाराष्ट्र प्रांत शाखा बार्शी यांच्यावतीने संदेश घाडगे (सहशिक्षक शाह कन्या प्रशाला) यांचा प्रविण घुगे, प्रदेश सचिव भारतीय जनता पक्ष यांच्या हस्ते राष्ट्रशिल्पकार पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला कार्यक्रमासाठी प्रशासनाधिकारी अनिल बनसोडे, रोटरी क्लब अध्यक्ष अतुल कल्याणी, भारत विकास परिषद बार्शी अध्यक्ष संतोष जोशी व सर्व पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमात १८ शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. हा कार्यक्रम मातृमंदीर ढगे मळा बार्शी या ठिकाणी संपन्न झाला. या कार्यक्रमास सर्व गणित मंडळ पदाधिकारी मित्र परिवार व सर्व सहकारी शिक्षक मित्र मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### मोडनिंब येथे शिक्षक दिन उत्साहात

**मोडनिंब, दि. ६ सप्टेंबर-**

मोडनिंब (ता.माढा) येथील श्री उमा विद्यालयात शिक्षक दिन साजरा करण्यात आला. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कै. म. बा. कांबळे यांच्या पुण्य स्मरणदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. वडिलांच्या स्मृती प्रित्यर्थ कांबळे परिवाराकडून श्री उमा विद्यालयास १९ हजार रुपये किमतीचे वायरलेस ध्वनिक्षेपक भेट देण्यात आले. विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात यशस्वी होण्यासाठी अष्टपैलू असणे गरजेचे असल्याचे अभिनेते संतोष कासे यांनी सांगितले. अभियंता मच्छिंद्र सोनवणे, रत्नदीप बारबोले, मारुती वाघ यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक शिवाजी लोखंडे यांनी केले. सूत्रसंचालन विद्यार्थीनी सृष्टी मोरे, सिद्धी महाडिक यांनी केले. तर आभार पाटील यांनी मानले. यावेळी अभिनेते संतोष कासे, संस्थेचे अध्यक्ष व्ही. के. पाटील, चित्रकार रत्नदीप बारबोले, विश्वस्त आर. बी. पाटील, राजेश पाटील, एपिआय सोलापूर शिवाजी कासे, अभियंता मच्छिन्द्र सोनवणे, प्रशांत कांबळे, मुख्याध्यापक आर. व्ही. पाटोळे उपस्थित होते.



### सह्याद्री फार्मसीमध्ये शिक्षक दिन उत्साहात साजरा

**सांगोला, दि. ६ सप्टेंबर-**

मेथवडे येथील सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसी येथे शिक्षक दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी संस्थापक अध्यक्ष डॉ.दिलीपकुमार इंगवले, प्राचार्य डॉ. मनोजकुमार पाटील यांच्या हस्ते सरस्वती माता व माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. विद्यार्थिनी स्नेहल आवताडे, भारती मोटे यांनी यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेगवेगळे टास्क देऊन मनोरंजनात्म क खेळ खेळण्यात आले. सूत्रसंचालन रोहन माने, ओंकार हतिगोटे, अस्मिता बिले यांनी तर आभार स्वप्नील गायकवाड यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सांस्कृतिक विभागाचे प्रा. डी. एम. झाडबुके, प्रा. अदिती पवार व विद्यार्थ्यांचे योगदान लाभले.



### बिराप्पा पुकळे यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार

**सांगोला, दि.६ सप्टेंबर-**

सांगोला तालुक्यातील घेरडी गावचे सुपुत्र हवालदार बिराप्पा तानाजी पुकळे यांनी भारतीय सेनेमध्ये २२ वर्षे सेवा पूर्ण झाल्यानंतर सेवा निवृत्तीनिमित्त ग्रामस्थ, पुकळे परिवार आणि माजी सैनिकांच्या वतीने नागरी सत्कार करण्यात आला. बिराप्पा पुकळे यांनी भारतातील वेगवेगळ्या ठिकाणी सेवा केली. सदर सत्कार समारंभामध्ये पुकळे परिवाराच्यावतीने सर्व माजी सैनिकांचा यथोचित सत्कार करण्यात आला. याप्रसंगी कीर्तनही आयोजित करण्यात आले होते.

### कट्ट्यावरून दारूच्या नशेत पडल्याने वृद्ध जखमी

**सोलापूर, दि. ६ सप्टेंबर-**

घरी कट्ट्यावरून दारूच्या नशेत खाली पडल्याने चेहऱ्यास व डोळ्यास मार लागून जखमी झाल्याची घटना ५ सप्टेंबर रोजी घडली. यात करबसप्पा इराण्णा मुनोळी (वय ६९, रा. अक्कलकोट) हे जखमी झाले. उपचारासाठी सिव्हिलमध्ये मुलगा विजय मुनोळी यांनी दाखल केले.

### शेतात काम करताना महिलेस सर्पदंश

**सोलापूर, दि. ६ सप्टेंबर-**

शेतात काम करताना डाव्या पायास सर्पदंश झाल्याची घटना ५ सप्टेंबर रोजी चार वाजण्याच्या सुमारास घडली. यात उज्वला संभाजी कारंडे (वय ३३ रा. तिसंगी, तालुका पंढरपूर) ही महिला जखमी झाली. पंढरपूर येथे उपचार करून पुढील उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटल येथे भाऊ आकाश जानकर यांनी दाखल केले.

## लोटेवाडीच्या सरपंचपदी हिराबाई सरगर

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.६ सप्टेंबर-**



लोटेवाडी ता.सांगोला या ग्रामपंचायतीचे सरपंच नामदेव लवटे यांनी राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेवर निवडणूक घेण्यात आली. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून प्रशांत जाधव तर सहा. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून समाधान आदाटे यांनी काम पाहिले.सरपंच पदासाठी आ.शहाजीबापू पाटील गटाच्या हिराबाई बजरंग सरगर यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड करण्यात आली. सरगर यांची निवड होताच कार्यकर्त्यांनी गुलालाची उधळण करीत जल्लोष साजरा केला.

यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख दादासाहेब लवटे, माजी पं. स.सदस्या रूपाली लवटे,माजी सरपंच विजय खांडेकर, उपसरपंच शांताबाई चव्हाण, सदस्य नामदेव लवटे, नकुसा लवटे, दीपाली लवटे, सत्यवान देशमुख, सूत गिरणीचे संचालक सागर लवटे, पंडित देशमुख, प्रा.बाळासाहेब सरगर, बाळासाहेब लवटे, राजेंद्र हजारे, आप्पासाहेब सरगर, नानासाहेब ढेरे, सुभान लवटे, नवनाथ पाटील, विलास विभुते, बाळू विभुते, संजय लवटे, बिरुदेव सरगर, तानाजी मोटे, शहाजी देशमुख, दिलीप लवटे, प्रसाद लवटे, काकासाहेब देशमुख, श्रीरंग लवटे, बजरंग लवटे, विकास तोरणे, दगडू लवटे, रामभाऊ सरगर, शंकर जावीर, विलास काळेबाग, मेजर धनाजी शेंबडे उपस्थित होते. निवडीप्रसंगी पोलीस हवालदार असलम काझी व पोलीस कॉन्स्टेबल अतुल करांडे यांनी बंदोबस्त ठेवला होता.

## संघटनात्मक कामामध्ये कमतरता येऊ नये

**महिला व बाल कल्याण मंत्री अदिती तटकरे : पंढरपुरात आदर्श माता, कर्तृत्वान महिलांचा सन्मान**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ६ सप्टेंबर-**

महायुती म्हणूनच आपणाला निवडणूकीला सामोरे जायचे आहे असे असले तरी संघटनात्म क कामांमध्ये कुठेही कमतरता येऊ नये हे उद्दिष्ट ठेवून काम करत आहात हे कौतुकास्पद आहे. ज्यांच्या नावाने आपण पुरस्कार ठेवलेला आहे. त्यांनी सामाजिक कार्यामध्ये १९५० ते १९७० च्या दशकापर्यंत उल्लेखनीय कार्य आहे. त्या शरद पवार यांच्या मातोश्री शारदाई व अजितदादांच्या आजी ज्यांनी सरपंच तसेच वेगवेगळ्या पदांवर काम केले. अगदी एसटीने प्रवास करून त्या आपले काम व आपली जबाबदारी पार पाडत होत्या. आज महिलांना ५० टक्के आरक्षण आहे. पण त्या काळात महिलांना कोणतेही आरक्षण नसताना सरपंच म्हणून त्या काम करीत होत्या. आपल्या सर्वांसाठी खरोखरच त्या प्रेरणादायी आहेत, असे प्रतिपादन राज्याचे महिला व बाल कल्याण मंत्री अदिती तटकरे यांनी केले.

पंढरपूर येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त आदर्श माता व कर्तृत्ववान महिलांचा सन्मान मातोश्री शारदाई पुरस्कार २०२४ व गरजू शालेय मुलींना सायकल वाटप करण्यात आले, यावेळी त्या बोलत होत्या. हा कार्यक्रम राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस श्रीकांत शिंदे यांनी आयोजित केला होता.

यावेळी राष्ट्रवादीचे युवक प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण, प्रशांत कदम, प्रवक्ते उमेश पाटील, समाधान काळे, अरुण कोळी, अनिल अभंगराव, गणेश अधटराव, वर्षा शिंदे, उज्ज्वला पाटील, माजी नगरसेवक मोहमद उस्ताद, महेश कुलकर्णी, अभिषेक आव्हाड, अक्षय भांड, हरिदास रणदिवे, सायरा शेख, संगीता जोगधनकर, चित्रा कदम, किरण माशालकर, साधना राऊत, अमोल परबतराव, सूरज पेंडाल, सुदर्शन कादे, प्रदीप तांडेल, दत्तात्रय कांबळे व विजय अभंगराव उपस्थित होते. श्रीकांत शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले.

### यांचा झाला पुरस्काराने गौरव

यावर्षीचे शारदाई आदर्श माता पुरस्कार श्रीमती मंगलताई भीमराव महाडिक (खा. धनंजय महाडिक मातोश्री), मालनबाई वसंतराव काळे (चेअरमन कल्याणराव काळे यांच्या मातोश्री), शोभाताई शिवाजीराव काळुंगे (मुख्य कार्यकारी अधिकारी राजलक्ष्मी गायकवाड यांच्या म ातोश्री), सुशीलाताई हरिभाऊ अक्कलकोटे (बार्शीचे नगरसेवक नागेगश अक्कलकोटे यांच्या म ातोश्री), मुमताज रशीद शेख (महाराष्ट्र केसरी पै.सिकंदर शेख यांच्या मातोश्री), ललिता लक्ष्मण चव्हाण (आयएएस राहुल चव्हाण यांच्या मातोश्री), सुलोचना मल्हारी मोकाशी (प्रसिध्द बांधकाम व्यावसायिक चंद्रशेखर मोकाशी यांच्या मातोश्री) यांना प्रदान करण्यात आले.



## हत्तीकणबसच्या शंकरलिंग प्रशालेत १८ विद्यार्थिनींना सायकल वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ सप्टेंबर-**

हत्तीकणबस (ता. अक्कलकोट) येथील श्री. शंकरलिंग प्रशालेत शक्षकदिनाचे औचित्य साधून महिला व बालकल्याण विभागातर्फे निमगाव, चिक्केहळ्ळी व गौडगाव खुर्द येथून प्रशालेत येणाऱ्या विद्यार्थिनींसाठी १८ मोफत सायकल वाटप करण्यात आले.

अध्यक्षस्थानी संस्थापक अध्यक्ष शरणप्पा पाटील होते. यावेळी सरपंच श्रीशैल माळी, चिक्कीहळेचे सरपंच महिबूब बिराजदार, निम गावचे सरपंच महमद हनिफ पठाण, ग्रामविस्तार अधिकारी बजारी, शिवलिंग गायकवाड, पालक उपस्थित होते. मुख्याध्यापक श्रीशैल पाटील यांनी शाळेच्या उज्वल यश व शाळेमध्ये राबविले जाणाऱ्या विविध उपक्रमाबद्दलची माहिती दिली. महमदहनिफ पठाण यांनी विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या विविध योजनेचे लाभ घेऊन यश संपादन करण्याचे अवाहन केले. संस्थापक पाटील यांनी संस्थेची स्थापना ही गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाचे लाभ मिळविण्यासाठी केलेली असून, त्याचा जास्तीत जास्त फायदा परिसरातील विद्यार्थ्यांनी घ्यावा, असे अवाहन केले. यावेळी शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन शेख व शिंगे यांनी केले, आभार शेटे यांनी मानले. कार्यक्रमासाठी बिराडे, शिवगुंडे, क्षीरसागर, बिराजदार, जोगदे यांनी परिश्रम घेतले.

## सांगोल्यात महिलांसाठी भजन स्पर्धेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ६ सप्टेंबर-**

गणेशोत्सव व संत गजानन महाराज पुण्यस्मरण दिनानिमित्त शिवसेनेच्या वतीने आ. शहाजीबापू पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सांगोला विधानसभा मतदारसंघातील महिलांसाठी ९ सप्टेंबर रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सभागृह, सांगोला या ठिकाणी भजन स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

सहभागधारक प्रत्येक महिला भजनी मंडळास प्रोत्साहन बक्षीस देण्यात येणार आहे. भजन स्पर्धेसाठी ७ सप्टेंबरपूर्वी नाव नोंदणी करणे आवश्यक आहे अशी माहिती स्पर्धेचे संयोजक शिवसेना सांगोला शहर उपप्रमुख सोमेश यावलकर यांनी दिली. स्पर्धेत प्रथम बक्षीस २१ हजार, द्वितीय बक्षीस १५ हजार, तृतीय बक्षीस ११ हजार रुपये देण्यात येणार आहे. शहरातील प्रत्येक सहभागधारक महिला भजनी मंडळास १५०० रुपयांचे तर ग्रामीण महिला भजनी मंडळास २५०० रुपयांचे प्रोत्साहन बक्षीस देण्यात येणार आहे. स्पर्धेला नियम व अटी असतील. इच्छुक महिला भजनी मंडळांनी नाव नोंदणीसाठी ९८८१५१७०९३, ९८२३८१७४९४ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन सोमेश यावलकर यांनी केले आहे.

## गणेशोत्सव आनंददायी साजरा करू या



श्रीगणेशाच्या आगमनाची आतुरता लहानथोर अशा सर्वानाच लागलेली असते. सर्वत्र उत्साहित करणारे मंगलमय वातावरण श्रींच्या आगमनाची चाहूल लावणारे असते.अशा या उत्सवाची प्रारंभकथा सर्वश्रुत आहे. लोकमान्य टिळकांनी ज्यावेळी या दोन्ही उत्सवांची सुरुवात केली तेव्हा त्या मागचा उद्देश अतिशय स्पष्ट, प्रामाणिक आणि शुद्ध होता. देशभक्तीची भावना ज्यांच्या ठायी ओसंडून वाहत होती, अशा टिळकांनी देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अनेक मार्ग चोखाळले.त्या पैकीच एक म्हणजे समाज जागृती व्हावी ,देशभक्तीची भावना वाढीस लागून लोकांमध्ये ब्रिटिश सत्तेविरुद्ध नाराजी निर्माण करून स्वातंत्र्याचे बीज रुजवण्यासाठी, समाज प्रबोधनासाठी निर्माण केलेला हा गणेशोत्सव सण आहे.

ज्यावेळी या गणेशोत्सवाची सुरुवात केली गेली, त्यावेळी प्रबोधन करणे हाच उद्देश असलेल्या या उत्सवात कालानुरूप बदल होणे आवश्यक होते. लोक जागृतीसाठी संघटित होणे एकत्रित येणे ही त्या काळाची गरज होती आजच्या काळाची गरज काही वेगळी आहे प्रबोधन हाच उद्देश या उत्सवाचा कायम ठेवला तर आजच्या काळाला अनुसरून ज्या गोष्टींसाठी प्रबोधन होणे गरजेचे आहे ते या उत्सवाद्वारे व्हावे हेच अपेक्षित असताना प्रत्यक्षात मात्र काही वेगळेच घडताना दिसून येते. परंतु आज या उत्सवांचे स्वरूप अतिशय चिंताजनक बनत चाललेले आहे.मोठमोठ्या ध्वनी क्षेपकांचा वापर,त्यातून होणारे ध्वनी प्रदुषण, मोठमोठ्या श्रींच्या मुर्त्यांचे समुद्रात विसर्जन आणि त्यातून होणारे जप्रदुषण, पट्टीच्या नावाखाली कितीतरी रुपयांची उलाढाल होणे व त्याचा विनियोग अयोग्य, अविधायक गोष्टीसाठी केला जाणे हे सामाजिक अहिताला दर्शविणारे आहे. संस्कारक्षम समाजाच्या मुळावर केलेला हा आघात पुढील पिढ्यांना हिंसक अन् व्यभिचारी बनविण्यास कारणीभूत ठरता कामा नये. कोणत्याही राजकीय गटाच्या अधीन न जाता उत्सवांच्या साजरीकरणाचे शास्त्र शुद्ध दृष्टीने खरे गमक समजून घेवून भावी विकासाकडे वाटचाल करीत आनंददायी उत्सवांना साजरे करू या.

**- उज्वला शिंदे, सोलापूर.**

**दि लक्ष्मी को-ऑप.बँक लि., सोलापूर (अवसायनात)**
मुख्य कार्यालय - ३९९ दक्षिण कराया सोलापूर नमुना डोड (नियम १०७ पोट नियम ११ ड (१)
**स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्याबाबतची नोटीस**

**जावक नंबर २** **दिनांक : २१/०८/२०२४**

ज्याअर्थी वसुली अधिकारी सोलापूर द्वारा दि लक्ष्मी को ऑप बँक लि., सोलापूर अवसायनात मुख्य कार्यालय ३१९, दक्षिण कसबा, सोलापूर महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६९ अन्वये खालील नमूद केलेल्या ऋणकोस नमूद दिनांकास नमूद केलेल्या रकमेची मागणी नोटीस व जप्नी नोटीस पाठवली आहे सदर कर्जदार व जामीनदार याचे खालील निर्दिष्ट केलेल्या मालमतेचा वसुली अधिकारी सोलापूर द्वारा दि लक्ष्मी को ऑप बँक लि, सोलापूर अवसायनात ३१९, दक्षिण कसबा सोलापूर महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९९१ मधील नियम पोट नियम ११ ड (१) अन्वये दिलेल्या आधिकारानुसार नमूद केलेल्या दिनांकास ताबा घेतला आहे. ऋणको व सर्व नागरिकांना याद्वारे सावध करण्यात येत आहे कि खालील नमूद केलेल्या मालमनेसंबंधी कोणताही व्यवहार करू नये आणि केल्याम दि लक्ष्मी को ऑप बँक लि., सोलापूर अवसायनात मुख्य कार्यालय ३१९, दक्षिण कसबा, सोलापूर याचे सर्व प्रकारच्या देणी देण्यास आधीन राहावे लागेल.

| | |
|---|---|
| थकीत कर्जदार व जमीनदार नाव व पत्ता | **कर्जदार १ : सविता राजू चव्हाण** राहणार : १३० अ नेहरू नगर, विजापूर रोड, सोलापूर **जमीनदार १ : राजू नोमसिंग चव्हाण** राहणार : १३० अ, नेहरू नगर, विजापूर रोड, सोलापूर **जमीनदार २ : रामा बदु पवार** राहणार : १३० ब, नेहरू नगर, विजापूर रोड, सोलापूर |
| मागणी नोटीस दिनांक | २०/०४/२००९ |
| जप्ती नोटीस दिनांक | ०९/०८/२०२४ |
| स्थावर ताबा घेतल्याचा दिनांक | २९/०८/२०२४ (प्रतिकात्मक ताबा) |
| येणेबाकी दिनांक ०९/०८/२०२४ व त्यापुढील व्याज व इतर खर्च | ४,८९,८४२/- |
| स्थावर मिळकतीचा तपशील | जिल्हा व उपजिल्हा सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर, सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीतील नेहरू नगर येथील सि.स.न. ५१५/अ/२ प्लॉ नं. १३०/२ यासी क्षेत्रफळ ५५.७६ चौ.मी. **(मिळकतदार - रामा बदु पवार)** |
| मिळकतीच्या चतुःसिमा | १. पूर्वेस : रस्ता , २. दक्षिणेस : प्लॉट नं. १३०/३ ३. पश्चिमेस : रस्ता, ४. उत्तरेस : प्लॉट नं. १३०/१ |

वरील सर्व कर्जदारांना त्यांच्या जप्त केलेल्या स्थावर मालमत्ता ताबा घेणेसाठी नोटीसा बजावलेल्या होत्या व सदर नोटीसीमध्ये असे नमूद केलेले होते की, ज्याच्या मालकीच्या स्थावर मालमत्ता आहेत व ज्या मालमत्ताच्या उताऱ्यावर बँकेच्या बोजाची नोंद आहे अशा सर्व थकबाकीदार कर्जदारांनी सदर मालमत्तेचा ताबा बँकेचे वसुली अधिकारी यांना लेखी स्वरुपात द्यावा. अशी लेखी नोटीस सर्व कर्जदारांना बजावलेली होती परंतु बऱ्याच कर्जदारांनी ताबा पत्रकावर सह्या करून देण्याचे नाकारलेले आहे. सबब सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, त्यांना त्याच्या स्थावर मिळकतीचा कागदोपत्री ताबा ताबापत्रावर सही करून (दोन प्रतीत) दि लक्ष्मी को-ऑप बँक लि, सोलापूर अवसायनात येथे बँकेत दि. ०९/०९/२०२४ च्या रोजीच्या आत योग्य ती पोहच घेऊन सादर करावा जो कर्जदार ताबा पत्रावर सही करून देणार नाहीत अशा मालमत्तेचा ताबा घेण्यासाठी प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी सोलापूर यांचे कार्यालयास सादर केला जाईल व नियमातील तरतुदीनुसार मा.जिल्हाधिकारी सोलापूर यांचे मार्फत सदर मालमत्तेचा ताबा घेण्याची कायदेशीर प्रक्रिया पार पाडली जाईल त्यानंतर सदर मालमत्तेचे मूल्यांकन करून जाहीर लिलावाने विक्री करण्यात येईल, होणाऱ्या सर्व परिणामास संबंधित कर्जदार व त्याचे जमीनदार व्यक्तीशः जबाबदार राहतील यांची संबंधितांनी नोंद घ्यावी. उक्त निर्दिष्ट स्थावर मालमत्तेची प्रतिकात्मक ताबा नोटीस माझे सही व कार्यालयीन मुद्रेसह दिली असे.

**स्थळ : सोलापूर**
**दिनांक : २९/०८/२०२४**

**सही/-**
**विशेष वसुली अधिकारी**
महाराष्ट्र सहा.संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये द्वारा
दि.लक्ष्मी को-ऑप बँक लि., सोलापूर (अवसायनात)

**दि लक्ष्मी को-ऑप.बँक लि., सोलापूर (अवसायनात)**
मुख्य कार्यालय - ३९९ दक्षिण कराया सोलापूर नमुना डोड (नियम १०७ पोट नियम ११ ड (१)
**स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्याबाबतची नोटीस**

**जावक नंबर** **दिनांक : ३०/०८/२०२४**

ज्याअर्थी वसुली अधिकारी सोलापूर द्वारा दि लक्ष्मी को ऑप बँक लि., सोलापूर अवसायनात मुख्य कार्यालय ३१९, दक्षिण कसबा, सोलापूर महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६९ अन्वये खालील नमूद केलेल्या ऋणकोस नमूद दिनांकास नमूद केलेल्या रकमेची मागणी नोटीस व जप्नी नोटीस पाठवली आहे सदर कर्जदार व जामीनदार याचे खालील निर्दिष्ट केलेल्या मालमतेचा वसुली अधिकारी सोलापूर द्वारा दि लक्ष्मी को ऑप बँक लि, सोलापूर अवसायनात ३१९, दक्षिण कसबा सोलापूर महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९९१ मधील नियम पोट नियम ११ ड (१) अन्वये दिलेल्या आधिकारानुसार नमूद केलेल्या दिनांकास ताबा घेतला आहे. ऋणको व सर्व नागरिकांना याद्वारे सावध करण्यात येत आहे कि खालील नमूद केलेल्या मालमनेसंबंधी कोणताही व्यवहार करू नये आणि केल्याम दि लक्ष्मी को ऑप बँक लि., सोलापूर अवसायनात मुख्य कार्यालय ३१९, दक्षिण कसबा, सोलापूर याचे सर्व प्रकारच्या देणी देण्यास आधीन राहावे लागेल.

| | |
|---|---|
| थकीत कर्जदार व जमीनदार नाव व पत्ता | **कर्जदार १ : चिदानंद रेवणसिध्द सुंटे** राहणार : १९ब, निरपाम सोसायटी, विजापूर रोड, सोलापूर **जमीनदार १ : रविकिरण शिवाजी कोळी** रा. : सिध्दीविनायक प्राथमिक शाळा, मुळेगाव रोड, नरसिंग, सोलापूर **जमीनदार २ : प्रविण शिवप्पा हत्ती** राहणार : औद्योगिक न्यायालय, रंगभवनजवळ, सोलापूर **जामीनदार ३ : काकासाहेब लक्ष्मण झोंबाडे** राहणार : १९ब, गणेश नगर, विजापूर रोड, सोलापूर |
| मागणी नोटीस दिनांक | ३०/०८/२०२१ |
| जप्ती नोटीस दिनांक | ०९/०८/२०२४ |
| स्थावर ताबा घेतल्याचा दिनांक | ३०/०८/२०२४ **(प्रतिकात्मक ताबा)** |
| येणेबाकी दिनांक ०९/०८/२०२४ व त्यापुढील व्याज व इतर खर्च | ३,७०,११८/- |
| स्थावर मिळकतीचा तपशील | जिल्हा व उपजिल्हा सोलापूर, तालुका दक्षिण सोलापूर, मंद्रुप येथील गट नं. ७३५/२अ क्षेत्रफळ ०२.३० हे.आर. **(मिळकतदार - चिदानंद रेवणसिध्द सुंटे यांचे हिस्स्यापूर्ती)** |
| मिळकतीच्या चतुःसिमा | १. पूर्वेस : रस्ता , २. दक्षिणेस : गट नं. ७३६ ३. पश्चिमेस : रस्ता, ४. उत्तरेस : गट नं. ७३४ |

वरील सर्व कर्जदारांना त्यांच्या जप्त केलेल्या स्थावर मालमत्ता ताबा घेणेसाठी नोटीसा बजावलेल्या होत्या व सदर नोटीसीमध्ये असे नमूद केलेले होते की, ज्याच्या मालकीच्या स्थावर मालमत्ता आहेत व ज्या मालमत्ताच्या उताऱ्यावर बँकेच्या बोजाची नोंद आहे अशा सर्व थकबाकीदार कर्जदारांनी सदर मालमत्तेचा ताबा बँकेचे वसुली अधिकारी यांना लेखी स्वरुपात द्यावा. अशी लेखी नोटीस सर्व कर्जदारांना बजावलेली होती परंतु बऱ्याच कर्जदारांनी ताबा पत्रकावर सह्या करून देण्याचे नाकारलेले आहे. सबब सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, त्यांना त्याच्या स्थावर मिळकतीचा कागदोपत्री ताबा ताबापत्रावर सही करून (दोन प्रतीत) दि लक्ष्मी को-ऑप बँक लि, सोलापूर अवसायनात येथे बँकेत दि. १०/०९/२०२४ च्या रोजीच्या आत योग्य ती पोहच घेऊन सादर करावा जो कर्जदार ताबा पत्रावर सही करून देणार नाहीत अशा मालमत्तेचा ताबा घेण्यासाठी प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी सोलापूर यांचे कार्यालयास सादर केला जाईल व नियमातील तरतुदीनुसार मा.जिल्हाधिकारी सोलापूर यांचे मार्फत सदर मालमत्तेचा ताबा घेण्याची कायदेशीर प्रक्रिया पार पाडली जाईल त्यानंतर सदर मालमत्तेचे मूल्यांकन करून जाहीर लिलावाने विक्री करण्यात येईल, होणाऱ्या सर्व परिणामास संबंधित कर्जदार व त्याचे जमीनदार व्यक्तीशः जबाबदार राहतील यांची संबंधितांनी नोंद घ्यावी. उक्त निर्दिष्ट स्थावर मालमत्तेची प्रतिकात्मक ताबा नोटीस माझे सही व कार्यालयीन मुद्रेसह दिली असे.

**स्थळ : सोलापूर**
**दिनांक : ३०/०८/२०२४**

**सही/-**
**विशेष वसुली अधिकारी**
महाराष्ट्र सहा.संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये द्वारा
दि.लक्ष्मी को-ऑप बँक लि., सोलापूर (अवसायनात)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## संक्षिप्त वृत्त



### पाकणी गावभेट दौऱ्यात महादेव कोगनुरेंनी केली नादुरुस्त ओढ्याची पाहणी

**मंद्रुप, दि. ६ सप्टेंबर-**

पाकणी येथील जुना पाकणी-सोलापूर रस्त्यावरील शिंदे वस्तीजवळ सिना नदीकडे जाणारा ओढा नादुरुस्त झाल्याने ग्रामस्थांनी महादेव कोगनुरे यांची भेट घेऊन नादुरुस्त ओढ्याबाबत समस्या मांडली. तेव्हा महादेव कोगनुरे आणि एमके फाउंडेशनचे पदाधिकारी यांनी नादुरुस्त ओढ्याची त्वरित दखल घेत तेथील समस्या जाणून घेतल्या. या नादुरुस्त ओढ्यामुळे शाळकरी विद्यार्थी, महिला ,वयोवृद्ध नागरिक, व्यापारी,नोकरदार तसेच वाहनधारक यांना नाहक त्रास सहन करावा लागत होता. यावेळी महादेव कोगनुरे यांनी नादुरुस्त ओढ्याबाबत संबंधित विभागाशी संपर्क साधत पाकणी ग्रामस्थांना दिलासा दिला. दक्षिण आणि उत्तर सोलापूर तालुक्यात सध्या एमके फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा जनसेवक महादेव कोगनुरे यांनी गावभेट दौरा करीत सर्व सामान्य माणसापर्यंत पोहचून त्यांच्या समस्या जाणून घेताना दिसून येत आहेत. यावेळी बाबुराव खलीपे, शिवाजी अडके तसेच काँग्रेस व एमके फाउंडेशनचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### सांगोला व मंगळवेढा तालुक्यातील दोन रास्तभाव धान्य दुकानावर कारवाई

**सोलापूर, दि. ६ सप्टेंबर**

सांगोला तालुक्यातील मौजे करांडेवाडी (बुध्देहाळ) येथील रास्तभाव धान्य दुकान परवाना धारक बिरुदेव नामदेव खटे, मौजे करांडेवाडी (बुध्देहाळ) यांचे रास्तभाव धान्य दुकानाबाबत येथील लाभार्थ्यांकडून तक्रारी प्राप्त झालेल्या होत्या. या तक्रारीबाबत या रास्तभाव धान्य दुकानदार यांचे चौकशी करणे बाबत तहसिलस्तरावर तपासणी पथक नियुक्त करणेचे आदेश होते. या तपासणी पथकाचे अहवालानुसार सदर परवानाधारक दोषी आढळून आलेने त्यांचा परवाना निलंबीत केला आहे, अशी माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी दिली. मंगळवेढा तालुक्यातील मौजे शेलेवाडी येथील रेशनकार्डधारक लाभार्थ्यांकडून रेशनकार्ड बाबत मौजे शेलेवाडी येथील रास्तभाव धान्य दुकान परवानाधारक, शेलेवाडी विविध कार्यकारी सेवा सोसायटी मर्या. शेलेवाडी (ता. मंगळवेढा) हे लाभार्थी यांचे कुटुंबाला मिळणाऱ्या रेशन मालाचा गैरव्यवहार करीत असलेबाबत तक्री प्राप्त झालेल्या होत्या. तक्रारीत तथ्य आढळून आलेने, मौजे शेलेवाडी ता. मंगळवेढा येथील रास्तभाव धान्य दुकानाचा परवाना निलंबीत केलेला आहे.

# स्वयंसेवकांमुळे पूर्वांचलातील स्थितीत सुधारणा

**• सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांचे प्रतिपादन**

**• भय्याजी काणे जन्मशताब्दी कार्यक्रम**

**वृत्तसंस्था,**
**पुणे, ६ सप्टेंबर-**

मणिपूरमधील कठीण परिस्थितीतही संघाचे स्वयंसेवक सर्व बाजूंनी कणखरपणे उभे आहेत. संताप, क्रोध, द्वेष विसरून नागरिकांतील संघर्ष थांबावा म्हणून सर्व घटकांशी संवाद साधत आहेत. गेली ४० ते ५० वर्षे समर्पित वृत्तीने कार्य करणारे संघ स्वयंसेवक आणि इतर संघटनांमुळेच पूर्वांचलाची आजची स्थिती सुधारत आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी केले.

कोथरूड येथील बाल शिक्षण मंदिराच्या सभागृहात आयोजित भय्याजी काणे जन्म शताब्दी कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी पूर्व सीमा विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. देवराव पाटील, प्रमुख पाहुणे विकासक नितीन न्याती, रा. स्व. संघाचे पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे संघचालक नाना जाधव, प्रतिष्ठानचे सचिव जयवंत कोंडविलकर उपस्थित होते.



मणिपूरमधील द्वेषाची आग भडकवू न देता शांत करता आली पाहिजे, असे आवाहन डॉ. भागवत यांनी केले. ते म्हणाले, आपण भारत असल्याची भावना पूर्वांचलात अधिक दृढ झाली आहे. मणिपुरातील आजची परिस्थिती बदलवता कशी येईल, असा कृतिशील विचार करायला हवा. असे झाल्यास कठीण परिस्थिती बदलायला वेळ लागणार नाही. ही सकारात्म कता उभी राहण्यासाठी प्रत्येकाला आपापल्या परीने योगदान द्यावे लागेल.

**आणखी दोन पिढ्यांना झिजावे लागेल**

आजच्या पिढीत महापुरुषांकडून प्रेरणा घेऊन खारीचा वाटा उचलणारे सामान्य नागरिक हवेत. मुळात, भारतीय माणूस देशभक्तच आहे. देशभक्ती, संस्कृती आणि बलिदान ही भारतीयांना जोडणारी त्रिसूत्री आहे. मात्र, अजूनही देशाला उर्जितावस्था यायला वेळ आहे. पुढील एक दोन पिढ्या यासाठी कार्य करावे लागेल, असे डॉ. भागवत यांनी सांगितले. भारताचा उत्कर्ष ज्यांच्या पथ्यावर पडत नाही, अशा शक्ती सर्व काही ओरबाडण्याचा प्रयत्न करीत असल्याचेही ते म्हणाले.

पूर्व सीमा विकास प्रतिष्ठानचे समन्वयक श्रीपाद दाबक यांनी प्रास्ताविक केले. सुधीर जोगळेकर यांनी भय्याजी काणे यांचा जीवनपरिचय करून दिला. अतुल कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. होनराज मावळे यांनी सादर केलेल्या वंदे मातरम्ने कार्यक्रमाची सांगता झाली.

# विकासाच्या वाटेवरील महाराष्ट्रात अराजक पसरवण्याचे मविआचे कारस्थान : बावनकुळे

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.६ सप्टेंबर:**



महाराष्ट्र,मराठी माणसाचा स्वाभिमान याच्याशी महाविकास आघाडीला काहीही देणेघेणे नाही. छत्रपती शिवाजी महाराजांचा वारंवार अवमान करणाऱ्या काँग्रेस नेतृत्वाला छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेण्याचाही अधिकार नाही. काँग्रेसचे शिवरायांबद्दलचे प्रेम बेगडी आहे,असा हल्लाबोल भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी शुक्रवारी केला. पत्रकारांशी बोलताना त्यांनी यांनी काँग्रेस नेते व लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधीं गुरुवारी सांगलीतील पतंगराव कदम यांच्या पुतळा अनावरण प्रसंगी केलेल्या टीकेला प्रत्युत्तर दिले. ते म्हणाले, महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेवून राहुल गांधी यांनी पुन्हा एकदा खोटे नरेटिव्ह पसरवण्याचा उद्योग सुरू केला आहे. लोकसभेवेळी महिला भगीनींना काँग्रेसचे खासदार निवडून दिलेत तर बँक खात्यात खटाखट ८.५ हजार टाकू असे आश्वासन दिले होते. ते पूर्ण न केल्याबद्दल गांधी महाराष्ट्रातील माता भगिनींची माफी मागणार का, असा सवाल करून ते म्हणाले, महाराष्ट्र विकासाच्या वाटेवर म ार्गक्रमण करत असताना या ना त्या प्रकारे रेटून खोटे बोलत राज्यात अशांतता पसरवण्याचा मविआ चा कट आहे . शिवाजी महाराजांवरून मविआ आणि काँग्रेसने नेहमीच हीन दर्जाचे राजकारण केले आहे. काँग्रेसचे कमलनाथ हे मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री असताना शिवाजी महाराजांचा पुतळा जेसीबीने हटवला होता. मविआचे घटक पक्ष छत्रपती शिवरायांच्या वंशजांकडून पुरावे मागतात.शाहिस्तेखान, अफझलखान नसते तर शिवरायांची ओळख नसती असे वक्तव्य करण्याचे धाडस करतात. त्यावेळी राहुल गांधींनी शिवरायांची,महाराष्ट्राची माफी मागितली नव्हती. काँग्रेस आणि मविआ शिवरायांच्या पुतळ्यावरून गलिच्छ राजकारण करत राज्यात अशांतता पसरवण्याचा कट रचत आहे, असे बावनकुळे यांनी नमूद केले.

कर्नाटक,तेलंगणा या काँग्रेस शासित राज्यात लाडकी बहीण सारख्या योजना बंद केल्या गेल्या आहेत.



सोलापूर : शुक्रवारी हरतालिका शुभमुहूर्तावर बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात गौरी खरेदी करताना सुहासीनींमधून उत्साह होता. (छायाचित्र : केवल तिवारी)



सोलापूर : श्री गणेशोत्वाच्या पूर्वसंध्येला बाप्पाच्या आगमनानिमित्त बाजारपेठा फुलल्या असून गणेशाला भक्तीभावाने घरी घेवून जाणारा परिवार.



### मंद्रुप बाजारपेठेत सोमेश वैद्य युवराज राठोड यांच्याकडून छत्र्या वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. ६ सप्टेंबर -**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रूप येथील आठवडा बाजारपेठेत स्वयंम शिक्षा फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष सोमेश वैद्य आणि सोनाई प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष युवराज राठोड यांच्या संयुक्त विद्यमाने बाजारातील सर्व व्यापार्यांना छत्री वाटप करण्यात आले.

मंद्रूप तालुका स्तरावरील गाव असल्याने येथे नागरिकांची प्रचंड गर्दी असते. शुक्रवारी आठवडा बाजारपेठेत दक्षिण सोलापूर तालुक्यातील अनेक गावांतील नागरीक हे संसारोपयोगी वस्तू, भाजीपाला, अनेक वस्तू खरेदी करण्यासाठी येत असतात . या सर्व नागरिकांना सोमेश वैद्य आणि युवराज राठोड यांनी वाटप केलेल्या छत्री आकर्षित केले होते.

संपूर्ण बाजारपेठेतील छत्र्या वरती एकच ध्यास दक्षिण सोलापूरचा विकास या वाक्याने आणि सोमेश वैद्य आणि युवराज राठोड यांच्या जोडीच्या फोटो मुळे मंद्रुप बाजारपेठेसह मंद्रुपमध्ये जोरदार चर्चे ला उधाण आले आहे.

# ॲड. भास्करराव आव्हाड स्मृती पुरस्काराने प्रा. जोशी यांचा गौरव

**वृत्तसंस्था,**
**पुणे, दि. ६ सप्टेंबर -**

प्रा.मिलिंद जोशी यांची लेखन आणि वक्तृत्वशैली अनोखी आहे. त्यांनी साहित्य परिषदेला लोकाभिमुख केले. संस्थात्मक पातळीवर काम करीत असताना साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाची निवडणूक बंद करून निवडीतील राजकारण व टोळीयुद्ध बंद पाडण्यासाठी योग्य हस्तक्षेप केला. हे ऐतिहासिक कार्य प्रा. जोशी यांनी केले, असे गौरवोद्गार अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलानाचे माजी अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांनी काढले.




आडकर फौंडेशनतर्फे ॲड. भास्करराव आव्हाड स्मृती पुरस्काराने प्रसिद्ध व्याख्याते, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांचा गौरव डॉ. मोरे यांच्या हस्ते करण्यात आला. त्या प्रसंगी ते अध्यक्षपदावरून बोलत होते. पत्रकार भवन, नवी पेठ येथे (दि. ६) कार्यक्रमाचे आयोजन केल होते. ज्येष्ठ विचारवंत डॉ. राजा दीक्षित, महाराष्ट्र-गोवा बार कौन्सिलचे सदस्य ॲड. अविनाश आव्हाड यांची प्रमुख उपस्थिती होती. आडकर फौंडेशनचे अध्यक्ष ॲड. प्रमोद आडकर व्यासपीठावर होते. सन्मानपत्र, शाल आणि श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

ॲड. भास्करराव आव्हाड यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. ॲड. आव्हाड यांच्याप्रमाणेच शून्यातून विश्व निर्माण करणाऱ्या व्यक्तीस दरवर्षी स्मृती पुरस्काराने गौरविले जाते आहे. डॉ. मोरे यांनी म नोगत व्यक्त केले.डॉ. राजा दीक्षित म्हणाले, प्रा. मिलिंद जोशी यांच्या साहित्यकृतींमध्ये ग्रामीण, शहरी व निमशहरी पात्रांचे मनोविश्लेषण दिसून येते. अतर्क्य गोष्टींचा वेध, प्रसन्न, प्रभावी, ओघवती लेखनशैली हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. प्रा. जोशी उत्तम योजक, अभियंता, अभ्यासक, लेखक आणि वक्ता आहेत. वैचारिक, ललित आणि समीक्षण प्रकारातील त्यांचे लिखाण उत्तम दर्जाचे असून त्यांचे संस्थापटूत्वही स्पृहणीय आहे. प्रा. जोशी यांनी उत्तर दिले.




### पी.एन. गाडगीळ यांची प्राथमिक समभाग विक्री १० सप्टेंबरला खुली

**सोलापूर, दि. ६ सप्टेंबर -**

पी.एन.गाडगीळ ज्वेलर्स लिमिटेडने मंगळवारी, १० सप्टेंबर २०२४ रोजी आपली प्राथमिक समभाग विक्री खुली करण्याचा प्रस्ताव सादर केला आहे.बोली/ऑफर बंद होण्याची तारीख गुरुवार, १२ सप्टेंबर २०२४ असेल.प्रमुख गुंतवणूकदार बोली तारीख बोली/ऑफर खुली करण्याच्या एक कार्यालयीन दिवस आधी म्हणजेच सोमवार,०९ सप्टेंबर २०२४ आहे.ऑफर साठी प्रति इक्विटी शेअर्ससाठी ४५६ रु. ते ४८० रु चा किंमतपट्टा निश्चित करण्यात आला आहे. बोली किमान ३१ इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर ३१ इक्विटी शेअर्सच्या पटीत लावता येईल.

# पूरग्रस्त गुजरात, आंध्र प्रदेशात केंद्राचे पाहणी पथके मग महाराष्ट्रातच का नाही? : चेनीथला

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ६ सप्टेंबर-**

मराठवाडा व विदर्भात पुराने थैमान घातले असून १२ लाख एकरवर पिकांचे नुकसान झाले आहे, १२ लोकांचा मृत्यू झाला आहे, रस्ते, पुल वाहून गेले परंतु केंद्रातील भाजपा सरकार महाराष्ट्राकडे लक्ष देत नाही. तेलंगणा आणि आंध्र प्रदेशात पुर आल्यानंतर दोन केंद्रीय मंत्रालये तैनात करण्यात आली आहेत, कृषी मंत्री व अर्थमंत्री तातडीने मदत मिळावी यासाठी कसोशीने प्रयत्न करत आहे. महाराष्ट्रात मात्र अद्याप केंद्राचे पथकही आले नाही, केंद्र सरकार महाराष्ट्राला सापत्न भावाची वागणूक का देत आहे? केंद्र सरकारकडून महाराष्ट्राला अजून मदत का मिळत नाही? महायुतीचे नेते केंद्राकडे मदत का मागत




नाहीत? असा सवाल काँग्रेसचे महाराष्ट्राचे प्रभारी रमेश चिनीथला यांनी शुक्रवारी पत्रकारांशी बोलताना केला..

ते म्हणाले, 'विदर्भात पुराने थैम ान घातले असून १२ लाख एकरवर पिकांचे नुकसान झाले आहे, १२ लोकांचा मृत्यू झाला आहे, रस्ते, पुल वाहून गेले परंतु केंद्रातील सरकार राज्याकडे दुर्लक्ष करत आहे. विधानसभा निवडणुकीच्या तयारीच्या अनुषंगाने ते म्हणाले की, काँग्रेस पक्षाने १७२ मतदार संघाचा आढावा घेतला आहे. २५ तारखेपर्यंत सर्व २८८ मतदार संघाचा आढावा पूर्ण होईल. राज्यातील वातावरण मविआसाठी अनुकुल आहे, परिवर्तन करण्याची जनतेची मानसिकता बनलेली असून भ्रष्ट महायुती सरकारला सत्तेतून खाली खेचून २/३ बहुमताने मविआचे सरकार येईल असा, विश्वास श्र आहे. राज्यातील कायदा सुव्यवस्था बिघडलेली आहे, हत्या, दरोडे, महिलांवरील अत्याचारात वाढ झालेली आहे. पुण्यात तीन दिवसात दोन हत्या करण्यात आल्या. महागाई आवाक्याबाहेर गेल्याने सण साजरे करणे अवघड झाले आहे. जनता प्रचंड त्रस्त आहे पण महायुती सरकार मात्र घोटाळे करून पैसे वसुल करण्यात व्यस्त आहे असे चेन्नीथला यांनी सांगितले..

यावेळी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, राज्यात गुंतवणूक वाढली असा देवेंद्र फडणवीस यांचा दावा आहे तर मग राज्यात बेकारीचे प्रमाण प्रचंड का आहे? बेकारी कमी का होत नाही? याची उत्तरे फडणवीस यांनी द्यावीत. भाजपा व फडणवीस सातत्याने खोटे बोलून जनतेची दिशाभूल करत आहेत, असेही त्यांनी सांगितले.



सोलापूर तरुण भारत
https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# अग्रेसर महाराष्ट्र

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्राचे भूषण आहेत. ते अभ्यासू, परिश्रमी आहेत. सोबतच समर्पित भावनेने काम करणारे लोकसेवक आहेत. त्यांचा कामाचा धडाका जबरदस्त आहे. त्यांच्याकडे महाराष्ट्राला पुढे नेण्याची दृष्टी आहे. २०१४ ते २०१९ या पाच वर्षांच्या त्यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या कार्यकाळात महाराष्ट्राने सर्व आघाड्यांवर मोठी झेप घेतली होती. त्यामुळेच त्यांच्या नेतृत्वात २०१९ साली झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपाला १०५ जागा मिळाल्या होत्या. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेसोबत युती करून फडणवीसांनी पुन्हा युतीला कौल मिळवून देण्यात यश प्राप्त केले होते. एकप्रकारे मुख्यमंत्री असताना केलेल्या कामांची ही पावतीच होती. पण, उद्धव ठाकरे यांच्या मनात पाप आले आणि त्यांनी देवेंद्र फडणवीसांना मुख्यमंत्री बनू दिले नाही. ज्या काँग्रेस आणि राष्ट्रवादीला जनतेने नाकारले होते, त्यांच्या तंबूत जाऊन उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाले. पण, ठाकरेंच्या अडीच वर्षांच्या मुख्यमंत्रिपदाच्या कार्यकाळात महाराष्ट्र विकासाच्या मार्गावरून माघारी फिरल्याचा अनुभव आपण सगळ्यांनीच घेतला. दिवस पुढे जात असतानाच राज्यात राजकीय गणितं बदलली आणि पुन्हा एकदा भाजपा सत्तेत आली. देवेंद्र फडणवीसांनी मनाचा मोठेपणा दाखवत उपमुख्यमंत्रिपद स्वीकारले आणि राज्याला नव्या दमाने समृद्धीच्या महामार्गावर गतिमान केले. आज अनेक राज्यांना पिछाडीवर सोडत महाराष्ट्र थेट परकीय गुंतवणूक आणण्यात आघाडीवर असल्याचे सुखावणारे चित्र दिसत आहे. देशात एकूण जी थेट परकीय गुंतवणूक आली आहे, त्यातली ५२.४६ टक्के गुंतवणूक ही एकट्या महाराष्ट्रात आली आहे. याचे श्रेय भाजपा-शिवसेना-राकाँ (अजित) यांना आहेच, प्रामुख्याने ते सर्वाधिक यशस्वी मुख्यमंत्री राहिलेल्या आणि आता उपमुख्यमंत्री असलेल्या देवेंद्र फडणवीसांना आहे. ही अतिशयोक्ती नाही. विधानपरिषद आणि राज्यसभेच्या निवडणुकीत जास्तीची जागा जिंकताना जे कौशल्य फडणवीसांनी दाखविले होते, तसेच कौशल्य त्यांनी थेट विदेशी गुंतवणूक आणतानाही दाखविले, यासाठी ते अभिनंदनास पात्र आहेत. महाराष्ट्र हे तसे लोकसभेतील खासदारांच्या संख्येच्या दृष्टीने देशातील दुसऱ्या क्रमांकाचे राज्य आहे. उत्तरप्रदेशातील ८० खासदारांच्या पाठोपाठ महाराष्ट्रात ४८ खासदार आहेत. मात्र, आर्थिक स्थिती, कायदा आणि सुव्यवस्था, औद्योगिक विकास, राजकीय स्थैर्य तसेच विकासाच्या अन्य सर्व प्रस्थापित मापदंडावर महाराष्ट्र हे देशात सर्वांत पुढे आहे. महाराष्ट्राने देशाच्या विकासातही आपले बहुमोल असे योगदान दिले आहे. आज महाराष्ट्रातील जनतेची मान अभिमानाने उंचावेल, अशी माहिती समोर आली आहे. गेल्या लागोपाठ दोन वर्षांपासून महाराष्ट्र देशातील गुंतवणुकीत आघाडीवर आहे. एप्रिल ते जून २०२४ या तिमाहीत महाराष्ट्रात ७०,७९५ कोटी रुपयांची गुंतवणूक आली. या तिमाहीत देशभरात १ लाख ३४ हजार ९५९ कोटी रुपयांची गुंतवणूक आली; यापैकी ७०,७९५ कोटी रुपयांची गुंतवणूक एकट्या महाराष्ट्रातील आहे. गुंतवणुकीत दुसऱ्या स्थानावर कर्नाटक आहे. कर्नाटकात १९,०५९ कोटी रुपयांची गुंतवणूक आली. मात्र, महाराष्ट्र आणि कर्नाटक या दोन राज्यांतील गुंतवणुकीत मोठी तफावत आहे. देशात पहिल्या दहांपैकी महाराष्ट्र सोडून उर्वरित नऊ राज्यांतील गुंतवणुकीची बेरीजही महाराष्ट्रातील गुंतवणुकीपेक्षा कमी आहे. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असले तरी महायुतीच्या राज्यातील सर'कार'च्या ड्रायव्हिंग सीटवर देवेंद्र फडणवीसच आहेत. फडणवीस यांच्यामुळेच महायुती सरकारच्या विकासाची गाडी भरधाव वेगाने योग्य मार्गावर धावत आहे. देवेंद्र फडणवीस यांच्यासारखा अभ्यासू, संवेदनशील, जनसामान्यांच्या प्रश्नांची जाण असलेला, प्रखर वक्तृत्व, विकासाची दृष्टी तसेच प्रशासनावर पकड असलेला नेता मिळाला, हे महाराष्ट्राच्या जनतेचे भाग्यच म्हटले पाहिजे. कारण, गुंतवणूक, त्याही परकीय गुंतवणूक ही उगीच कोणत्याही राज्यात येत नाही. गुंतवणूक करणारा मग तो देशातील असो वा परदेशातील उद्योगपती, तो डोळे झाकून गुंतवणूक करत नाही. गुंतवणुकीच्या दृष्टीने कोणते राज्य सुरक्षित आणि उद्योगस्नेही आहे, त्या राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था कशी आहे, राज्य सरकारची उद्योगांबाबतची भूमिका कशी आहे, या घटकांचा अभ्यास करूनच तो गुंतवणूक करीत असतो. महाराष्ट्रात विक्रमी गुंतवणूक आली, याचा अर्थ महाराष्ट्रातील एकूणच सगळे वातावरण देशातील आणि परदेशातील गुंतवणूकदारांनाही पसंत पडले, असा होतो. २०२२-२३ मध्ये महाराष्ट्रात १,१८,४२२ कोटी रुपयांची गुंतवणूक झाली. या वर्षातही महाराष्ट्रातील गुंतवणूक दिल्ली, कर्नाटक आणि गुजरातच्या बेरजेपेक्षाही जास्त होती. २०२३-२४ मध्ये महाराष्ट्रात १,२५,१०१ कोटी रुपयांची गुंतवणूक आली. महाराष्ट्राची गुंतवणूक गुजरातच्या दुप्पट तर गुजरात आणि कर्नाटकच्या बेरजेपेक्षा जास्त होती. २०१४ ते २०१९ या काळात म्हणजे देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना महाराष्ट्रात ३,६२,१६१ कोटी रुपयांची परकीय गुंतवणूक आली होती. सव्वादोन वर्षांपूर्वी राज्यात महायुतीचे सरकार आल्यानंतर पाच वर्षांचे काम आम्ही अडीच वर्षांत करू, अशी ग्वाही राज्य सरकारने दिली होती. सव्वादोन वर्षांत राज्यात ३,१४,३१८ कोटी रुपयांची गुंतवणूक आली आहे. याचे सारे श्रेय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्रिद्वय देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्याकडे जात असले, तरी यात सिंहाचा वाटा हा देवेंद्र फडणवीस यांचा आहे, हे त्यांच्या विरोधकांनाही मान्य करावे लागेल. जेवढी गुंतवणूक जास्त तेवढे मोठे उद्योग राज्यात येण्याची शक्यता जास्त आणि जेवढे मोठे उद्योग राज्यात येतील, तेवढ्याच मोठ्या प्रमाणात रोजगारही निर्माण होतील. आपल्या राजकीय प्रवासात फडणवीस यांनी राज्यातील सर्व जाती-धर्मांच्या लोकांना सोबत घेत त्यांच्या सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि आर्थिक विकासाचा मार्ग प्रशस्त केला. पण जातपात न मानणाऱ्या फडणवीसांना जातीवरून अडचणीत आणण्याचे सातत्याने प्रयत्न झाले आणि अजूनही होत आहेत, हे दुर्दैवीच. देवेंद्र फडणवीस पहिल्या कार्यकाळात मुख्यमंत्री झाले असताना महाराष्ट्रात मराठ्यांनी लाखांचे मोर्चे काढले. आज फडणवीस मुख्यमंत्री नसले, उपमुख्यमंत्री असले, तरी काही स्वार्थी शक्तींनी मनोज जरांगे पाटील यांना पुढे करून मराठा आरक्षणाच्या मुद्यावरून त्यांना घेरण्याचा प्रयत्न चालवला आहे. खरं म्हणजे राज्यातील मराठ्यांना आरक्षण देणारे फडणवीसच आहेत. पण दुर्दैवाची बाब म्हणजे त्यांना मराठाविरोधी ठरवण्याचा प्रयत्न केला जात आहे. आधी देश, मग पक्ष आणि सर्वात शेवटी व्यक्ती यावर फडणवीस यांची ठाम श्रद्धा आणि निष्ठा आहे. महाराष्ट्रात येत्या महिना-दोन महिन्यांत विधानसभा निवडणुका होणार आहेत. या निवडणुकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे असले, तरी महायुती भाजपाच्या नेतृत्वात निवडणुकीला सामोरी जाणार आहे. महायुतीचा मुकाबला महाविकास आघाडीशी आहे. या लढतीत महायुतीचा विजय एकशेएक टक्के निश्चित आहे. महायुती आपला मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर करणार नसली, तरी महायुतीत सर्वाधिक जागा भाजपा लढवणार आणि सर्वाधिक जागा भाजपा जिंकणार, ही काळ्या दगडावरची रेष आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीनंतर सर्वात जास्त आमदार भाजपाचे राहणार असल्यामुळे मुख्यमंत्रिपद ओघानेच भाजपाकडे येणार, हे नक्की आहे. फडणवीस हे महाराष्ट्राची आन, बान आणि शान आहेत. आज फडणवीसांना मुख्यमंत्रिपदाची गरज नाही, तर महाराष्ट्राला फडणवीस यांची मुख्यमंत्री म्हणून गरज आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. जे लोक भाजपाला जातीयवादी म्हणून हिणवतात, तेच लोक फडणवीसांना त्यांच्या जातीवरून त्रास देत आहेत, ही विडंबनाच होय. स्वतःला पुरोगामी म्हणविणारे पवारादी नेते गेल्या काही कालावधीत स्वतःच प्रचंड जातीवादी झालेत, हे महाराष्ट्र उघड्या डोळ्यांनी बघतो आहे.


## यंगिस्तान

जयेश शत्रुघ्न मेस्त्री

# आता उद्धव ठाकरे 'बेस्ट सीएम' कसे होणार?

'दैव देते आणि कर्म नेते,' अशी एक मराठीत म्हण आहे. ही म्हण उद्धव ठाकरेंसाठी चपखल बसते. नशिबाने त्यांना सगळं काही दिलं. ते प्रबोधनकार ठाकरेंचे नातू आहेत, बाळासाहेब ठाकरेंचे सुपुत्र आहेत आणि म्हणूनच त्यांना शिवसेनेचं अध्यक्षपद मिळालं. इतकं चांगलं नशीब घेऊन येण्यासाठी भाग्यच लागतं. म्हणून उद्धव ठाकरे हे भाग्यवान आहेत, असंच म्हणावं लागेल. भाजपा आणि शिवसेना युती ही आधीच्या पिढीने घडवलेली युती होती आणि वर्षानुवर्षे टिकवून ठेवली होती. काही वाद झाले तरी काँग्रेस आणि डाव्या विचारांची सत्ता येऊ नये म्हणून महाराष्ट्राच्या हितासाठी ही युती टिकून राहिली. पण उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्री व्हायचं होतं आणि यासाठी भाजपा तयार नव्हता. कारण, ज्याच्या जागा जास्त त्याचा मुख्यमंत्री असा युती धर्म होता. या युती धर्मापेक्षा उद्धव ठाकरेंना मुख्यमंत्री होण्याचे वेध लागले होते. भाजपा आणि शिवसेना यांच्यात जो वाद पेटला, तो याच मुद्यावरून. २०२४ ला सगळे वेगवेगळे लढले आणि भाजपाला सर्वात जास्त जागा मिळाल्या. पण सत्तेवर बसण्यासाठीचा आकडा भाजपाला गाठता आला नाही. मग राष्ट्रवादी काँग्रेसने त्यांना बाहेरून पाठिंबा जाहीर केला.

शरद पवारांना तोपर्यंत देवेंद्र फडणवीसांचा स्वभाव ठाऊक नव्हता. पवारांनी नेहमीच दुसऱ्या पक्षातल्या नेत्याला मुख्यमंत्री बनवलं. पण स्वतःच्या पक्षातल्या नेत्याला त्यांनी या पदावर विराजमान होऊ दिलं नाही. याची नाराजी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये विशेषतः अजित पवारांमध्ये दिसून येत होती. आघाडीतला किंवा विरोधी पक्षातला नेता मुख्यमंत्री झाला तरी पवारांच्या हातात कमान असेल, याची ते काळजी घ्यायचे. पण भाजपाला पाठिंबा दिल्यानंतर त्यांना कळलं की देवेंद्र फडणवीस हे आपल्या हाताला लागणार नाहीत. तोपर्यंत शिवसेना सत्तेत सहभागी झाली होती. भिजलेले राजीनामे त्यांनी खिशात ठेवले असले, तरी देवेंद्र फडणवीसांनी सरकार चालवून दाखवले. २०१९ साली मात्र उद्धव ठाकरे यू-टर्न घेतील, असं फडणवीसांना वाटलं नव्हतं. काही झालं तरी ते काँग्रेससोबत जाणार नाहीत, असा विश्वास त्यांना होता. मात्र, उद्धव ठाकरे काँग्रेससोबत गेले आणि काँग्रेसच्या संस्कृतीत आपलं स्थान निर्माण करण्याचा त्यांनी प्रामाणिक प्रयत्न केला. त्यासाठी सुरुवातीला बाळासाहेबांचा उल्लेख हिंदुहृदयसम्राट म्हणून करण्याचे टाळण्यात आले. इतकंच काय, तर बॅनरवरूनही त्यांची ही पदवी काढण्यात आली. आता ते हा शब्द वापरतात. कदाचित राहुल गांधी यांनी तशी अनुमती दिली असावी.



उद्धव ठाकरे आणि संजय राऊत यांचं म्हणणं आहे की, ते नाईलाजाने भाजपासोबत होते. त्यांना भाजपासोबत राहायचं नव्हतं. आपण एक गोष्ट समजून घेतली पाहिजे की, शिवसेना आणि भाजपाचा डीएनए एकच आहे. वादविवाद असले तरी शिवसेनेलाही तेच हवे आहे, जे भाजपाला हवं आहे. पण बाळासाहेबांच्या निधनानंतर उद्धव ठाकरे या मूळ ध्येयापासून दूर जाण्याचा प्रयत्न करू लागले. कारण, वर म्हटल्याप्रमाणे त्यांच्यासाठी मुख्यमंत्रिपदाची खुर्ची सर्वस्व आहे. ही खुर्ची त्यांना शरद पवारांनी मिळवून दिली. पण ठाकरे हाताच्या बोटावर मोजण्याइतक्या वेळा मंत्रालयात गेले. इतर वेळी ते घरीच निवांत बसून असायचे. स्वतःच्या कुटुंबाला वेळ द्यायचे. पण महाराष्ट्राचा कुटुंबप्रमुख त्यांना होता आलं नाही. खरं तर हा महाराष्ट्राचा अपमान होता. आजपर्यंत अनेक मुख्यमंत्री झाले. त्यांच्या कार्याबाबत अनेक मतभेद असू शकतील. परंतु, ते कार्यक्षम होते. उद्धव ठाकरे पहिले असे मुख्यमंत्री होते, जे कार्यच करत नव्हते. तरीसुद्धा वर्षातून सहा वेळा त्यांना बेस्ट सीएमची पदवी चाय-बिस्कुट मीडिया बहाल करत होती. हा सर्व्हे कोण करत होतं? का करत होतं? हे न समजण्याइतकी जनता मूर्ख मुळीच नव्हती. पुढे एकनाथ शिंदेंनी उठाव केला आणि उद्धव ठाकरेंना मुख्यमंत्र्यांच्या खुर्चीवरून पायउतार व्हावे लागले. हा त्यांच्यासाठी खूप मोठा धक्का होता. संजय राऊत म्हणत होते की, हे सरकार अनेक वर्षे टिकणार आहे आणि अडीच वर्षांत सरकार बदलले.

पहिली गोष्ट इथे लक्षात घ्यायला हवी, ठाकरे हे स्वतःच्या बळावर, स्वतःच्या कर्तृत्वाने मुख्यमंत्री झाले नव्हते. त्यांच्या डोक्यावर शरद पवारांचा हात होता आणि पवारांना राज्यात फडणवीस नको होते. त्यामुळे ठाकरे हे मुख्यमंत्रिपदाचं अमरत्व घेऊन विराजमान झाले होते, हा उद्धव ठाकरेंचा गैरसमज होता.

आता ठाकरेंना पुन्हा एकदा मुख्यमंत्रिपदाचे वेध लागले आहेत. त्यांना असं वाटत होतं की, लोकसभेत शरद पवार आणि काँग्रेसने आपल्याला जास्त जागा दिल्या म्हणून विधानसभेतही जास्त जागा मिळतील व मुख्यमंत्रिपदही मिळेल. त्यांचा हा भ्रम आता दूर होऊ लागला आहे. कारण, निवडणुकीआधी मुख्यमंत्रिपदाचा चेहरा जाहीर करण्याची उद्धव ठाकरेंची मागणी शरद पवार यांनी फेटाळली आहे आणि काँग्रेसने तर ठाकरेंच्या या मागणीकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे. जणू उद्धव ठाकरे यांना ते विचारातच घेत नाहीत, असा संदेश त्यांनी दिला आहे. लोकसभा निवडणुकीत उद्धव ठाकरे यांची शक्ती तपासण्यात आली आणि ते मुस्लिम मतदारांच्या बळावर म्हणजेच राष्ट्रवादी काँग्रेस व काँग्रेसच्या पारंपरिक मतदारांच्या बळावर काही खासदार निवडून आणू शकले, हे सिद्ध झाले आहे. ठाकरेंनी सर्वाधिक जागा लढून सर्वात कमी जागा मिळविल्या आहेत. आता त्यांना विधानसभेत जास्त मान मिळणार नाही. मात्र, आमचा एक डोळा फुटला तरी भाजपाचे दोन डोळे फुटले, असा विचित्र आनंद ठाकरे आणि त्यांचे कार्यकर्ते साजरा करताना दिसतात. भाजपालादेखील महाराष्ट्रात कमी जागा मिळाल्या, पण भाजपा हा मोठा आणि अभ्यासू पक्ष आहे. ते आपला आकडा पुढच्या निवडणुकीत नक्कीच वाढवतील. पण उद्धव ठाकरेंचे काय होणार? मुख्यमंत्री होण्यासाठी त्यांनी भाजपासारख्या चांगल्या मित्राची साथ सोडली, जो त्यांना प्रचंड मानसन्मानही देत होता. मग आघाडीत राहून त्यांना कमी जागा मिळाल्या आणि मुख्यमंत्रीही होता आलं नाही, तर उद्धव ठाकरे यांनी हा अट्टाहास करून काय कमावलं? याचं आत्मपरीक्षण उद्धव ठाकरे किंवा संजय राऊत करू शकणार नाहीत. कारण, आत्मपरीक्षण करण्याची त्यांची सिद्धता नाही. कदाचित भाजपाला दूषणे देण्यातच ते आपला आत्मसन्मान समजून उरलेलं राजकारण करत राहतील. कदाचित तेव्हा उद्धव ठाकरेंना त्यांच्या पिताश्रींनी म्हणजेच बाळासाहेब ठाकरेंनी पवारांविषयी केलेली विधाने आठवत राहतील. पण तेव्हा खूप वेळ झालेला असेल. शरद पवारांचे बोट धरून 'बेस्ट सीएम' होण्याच्या नादात त्यांनी त्यांचा पक्ष गमावला आहे, हे तेव्हा तरी त्यांना कळून चुकेल का?

writerjayeshmestry@gmail.com


## वेध

विजय कुळकर्णी

# शिमल्यात लॅण्ड जिहाद?

शिमल्यामधील संजोली परिसरात एक मशीद बांधण्यात आली. बांधकाम करण्यात आलेली जागा हिंदुबहुल भागात व शासकीय जागेवर आहे. ही जमीन वक्फची असल्याचे सांगितले जाते. या मशिदीत मोठ्या संख्येत मुस्लिम वास्तव्य करीत आहेत. त्यामुळे या मशीद परिसरात वास्तव्यास असलेल्या हिंदूंमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे ही मशीद पाडण्यात यावी, अशी मागणी हिंदूंकडून केली जात आहे. दोन दिवसांपासून या मागणीसाठी शेकडो हिंदूंनी रस्त्यावर उतरून धरणे दिली. या घटनेवरून लव्ह जिहाद, व्होट जिहाद आणि आता लॅण्ड जिहाद होत असल्याचे बोलले जात आहे.

विशेष म्हणजे हिमाचलमध्ये सध्या काँग्रेसची सत्ता आहे. सुखविंदरसिंह सुख्खू हे मुख्यमंत्री आहेत. तर, मशीदच्या अवैध बांधकामाचा मुद्दा काँग्रेसचेच मंत्री अनिरुद्धसिंह यांनी उपस्थित केला. विधानसभेत त्यांनी या अवैध बांधकामावर कारवाई करण्याची मागणी केली. त्यांच्या म्हणण्यानुसार या मशिदीचे बांधकाम शासकीय जागेवर करण्यात आले आहे. तसेच अडीच मजल्यांचीच परवानगी असताना सहा मजले बांधण्यात आले आहेत. त्यामुळे हे बांधकाम पाडण्यात यावे. बांधकाम अवैध असेल तर त्यावर कारवाई झालीच पाहिजे. मग, ते मंदिर असो की मशीद, अशी त्यांची मागणी आहे. त्यांच्या या मागणीनंतर हजारो हिंदू या मशीद परिसरात रस्त्यावर उतरून आंदोलनात सहभागी झाले.



आज ज्या ठिकाणी ही मशीद उभी आहे तेथे केवळ तळमजला होता. त्याचे छत टिनपत्र्याचे होते. तेथे मो. सलिम नावाचा एक टेलर काही वर्षांपूर्वी एकटाच राहत होता. हळूहळू तेथे पक्के बांधकाम करण्यात आले. यावर २०१० मध्ये हरकत घेण्यात आली. त्यानंतर हे प्रकरण न्यायालयात दाखल करण्यात आले आणि मशिदीचे बांधकाम बंद करण्यात आले. त्यानंतर कोरोनामध्ये हे बांधकाम करण्यात आले. २०२२ मध्ये काँग्रेसची सत्ता हिमाचलमध्ये आली. मात्र, मुख्यमंत्री सुख्खू यावर कोणतीही कारवाई करताना दिसत नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. काही वर्षांपूर्वी एक व्यक्ती एकटीच तळमजल्यावर राहत होती. आज तेथे शेकडो लोक राहतात. याचा अर्थ त्या इमारतीत बाहेरून आलेल्या लोकांना राहण्याची सोय उपलब्ध करून दिली जात आहे. तर, मशिदीच्या शेजारी राहणाऱ्या नागरिकांचे म्हणणे आहे की, ही शासकीय जागा हडपण्याचा प्रयत्न आहे. शिमलामध्ये अडीच मजल्याच्यावर बांधकाम करण्यास मनाई आहे. एनजीटी म्हणजे नॅशनल ग्रीन ट्रिब्यूनलने अडीच मजल्यापेक्षा जास्त मजले बांधण्यास मनाई केली आहे. मात्र, ही मशीद सहा मजली बांधण्यात आली आहे. सर्वांना अडीच मजल्यापेक्षा जास्त बांधकाम करण्यास मनाई असताना या मशीद बांधकामाला विशेष सूट का? असे आंदोलक विचारत आहेत. या मशिदीत मोठ्या संख्येत मुस्लिम समुदायाचे लोक वास्तव्यास बाहेरून आल्यामुळे या परिसरातील हिंदूंमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. हे सर्वजण तेथे एकत्रित राहण्यास का आले, हा प्रश्न सर्वसामान्यांना पडला आहे. संपूर्ण शिमला शहरात हा नंगानाच सुरू आहे. शासनानेदेखील हे बांधकाम अवैध असल्याचे स्पष्ट केल्यानंतरही त्यावर कारवाई का नाही, असाही प्रश्न शिमलाचे नागरिक उपस्थित करीत आहेत. हिमाचलचे मंत्री अनिरुद्धसिंह यांनी हा मुद्दा उपस्थित केल्यानंतर सर्व हिंदू पुन्हा जागरूक झाले आणि त्यांनी या अवैध बांधकामाविरोधात आंदोलन सुरू केले. यावर मुख्यमंत्री सुख्खू यांचे सरकार काय कारवाई करते, याकडे हिमाचल प्रदेशचे लक्ष लागले आहे. या प्रश्नाचे उत्तर कालांतराने मिळेलच. पण, सुख्खू सरकारवर हे नवीन संकट कोसळले आहे. हिमाचलची आर्थिक परिस्थिती डामाडोल झाली आहे. सरकारकडे राज्य सरकारी कर्मचाऱ्यांचे वेतन व पेन्शन देण्यासाठी पैसे नाहीत. वेतन देणे सुरूच केले होते. तर, अवैध मशीद बांधकामाची नवीन समस्या या सरकारपुढे उभी ठाकली आहे. तेव्हा, मुख्यमंत्री हा मुद्दा कसा हाताळतात याकडे हिमाचल प्रदेशच्या जनतेचे लक्ष लागून आहे. या मुद्यावरून देवभूमी तापली आहे. हिंदू आता जागरूक झाला आहे. आपल्या समस्या सोडविण्यासाठी तो रस्त्यावर उतरला आहे, हे मात्र खरे!

८८०६००६१४९

## मुंबई वार्तापत्र

नागेश दाचेवार

# लाडक्या बहिणींवर राग का?

राज्य सरकारने ज्या दिवशीपासून लाडकी बहीण योजना लागू केली, त्या दिवशीपासून या योजनेला मविआ अर्थात काँग्रेस, शरद पवार गट राकाँ, उद्धव ठाकरे गटाने विरोध चालवला आहे. कुठलीही घटना घडली की, आम्हाला लाडकी बहीण योजना नको, 'हे द्या आणि ते द्या'चा सूर लावला जात आहे. मुळात मूलभूत सुविधा मागण्याचा अधिकार जनतेला आहे आणि जनतेला न्यायहक्क मिळवून देण्यासाठी राजकीय नेत्यांना अधिकार आहे. मग ते सरकारमधील असो किंवा सरकारबाहेरील म्हणजे विरोधक असोत. मात्र, एखादी गोष्ट देण्यासाठी दुसरी योजना बंद करा, ती योजना नकोची नकारघंटा वाजवली जात आहे. कायदा व सुरक्षेसाठीचा आरोग्य विभागाच्या, कृषी विभागाच्या, गृहविभागाच्या निधीत कपात झालीय् का? तर नाही; उलट वाढ झाली आहे. मग मूलभूत सुविधा मिळाव्या यासाठी लाडकी बहीण योजना बंद करावी, अशी विरोधकांची पोटदुखी नेमकी कशासाठी असावी? राज्यातल्या गोरगरीब बहिणींना, ज्या हातावर आणून पानावर खाणाऱ्या बहिणी आहेत, त्यांना फूल ना फुलाची पाकळी समजू, अशी आर्थिक मदत जर सरकारकडून होत असेल तर त्या मिळणाऱ्या मदतीला खोडा का घातला जात आहे? बहिणींच्या योजनेला इतका का विरोध केला जात आहे? या आर्थिक मदतीसोबतच अन्य सुविधा द्या, अशी मागणी करा. मात्र, या योजनेच्या माध्यमातून महिला महायुतीला मतदान करतील आणि आपल्या राजकीय अस्तित्वाला धक्का लागेल म्हणून गरीब, भोळ्याभाबड्या बहिणींच्या पोटावर लाथ मारण्याचे पाप करू नका. सध्या बहिणींना जे मिळताहेत ते मिळू द्या आणि तुम्ही अर्थात विरोधकांनी सत्तेत आल्यावर ही योजना बंद करून हा निधी मूलभूत सुविधांवर खर्च करावा आणि याबाबतची घोषणा आत्ताच करावी. निव्वळ महिलांची, महाराष्ट्राच्या जनतेची दिशाभूल करू नये, एवढी हात जोडून कळकळीची विनंती सर्वसामान्य बहिणींची विरोधकांना, विरोध करणाऱ्यांना आहे.

देशातील महिलांना ८ हजार ५०० खटाखट देण्याची घोषणा राहुल गांधी लोकसभेच्या निवडणूक प्रचार सभांमधून करत फिरत होते. त्यावेळी संपूर्ण काँग्रेस पक्षाचे नेते, कार्यकर्ते घरोघरी जाऊन महिलांना 'खटाखट पैसे देऊ'चे आश्वासन देत फिरत होते. काँग्रेस पक्षाच्या पाठोपाठ त्यांच्या इंडिया आघाडीतील घटकपक्ष अर्थात महाराष्ट्रातील शरद पवार आणि उद्धव ठाकरे गट खटाखट खटाखट करत उडताना दिसले होते. त्यांच्या या योजनेच्या कितीतरी पटीने कमी तुटपुंजी अशी १५०० रुपयांची मदत महाराष्ट्र सरकारने महिलांसाठी जाहीर केली. जाहीर केलेली मदत तुटपुंजी आहे म्हणणे एकदाचे मान्यदेखील करता येईल; मात्र ती दिली जाऊ नये, अशी मागणी तेच लोकं करत आहेत, ज्यांनी लोकसभेच्या प्रचाराच्यावेळी आम्ही ८,५०० रुपये देऊ, अशी घोषणा केली होती. ही अशी दुटप्पी भूमिका यांचा खरा चेहरा उघड करते.

बदलापूर येथील शाळेत दोन चिमुकलींवर अत्याचाराची घटना समोर आली. त्यावेळी आम्हाला लाडकी बहीण योजनेचे १५०० रुपये नको, मुलींना सुरक्षा द्या, अशी मागणी विरोधक करताना दिसले. त्यावेळी झालेल्या आंदोलनात लाडकी बहीण योजना नकोचे फलक झळकावल्या गेले. तेथील पालकांना फलक फडकवायचेच असते तर 'वुई वॉण्ट जस्टिस, आरोपीला फाशी द्या, कारवाई करा,' अशा आशयाचे फलक त्यांनी फडकवले असते, पण ते छापायला द्या, छापून आणा ही नसती पंचायत कोण करेल, ज्यांना याचा राजकीय फायदा उठवायचा असेल तोच करेल. आता हे फलक फडकविल्याने कोणाला फायदा होणार होता, हे जगजाहीर आहे.

**महिला सुरक्षेविषयी या लोकांनी न बोललेलंच बरं!**

नुकतीच नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोने आकडेवारी जाहीर केली. त्यात यांच्या म्हणजे उद्धव ठाकरेंच्या मुख्यमंत्रिपदाच्या मविआच्या कार्यकाळात २०२० मध्ये ३१ हजार ७०१ महिला अत्याचाराच्या घटना घडल्या. दिवसाला ८८ घटना राज्यात घडल्या. २०२१ मध्ये ३९ हजार २६६ महिला अत्याचाराच्या घटना घडल्या. दिवसाला १०९ घटना घडल्या. जानेवारी ते जून २०२२ मध्ये २२ हजार ८४३ घटना घडल्या. दिवसाला १२३ घटना घडल्या. जुलै ते डिसेंबर २०२२ मध्ये २० हजार ८३० महिला अत्याचाराच्या घटना घडल्या. दिवसाला ११६ घटना घडल्याचे म्हटले आहे. या आकडेवारीने महिलांच्या सुरक्षेविषयी आज छाती बडवणाऱ्यांचा खरा चेहरा उजागर केला आहे.

**कायदा व सुव्यवस्थेविषयीदेखील बोलण्याचा अधिकार यांना नाही**

एक मंत्री सर्वसामान्यांना बंगल्यावर बोलावून मारहाण करतो. देशासाठी सेवा दिलेल्या नेव्ही अधिकाऱ्याला मारहाण केली जाते. विरोधात बोलले म्हणून घरं पाडली जातात. कविता केवळ पोस्ट केली म्हणून तुरुंगात डांबले जाते. एका गुंडाला पोलिस सेवेत रुजू करून त्याच्याकरवी कोट्यवधींची वसुली केली जाते. वसुलीची पोल खोल होऊ नये म्हणून सामान्य व्यापाऱ्याचा खून केला जातो. ही सारी मविआच्या सत्ताकाळात चाललेली गुंडगिरी जनतेने बघितलीच नव्हे, तर अनुभवली आहे. राज्यातील जनतेला मोकळ्या मनाने श्वास घेण्याचे स्वातंत्र्य नव्हते, अशी अघोषित आणिबाणी राज्यात लावण्यात आली होती. राज्यातील विविध रुग्णालयांमध्ये मोठ्या प्रमाणात आगी लागण्याचे प्रकारही मविआच्या काळात घडले होते.

या लोकांचं बरं आहे, 'लोका सांगे ब्रह्मज्ञान, स्वतः कोरडे पाषाण' घटना कुठलीही असो, लोकांच्या डोक्यावर खापर फोडून मोकळं व्हायचं. आता तर लाडकी बहीण योजनेमुळे विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकू लागल्याने, त्या योजनेला बदनाम करण्याचं नवं षडयंत्र यांनी चालवलं आहे. सगळ्या घटनेत यांना आता लाडकी बहीण दिसू लागली आहे. लाडकी बहीण नको, १५०० नको... या सोबतच कायदा सुव्यवस्था सुधारा, आरोग्य व्यवस्था सुधारा, पुतळा उभारा, नोकऱ्या द्या, शेतकऱ्यांना मदत करा, एसटी कर्मचाऱ्यांना मदत करा अशा अनेक मागण्या करत असताना विरोधक मात्र लाडकी बहीण नकोचा नारा लावताना दिसत आहे. अरे तुमच्या बाकी सगळ्या मागण्या मान्य, पण लाडक्या बहिणीला मदत देऊ नकाचा आग्रह का? त्या बहिणींनी तुमचं काय घोडं मारलं? साऱ्या घटकांना मदत देण्याची मागणी करत असताना मात्र बहिणींची मदत बंद करून ती द्या, अशी मागणी करणे, हे बहिणींसाठी एकप्रकारे अन्यायकारकच म्हणावे लागेल.

९२७०३३३८८६

### धक्कादायक वास्तव

ऑस्ट्रेलियातील कार्टिन आणि नेट्रो डेम विद्यापीठात केलेल्या संशोधनात धक्कादायक वास्तव समोर आले आहे. सर्व जगाला भेडसावणाऱ्या प्लॅस्टिकचे प्रदूषण आता मानवाच्या मेंदूपर्यंत जाऊन पोहोचले आहे. प्लॅस्टिक वापरल्याशिवाय आपला एकही दिवस जात नाही. कारण सकाळीच दात ब्रश करताना प्रथम प्लॅस्टिकचा वापर, नंतर हातात कायम असलेला मोबाईल फोन, पाण्याच्या बाटल्या, खाण्याचे टिफीन इतर अनेक माध्यमातून आपला प्लॅस्टिक या न विरघळणाऱ्या घटकाचा संबंध येतो. संपूर्ण जगाची डोकेदुखी ठरणाऱ्या प्लॅस्टिकचे मायक्रो कण संशोधनात डोक्यातील मेंदूत आढळून आलेले आहेत. त्यामुळे मानवी आरोग्याच्या बाबतीत ही धोक्याची घंटा म्हणावी लागेल. मायक्रो प्लॅस्टिक हे पाच मिलिमीटरपेक्षा लहान असल्याने हे प्लॅस्टिक साध्या डोळ्यांनी दिसत नाही. त्याच्या परिणामस्वरूप हे मायक्रो प्लॅस्टिकचे कण हवेच्या आणि खाण्याच्या माध्यमातून आपल्या शरीरात प्रवेश करीत आहेत तर हे त्यांनी प्रवेश केलेले आहेत. हे मायक्रो कण आतडे आणि फुफ्फुसांच्या मार्गात आले की, रक्तप्रवाहात मिसळतात आणि शरीराच्या विविध अवयवांमध्ये प्रवेश करू शकतात. मानवाच्या हृदयात, सांधे, यकृत, प्रजनन भाग, रक्तवाहिन्या इत्यादी अवयांमध्ये मायक्रो प्लॅस्टिक आढळून आले आहे. त्यामुळे जगाला भेडसावणारी समस्या आता आपल्या शरीरालासुद्धा भेडसावणार आहे. ही मायक्रो प्लॅस्टिकची समस्या मानवी आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत गंभीर आजार निर्माण करणारी आहे.

**दत्तप्रसाद शिरोडकर**/९७०२६४४९६९

## वाचक पत्रे

### लालपरीचा संप आणि आरक्षण आंदोलन

राज्यातील एसटी कर्मचाऱ्यांनी आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी परत एकदा संपाचे हत्यार उचलले होते. या आधी महाविकास आघाडी सरकार असताना एस. टी. कर्मचाऱ्यांनी बेमुदत संप पुकारला होता. त्यावेळी महाविकास आघाडी सरकारने एस. टी. कर्मचाऱ्यांचा संप अक्षरशः मोडीत काढला होता. शंभरच्या वर एसटी कर्मचाऱ्यांनी या दरम्यान आत्महत्याही केल्या होत्या. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार यांच्या निवासस्थानावर निवेदन देण्यासाठी गेलेल्या कर्मचाऱ्यांवर, हल्ला करण्यासाठी आले होते, असा बेछूट आरोप महाविकास आघाडी सरकारद्वारा त्यांच्यावर लावण्यात आला होता. महायुतीचे सरकार स्थापन झाल्यानंतर यातील बहुतांश मागण्या पूर्ण करण्यात आल्या. तथापि, राज्य सरकारी कर्मचारी वेतनसारख्या अनेक महत्त्वाच्या मागण्या प्रलंबित आहेत. एसटी कर्मचाऱ्यांनी ओळखून घेतले की प्रलंबित मागण्या ज्या काही थोड्याबहुत मान्य झाल्या तर आताच्या भाजपा-शिवसेना युती सरकारच्या काळात होतील. महाविकास आघाडी सरकार काळात त्यांची आणि त्यांच्या संघटनेची सरकारने कशी वाट लावली होती, याचा अनुभव कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष अनुभवला होता. मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांची आज जी तडफड दिसत आहे, ती यामुळेच. त्यांना माहीत आहे की मराठा आरक्षणावर काही निर्णय झाला तर या सरकारमध्येच होईल. कारण महाविकास आघाडी सरकारने फडणवीस सरकारने दिलेल्या आरक्षणाचा कसा विचका करून ठेवला आहे, हे त्यांनाही माहीत आहे. भविष्यात मराठ्यांना तर आरक्षण मिळवणे अजून अवघड होऊन बसणार आहे, हे ते ओळखून आहेत. त्यामुळे ते दबावाचे राजकारण खेळत आहे. एसटी कर्मचाऱ्यांचा संप आणि मराठा आरक्षण, ही दोन्ही आंदोलने त्याचाच परिपाक आहेत.



**अविनाश देशपांडे**/९२८४६७९६२३

### आशा आणि विश्वास यांचा समन्वय

समाज जीवन जगत असताना व्यक्ती आशा आणि विश्वास या दोन बाबींवर आपले समाज जीवन व कौटुंबिक जीवन जगत असतो. जीवनात आशा आणि विश्वास या दोन्ही बाबी महत्त्वपूर्ण असतात. तो बऱ्याच बाबीची आशा मनी धरून जीवन जगत असतो. त्या आशेच्या आधारे जीवनात येणाऱ्या अनेक चढ-उतारांशी त्याला सामना करावा लागतो, कधी अपयश तर कधी यश त्याला मिळत असते. यासाठी तो समाजातील बऱ्याच घटकांकडून आशा करीत असतो. हा आशेचा किरण त्याच्या जीवनाचा खरा आधार असतो. ही आशा जशी तो करीत असतो तसा या आशेच्या पूर्तीसाठी त्याला समाजातील घटकांवर विश्वास ठेवून आशापूर्तीकडे वाटचाल करावी लागते. मात्र, या विश्वासाला कधी-कधी तडाही जातो. कोणी विश्वासाला सार्थ ठरतात तर कोणी तडाही देतात. आशा आणि विश्वास या बाबी त्या व्यक्तीच्या योग्य निवडीवर अवलंबून असतात. असे म्हणतात की, आशा आणि विश्वास कधीच चुकीचे नसतात. फक्त ते आपल्यावर अवलंबून असते की आशा कोणाकडून करावयाची आणि विश्वास कोणावर ठेवायचा. चला तर योग्य निवड करून आशा आणि विश्वास दोन्ही सार्थक ठरो म्हणून योग्य घटक निवडू या!

**धोंडीरामसिंह राजपूत**/९४२१३१२२४४

## महत्त्वाचे

### हरविंदर सिंग, प्रीती पाल भारताचे ध्वजवाहक





**पॅरिस :** तिरंदाजीमधील सुवर्णपदक विजेता हरविंदर सिंग आणि पॅरालिम्पिकमध्ये दोन पदके जिंकणारी प्रीती पाल, या दोन खेळाडूंची रविवारी पॅरिस पॅरालिम्पिकच्या समारोप समारंभात भारताचा ध्वज घेऊन जाण्यासाठी निवड करण्यात आली आहे. २०२१ मध्ये टोकियोमध्ये कांस्यपदक जिंकणाऱ्या ३३ वर्षीय हरविंदर सिंगने पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये सुवर्णपदक पटकावले. भारताच्या ध्वजवाहकांपैकी एक म्हणून सेवा करण्याची संधी दिल्याबद्दल मनापासून कृतज्ञता व्यक्त करतो, असे हरविंदर म्हणाला. समापन समारंभात देशाचा ध्वज घेऊन जाणे हा मी स्वप्नात पाहिलेला सर्वोच्च सन्मान आहे, असेही तो म्हणाला. प्रीती पालची कामगिरीही उल्लेखनीय असून तिने पॅरालिम्पिक स्पर्धेत दोन पदके मिळवणारी पहिली भारतीय होऊन इतिहास घडवला आहे. भारतासाठी सुवर्ण जिंकणे हे एक स्वप्न पूर्ण झाले आहे आणि आता समारोप समारंभात ध्वजवाहक म्हणून आपल्या राष्ट्राचे नेतृत्व करण्याची संधी मिळणे, हे मी स्वप्नातही बघितले नव्हते, हा सर्वोच्च सन्मान आहे. हा माझ्यावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकासाठी आहे, असे २३ वर्षीय प्रीती म्हणाली.

### मारिनोचा २० वर्षांत पहिला स्पर्धात्मक विजय

**सॅन मारिनो :** जागतिक फुटबॉल क्रमवारीत सर्वात खालच्या क्रमांकावरील संघ मारिनोने २० वर्षांचा विजयाचा दुष्काळ संपवून पहिला स्पर्धात्मक विजय मिळवला. यूईएफए नेशन्स लीग स्पर्धेत सॅन मारिनो स्टेडियमवर मारिनोने लिकटेंस्टीनचा १-० असा पराभव केला. निको सेन्सोली विजयाचा शिल्पकार ठरला. सुमारे ३०,००० लोकसंख्येच्या या छोट्या राष्ट्राने आपल्या घरच्या मैदानावर हा ऐतिहासिक क्षण साजरा केला.

# प्रवीण कुमारने जिंकले उंच उडी स्पर्धेत सुवर्णपदक!

### भारताला मिळवून दिले २६ वे पदक




◆ **पॅरिस, ६ सप्टेंबर**

भारतीय पॅरा ॲथ्लिट प्रवीण कुमारने पॅरिस पॅरालिम्पिकच्या पुरुषांच्या उंच उडी टी-६४ स्पर्धेत आशियाई विक्रम मोडून सुवर्णपदक जिंकले. लहान पायांसह जन्मलेल्या प्रवीणने सहा खेळाडूंच्या अंतिम फेरीत हंगामातील सर्वोत्तम २.०८ मीटर उडी मारली व अव्वल स्थान पटकावले. भारताचे हे एकूण २६ वे पदक ठरले असून हे सहावे सुवर्ण आहे. भारताच्या खात्यात आतापर्यंत नऊ रौप्य व ११ कांस्यपदक आली आहेत. प्रवीणचे पॅरालिम्पिकमधील हे सलग दुसरे पदक आहे. यापूर्वी, त्याने टोकियो पॅरालिम्पिकमध्ये २.०७ मीटरची सर्वोत्तम कामगिरी करत रौप्यपदक जिंकले होते.

**पॅरालिम्पिकमध्ये पुरुषांच्या उंच उडीत सुवर्ण जिंकणारा दुसरा भारतीय**

उत्तर प्रदेशातील नोएडा येथील २१ वर्षीय प्रवीण कुमार हा पॅरालिम्पिकमध्ये पुरुषांच्या उंच उडीत सुवर्णपदक जिंकणारा मरियप्पन थंगावेलू याच्या नंतरचा दुसरा भारतीय पॅरा ॲथ्लिट ठरला आहे. अमेरिकेच्या डेरेक लॉसेंटने २.०६ मीटरच्या उडीसह रौप्यपदक, तर उझबेकिस्तानच्या टेमेरबेक झियाझोव्हने २.०३ मीटरच्या उडीसह कांस्यपदक जिंकले. या कामगिरीसह प्रवीण कुमार पॅरिसमध्ये पदक जिंकणारा तिसरा भारतीय उंच उडीपटू ठरला. त्याच्या आधी शरद कुमारने रौप्यपदक जिंकले होते, तर मरियप्पनने पुरुषांच्या टी-६३ स्पर्धेत कांस्यपदक जिंकले होते. (वृत्तसंस्था)

### पंतप्रधानांनी केले अभिनंदन



पॅरालिम्पिकमध्ये नवीन उंची गाठल्याबद्दल आणि पुरुषांच्या उंच उडी टी-६४ स्पर्धेत सुवर्ण जिंकल्याबद्दल प्रवीण कुमारचे अभिनंदन! तुमच्या जिद्द आणि जिद्दीने आपल्या देशाला वैभव प्राप्त झाले आहे. भारताला त्याचा अभिमान आहे! असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ट्विटमध्ये म्हटले आहे.

# नीरज चोप्रा ब्रुसेल्स डायमंड लीग फायनल्ससाठी पात्र

◆ **नवी दिल्ली, ६ सप्टेंबर**



भारताचा दोन वेळा ऑलिम्पिक पदक विजेता भालाफेक स्टार नीरज चोप्रा याने प्रतिष्ठित डायमंड लीग ॲथ्लेटिक्स स्पर्धेच्या या महिन्याच्या हंगामाच्या अंतिम फेरीसाठी पात्रता मिळवली आहे. नीरजने डायमंड लीगच्या एकूण मालिका स्पर्धेनंतर क्रमवारीत चौथे स्थान पटकावले आहे. आगामी १४ व १५ सप्टेंबर रोजी दोन दिवसीय डायमंड लीग फायनल्स स्पर्धा होणार आहे.

नीरज चोप्राने दोहा व लॉसने येथे झालेल्या एकदिवसीय स्पर्धेत दुसरा क्रमांक मिळवत १४ गुणांची कमाई केली आहे. तो गुरुवारी झुरिचमध्ये झालेल्या मालिकेतील शेवटच्या स्पर्धेत सहभागी झाला नव्हता.

२६ वर्षीय नीरज झेक प्रजासत्ताकच्या जेकब वडलेचपेक्षा दोन गुणांनी मागे आहे. ग्रेनेडाचा ॲण्डरसन पीटर्स आणि जर्मनीचा स्टार खेळाडू वेबर अनुक्रमे २९ आणि २१ गुणांसह अव्वल दोन स्थानांवर विराजमान आहेत. पीटर्सने झुरिच स्पर्धेमध्ये वेबरवर मात केली होती.

२०२१ मध्ये टोकियो ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक व गत महिन्यात पॅरिस ऑलिम्पिकमध्ये रौप्यपदक जिंकणारा नीरज चोप्रा या हंगामात आपल्या तंदुरुस्तीसाठी संघर्ष करत आहे.

हरयाणाच्या या नीरजने ऑलिम्पिकच्या आधीपासून कंबरेच्या दुखापतीबद्दल सांगितले आहे. नीरज नेहमीच ९० मीटरपर्यंत भाला फेकण्याच्या प्रयत्नात आहे.

लॉसने डायमंड लीगमध्ये नीरजने दुसरे स्थान पटकावले. पीटर्सने ९०.६१ मीटर फेकले. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये पाकिस्तानच्या अर्शद नदीमने ९२.९७ मीटरची विक्रमी फेक सुवर्णपदक पटकावले होते.

पॅरिस ऑलिम्पिकनंतर दुखापतीवर उपचारासाठी डॉक्टरांकडे जाईल व शंभर टक्के तंदुरुस्त होईल, जेणेकरून पुढील स्पर्धेत अधधिक चांगली कामगिरी करता येईल, असे नीरजने यापूर्वी आपल्या योजनेबद्दल सांगितले होते.

नीरजने २०२२ व २०२३ मध्ये लॉसने डायमंड लीग जिंकली होती. गत वर्षी यूजीन, अमेरिका येथे झालेल्या डायमंड लीग फायनल्समध्ये वडीलेजनंतर दुसरे स्थान मिळवले होते. (वृत्तसंस्था)



# शालेय सेपक टकरा स्पर्धेत पानगल प्रशालेस तिहेरी मुकुट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ सप्टेंबर -**

शालेय सेपक टकरा स्पर्धेत एम.ए.पानगल प्रशालेने १४, १७ व १९ वर्षाखालील मुलांच्या गटात विजेतेपद पटकावित तिहेरी मुकुट संपादिला.

सोलापूर महानगरपालिका व जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या वतीने जय जवान जय किसान स्कूलच्या मैदानावर स्पर्धेचे आयोजन केले होते. १४ वर्षाखालील मुलांच्या गटात पानगल प्रशालेने सेंट जोसेफ प्रशालेचा ११-९, ७- ११, १३ -१२ असा पराभव केला. १७ वर्षाखालील मुलांच्या गटात पानगल ने स.हि.ने प्रशालेचा १५- ८, १५- ६ असा विजय मिळविला. १९ वर्षाखालील मुलांच्या गटात पानगल प्रशालेने जय जवान जय किसान स्कूलवर ११- ७, ११- ९ अशी मात केली.

### आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत समावेश करा : रामचंद्र दत्तू

महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांमध्ये सेपक टकरा या खेळाचे स्पर्धा घेण्यात येतात. तसेच अखिल भारतीय अंतर्गत विद्यापीठ स्पर्धेतही हा खेळ आहे. सोलापूर जिल्ह्यामध्ये सुमारे एक हजार खेळाडू हा खेळ खेळतात. २५ खेळाडूंनी राष्ट्रीय स्पर्धेत व ४०० खेळाडूंनी राज्य स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केली. त्यामुळे पुढील वर्षांमध्ये सोलापूर विद्यापीठाच्या क्रीडा स्पर्धेत हा खेळ समावेश करावा अशी मागणी जिल्हा संघटनेचे सचिव रामचंद्र दत्तू यांनी उद्घाटन प्रसंगी केली. यावेळी प्रा. नंदकुमार देशमुख, प्रा कांबळे, पंचप्रमुख रवी चव्हाण, क्रीडा शिक्षक वीरेश अंगडी, सनी भोसले, अल्ताफ सिद्दिकी आदी उपस्थित होते.



# ‘छत्रपती शिवाजी’च्या अरुण राठोडची आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ सप्टेंबर -**

बेंगलोर येथे झालेल्या ओपन राष्ट्रीय ॲथलेटिक्स स्पर्धेत येथील छत्रपती शिवाजी रात्र महाविद्यालयाच्या अरुण राठोडने दहा किलोमीटर धावण्याची शर्यत २९ मिनिटे ५२ सेकंदात पूर्ण करीत रौप्य प्राप्त केले. या कामगिरीवर त्याची आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली.

त्यानिमित्त त्याचा छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज शिक्षण संकुलाचे अध्यक्ष मनोहर सपाटे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे सचिव प्रा.महेश माने प्राचार्य डॉ. मधुकर पवार, पुण्यश्लोक आहिल्यादेवी सोलापूर विद्यापीठाचे अधिसभा सदस्य प्रा. सचिन गायकवाड आणि प्रा. संतोष गवळी यांनी अभिनंदन केले आणि पुढील आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# क्रीडा दिनानिमित्त ग्रीन स्टार क्लबच्या खेळाडूंचा सत्कार




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि ६ सप्टेंबर -**

ग्रीन स्टार स्पोर्टस् क्लबच्या वतीने हॉकीचे जादुगर मेजर ध्यानचंद यांच्या स्मृती दिनानिमित्त बास्केटबॉल आणि नोटबॉलच्या उत्कृष्ठ कामगिरी केलेल्या खेळाडूंचा सन्मानचन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

माजी उपमहापौर दिलीप कोल्हे, पालिका क्रीडाधिकारी श्रीकांत यांच्या हस्ते हा सत्कार करण्यात आला. यावेळी ग्रीनस्टार स्पोटर्स क्लबचे अध्यक्ष एम. शफी शेख, क्लबचे संस्थापक अध्यक्ष शिवछत्रपती शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते हाजीमलंग नदाफ, निजाम शेख, हारून खान, क्रिकेट असोसिएशनचे उपाध्यक्ष प्रकाश भुतडा, चेतन चौधरी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कुदूस शेख यांनी केले. तलहा शेख यांनी मनोगत व्यक्त केले. मोहसीन नदाफ यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अब्दुल माजिदखान पठाण, अजीम नदाफ यांनी परिश्रम घेतले.


## क्रीडा वृत्त



### कराटे स्पर्धेत रामदास इप्पाकायल शाळेची कामगिरी

**सोलापूर दि ६ सप्टेंबर -**

औरंगाबाद येथे झालेल्या कराटे स्पर्धेत रामदास नरसय्या इप्पाकायल प्राथमिक शाळेच्या कराटेपटूंनी विविध वयोगटात कामगिरी केली. या खेळाडूंचे मुख्याध्यापक नागेश सुभाष खुने, पद्मशाली शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्रीनिवास क्यातम, उपाध्यक्ष प्रा. श्रीनिवास कोंडी, सचिव दशरथ गोप, सहसचिव मल्लिकार्जुन सरगम व खजिनदार गोवर्धन कमटम, शालेय समितीचे अध्यक्ष विजयकुमार गुल्लापल्ली, देणगीदार नरसय्या इप्पाकायल विश्वस्त श्रीनिवास इप्पाकायल यांनी अभिनंदन केले. **कामगिरी : कुमिते फाईट :** ९ वर्षे : महेश्वरी रेवणसिद्ध बिराजदार (तृतीय), भुवनेश्वर रवी सिंगराल (तृतीय). १२ वर्षे : हरीप्रेम नरेश कल्याणी (प्रथम) समर्थ संजय कोळी (तृतीय), देवेंद्र रवी सिंगराल (द्वितीय).



### संगमेश्वर कॉलेजचे बॅडमिंटन, स्क्वॅश व योगासन स्पर्धेत यश

**सोलापूर दि ६ सप्टेंबर -**

शालेय शहर बॅडमिंटन, स्क्वॅश व योगासन स्पर्धेत संगमेश्वर कॉलेजने यश मिळविले. स्क्वॅशमध्ये समर्थ कदम याने प्रथम क्रमांक पटकाविला. योगासनमध्ये समृद्धी चक्रे हिने तृतीय तर बॅडमिंटन मुलींच्या संघाने प्रथम क्रमांक पटकावला. मुलांनी तृतीय स्थान संपादिले. या संघात श्रेया मिस्कीन, ढेंगळे पालवी, बाबर नालंदा यांचा तर मुलांच्या संघात हर्षल लवाटे, श्रेयस शिंदे, श्रीवर्धन लोंढे, ओंकार कुलकर्णी, अथर्व गुंड यांचा समावेश होता. या खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक डॉ. आनंद चव्हाण, शारीरिक शिक्षण शिक्षक प्रा.संतोष खेंडे, प्रा. विक्रांत विभुते व प्रा.शरणबसवेश्वर वांगी यांचे मार्गदर्शन लाभले या खेळाडूंचे श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन धर्मराज काडादी, सचिवा ज्योती काडादी, प्राचार्य डॉ. ऋतुराज बुवा, उपप्रचार्य प्रा. प्रसाद कुंटे आदींनी अभिनंदन केले.

# पानगल व बेगम कमरुन्नीसा हायस्कूलला विजेतेपद

**हिंदुस्थानी स्कूल रौप्य महोत्सव; शालेय व्हॉलिबॉल स्पर्धा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ सप्टेंबर -**



हिंदुस्थानी काव्हेनंट चर्च हायस्कूलच्या रौप्य महोत्सवानिमित्त झालेल्या शालेय व्हॉलिबॉल स्पर्धेत १७ वर्षांखालील मुलांच्या गटात एम. ए. पानगल प्रशालेने तर मुलींच्या गटात स्वामी विवेकानंद प्रशालेने विजेतेपद पटकाविले.

या स्पर्धेचे उद्घाटन क्रीडासंघटक सुदेश मालप यांनी केले. यावेळी शाळेचे अध्यक्ष अनिल विपत, विश्वस्त फिलीप नदवी, सचिव वनिता मेकॉनजी, प्राचार्या ऐस्तर सी. विनय, पर्यवेक्षक रवी पांडे, रुपाली उजागरे, शिबा लाजरस, क्रीडा शिक्षक एन्थोनी बर्नाड व सुहेल शेख आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहशिक्षक देविदास इटलकर व जाफर हुंडेकरी यांनी केले.

**अंतिम निकाल (विजयी व उपविजयी) :** मुले : एम.ए. पानगल हायस्कूल, स्वामी विवेकानंद.

मुली : बेगम कमरुनिमा हायस्कूल, सेवासदन प्रशाला.

# मोडनिंबच्या राज्य करावे स्पर्धेत कोल्हापूर विजेता, सांगली उपविजेता

● **आमदार बबनराव शिंदे वाढदिवस : सोलापूरला तृतीय स्थान**



**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. ६ सप्टेंबर**

राज्य अजिंक्यपद कराटे स्पर्धेत कोल्हापूरने विजेतेपद पटकाविले. सांगली जिल्ह्यास उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. तृतीय स्थान सोलापूर जिल्ह्याने मिळविले.

या स्पर्धेत उत्कृष्ट खेळाडू म्हणून गौरी कोळसे पाटील, शौर्य तांबिले, आर्या सुरवसे, आदेश रणदिवे व अजय डोंगरे यांना गौरवण्यात आले. मोडनिंब (ता.माढा) येथे आमदार बबनराव शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त झालेल्या या स्पर्धेचे उद्घाटन विक्रमसिंह शिंदे यांच्या हस्ते झाले. या स्पर्धेत १० जिल्ह्यातील ५७९ खेळाडूंनी सहभाग नोंदवला. बक्षीस वितरण कृष्णा रणजीतसिंह शिंदे, संदीप पाटील, कैलास तोडकरी, संतोष पाटील, चांगदेव वरवडे, यासीन शेख, ॲड. नवनाथ तांबिले, केतन तोडकरी यांच्या हस्ते झाले. यावेळी राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष कैलास तोडकरी,भीमराव बाळगे, इकबाल शेख, प्रकाश गायकवाड, शंभुराजे मोरे, निशिगंधा कोल्हे,संतोष पाटील, लक्ष्मी पाटील, दत्तात्रय सुर्वे आदी उपस्थित होते.

# खुल्या गटात मानस गायकवाड अजिंक्य

● **स्व.शंकर शिवप्पा मस्कले स्मृती चषक जिल्हा बुद्धिबळ स्पर्धा; विविध वयोगटात श्रीराम, सिद्धी, सिद्धांत, अद्विक व स्वरा विजेते**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ सप्टेंबर-**

ग्रँडमास्टर चेस अकॅडमी व सोलापूर चेस अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशनच्या मान्यतेने ''स्व. शंकर शिवप्पा मस्कले स्मृती चषक'' यांच्या स्मरणार्थ आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत खुल्या गटात अग्रमानांकीत आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त मानस गायकवाड याने स्पर्धेत सहा पैकी सहा गुण प्राप्त करत विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले. मानांकित व अनुभवी खेळाडू विशाल पटवर्धन याने उपविजेतेपद तर अरणच्या आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त यशोधन खंडागळे याने तिसरा क्रमांक पटकाविला. १३ वर्षाखालील मुले व मुलींच्या गटात श्रीराम राऊत व करमाळ्याची सिद्धी देशमुख यांनी उत्कृष्ट खेळ करत जेतेपद तर अद्विक ठोंबरे, स्वरा निरंजन यांनी आकर्षक खेळ करत ७ वर्षाखालील मुले व मुलींच्या गटातील अव्वल स्थान पटकाविले. तसेच सिद्धांत कोठारी व विवान दासरी यांनी ९ वर्षाखालील गटात वर्चस्व राखत प्रथम व द्वितीय क्रमांक संपादन केला. दोघांचीही २७ सप्टेंबर रोजी सुरु होणाऱ्या सोलापुर येथील राजस्तरीय स्पर्धेकरिता निवड झालेली आहे.

टाकळीकर मंगल कार्यालय येथे संपन्न झालेल्या या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ स्पर्धेच्या प्रायोजीका श्रीमती कत्तूरबाई शंकर मस्कले यांच्या अध्यक्षतेखाली तसेच टाकळीकर मंगल कार्यालयाच्या व्यवस्थापिका नीलम उपाध्ये, ग्रँडमास्टर चेस अकॅडमीचे सचिव गणेश मस्कले, संस्थेचे सचिव व आंतरराष्ट्रीय पंच सुमुख गायकवाड, विद्या मस्कले, सरस्वती झंपले, शकुंतला माने, दिगंबर मस्के, विद्यापीठ खेळाडू संतोष पाटील, करमाळ्याचे बुद्धिबळ संघटक पृथ्वीराज देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. आपल्या अध्यक्षीय भाषणात श्रीमती कत्तूरबाई शंकर मस्कले यांनी खेळाचे महत्व विषद करत राज्यस्तरीय स्पर्धेसाठी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यापीठ खेळाडू संतोष पाटील यांनी केले. विजेत्या खेळाडूंना आकर्षक चषक व मेडल्स मान्यवरांच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेत मुख्य पंच म्हणून वरिष्ठ राष्टीय पंच उदय वगरे तर त्यांना सहाय्यक म्हणून रोहिणी तुम्मा, प्रशांत पिसे, भरत वडीशेरला, यश इंगळे यांनी यशस्वीरीत्या काम पाहिले.



विजयी खेळाडूंसमवेत श्रीमती कत्तूरबाई शंकर मस्कले, नीलम उपाध्ये, गणेश मस्कले, सुमुख गायकवाड, विद्या मस्कले, सरस्वती झंपले, शकुंतला माने, दिगंबर मस्के, संतोष पाटील, उदय वगरे, पृथ्वीराज देशमुख आदी.

### अंतिम निकाल खालीलप्रमाणे (अनुक्रमे १ ते १० गुण व बोकोल्स गुणांसह)

- **खुला गट :** मानस गायकवाड ६, विशाल पटवर्धन - ५ (२२), यशोधन खंडागळे - ५(१९.५), मधुसूदन काबरा- ५(१८.५), प्रेरणा पवार - ५(१७), श्रीधर शिंदे - ५(१७), चंद्रशेखर बसर्गीकर - ४.५, स्वप्नील हदगल - ४(२४), प्रज्वल कोरे - ४(२३.५), विजय पंगुडवाले- ४(२०)
- **१३ वर्षे (मुले) :** श्रीराम राऊत ६, श्रीवीर जिल्ला - ५(२२), देवराज कान्हेरे - ५(२०.५), निखिल पवार - ५(२०), अंश राठोड - ५(१८.५), अश्विनीकुमार जोशी - ४.५(२०.५), विनय रणसुभे - ४.५(१९.५), सोहम कुटे - ४.५(१९.५), कार्तिक भागवत - ४(२२), अनुज वाल्मिकी - ४(२१)
- **१३ वर्षे (मुली):*** सिद्धी देशमुख ५, साची जाजू - ४.५, अनन्या उलभगत - ४(१५), प्रज्ञा मलजी - ४(१४.५), ज्योती खंडागळे - ४(१३), प्रीशा भांगे - ३.५, नाव्या खडलोया - ३(१४), तेजल चिलगुंडे - ३(१३.५), आदिती इंनानी - ३(१३.५), वेदिका स्वामी - ३(१३)
- **९ वर्षे गट :*** सिद्धांत कोठारी ६, विवान दासरी - ५(२२), नैतिक होटकर - ५(१९.५), ओम राऊत - ५(१९), वेदांत पांडेकर - ५(१७), श्लोक चौधरी - ५(१७), रेयांश दुलंगे - ४.५(१७), हर्ष जाधव - ४.५(१६), शशांक जमादार - ४(२४), विहान कोंगारी - ४(२३)
- **७ वर्षे (मुले):*** अद्विक ठोंबरे - ४.५, नियान कंदीकटला - ४(१४), पार्थ भांगे - ४(१३), नमन रंगरेज - ४(१२.५), विवेक स्वामी - ३(१५), अजिंक्य कांबळे - ३(१३), सिद्धेश जयभय - ३(११.५), रत्नेश घानेगावकर -३(१०.५), नमन अंधारे - २.५, शौर्य कोठारी - २
- **७ वर्षे (मुली):*** स्वरा निरंजन ३, इवा खडलोया- २(५), निवा बुरटे - २(४), स्वरांजली जाधव - २(४), ईशा पटवर्धन - १(४), अनन्या मालू - १(३), शनाया साठे - १(३), मोक्षा ओज्झा
- **उत्तेजनार्थ:** रुतुपर्ण पाटील, विघ्नेश एनुगुला, निकोल शिंदे, अमाबल जस्टिनकुरियन

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



## शिवालय आश्रम शाळा, ओमवैष्णव महाविद्यालयात शिक्षक दिन साजरा

**सोलापूर, दि. ६ सप्टेंबर-**

शिवालय प्राथमिक, माध्यमिक आश्रम शाळा व ओमवैष्णव कनिष्ठ महाविद्यालय तळे हिप्परगा तालुका उत्तर सोलापूर जिल्हा सोलापूर या आश्रम शाळेमध्ये शिक्षक दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात स्वागत गीताने करण्यात आली. तद्नंतर भारताचे दुसरे राष्ट्रपती डॉक्टर श्री सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून संगमेश्वर कॉलेजचे प्राध्यापक व आकाशवाणी केंद्र सोलापूरचे निवेदक संतोष पवार होते. तर अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दत्तात्रय गणेशकर हे होते. प्रथमता प्रतिमापूजन झाल्यानंतर प्रमुख पाहुण्यांचे स्वागत व सत्कार प्राचार्य वाघचवरे यांनी केले. तद्नंतर आश्रम शाळेमधील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा संस्थेच्या वतीने सन्मान सत्कार करण्यात आला. अध्यक्ष भाषणात संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दत्तात्रय गणेशकर यांनी आपले विचार व्यक्त करताना या आपल्या संस्था संचलित आश्रम शाळेमधील सर्व शिक्षक हे उपक्रम उपक्रमशील असून विद्यार्थी प्रिय असून आपले ज्ञानदानाचे काम ते अत्यंत प्रामाणिकपणे करतात त्याबद्दल त्यांचे आभार मानले. सूत्रसंचालन श्री नेताजी इंगळे यांनी केले. तर आभार चव्हाण यांनी मानले.

## विवाहितेच्या छळ प्रकरणी पतीसह सासू-सासरे निर्दोष मुक्त

**सोलापूर, दि. ६ सप्टेंबर-**



विवाहिता मेघा जीवन केसकर (वय २८ वर्षे) हिचा मानसिक व शारिरीक छळ व जाचहाट केल्याप्रकरणी पती जीवन नारायण केसकर (वय ३७ वर्षे), सासरे नारायण शंकर केसकर (वय ७५ वर्षे) आणि सासू सुनंदा नारायण केसकर (वय ७३ वर्षे) (सर्व रा. लक्ष्मी पेठ, सोलापूर) यांची प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी श्री. प्रशांत वराडे यांनी निर्दोष मुक्तता केली. याची हकीकत अशी, की विवाहिता मेघा हिला वरील तिन्ही आरोपींनी माहेराहून दहा लाख आणले तरच नांदवून घेऊ अन्यथा तिला बघून घेऊ अशी धमकी देऊन शिवीगाळ केली. सतत अपमान करुन तिचा शारिरीक व मानसिक छळ करुन तिला नेसत्या अंगवस्त्रानिशी घरातून हाकलून दिले वगैरे आशयाची फिर्याद विवाहिता मेघा हिने विजापूर नाका पोलीस ठाणे, सोलापूर येथे दिली होती. त्यावरुन वरील तिघांविरुद्ध गुन्हा दाखल होऊन तपासाअंती न्यायालयात आरोपपत्र दाखल झाले होते. तथापि कोणत्याही सबळ व विश्वसनीय पुराव्यानिशी आरोपींविरुद्ध गुन्हा शाबीत होऊ शकत नसल्याचा युक्तीवाद आरोपींचे वकील आल्हाद अंदोरे यांनी केला. तो युक्तिवाद ग्राह्य मानून न्यायाधीशांनी तिन्ही आरोपींची निर्दोष मुक्तता केली. या खटल्यात आरोपींचा बचाव ड. आल्हाद अंदोरे, ॲड. अथर्व अंदोरे यांनी केला. तर सरकारतर्फे ॲड. जे. व्ही. चेळेकर यांनी काम पाहिले.



## परसबाग गणेशोत्सव काळात २१ पत्री परिचय अभियान

**सोलापूर दि. ६ सप्टेंबर-**

श्री गणेश पूजनातील २१ पत्रींचे औषधी, पर्यावरणीय आणि शस्त्रीय महत्व उलगडून सांगण्यासाठी परसबाग सोलापूर आणि परसबाग स्त्री शक्ती च्या वतीने येत्या गणेशोत्सव काळात लोकशिक्षण अभियान राबविण्यात येणार आहे. नुकत्याच झालेल्या परसबाग सोलापूरच्या २१ पत्री प्रारंभिक परिचय सत्रामध्ये हा निर्णय घेण्यात आला.

जुळे सोलापूरातील विजय वैभव लक्ष्मी मंदिरामध्ये मंदिर संकुलाच्या प्रमुख मिनाक्षी जोकारे यांच्या प्रमुख उपस्थितीत वैद्य श्रेयस बेडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली हे प्रारंभिक पत्री परिचय सत्र पार पडले. स्मिता देशपांडे आणि शिरीष गोळवलकर या समन्वयकांनी या सत्राचे संयोजन केले होते. या अभियानात सोलापूर शहरातील वेगवेगळी श्री गणेशोत्सव मंडळे,श्री गणेश मंदिरे, शाळा, गृह संकुले, आस्थापना या सारख्या निवडक ठिकाणी ११ माहिती सत्रांचे आयोजन करण्यात येत आहे. अभियानासाठी गौरी गोळवलकर, अनुश्री गोळवलकर, पद्मजा संगवे, श्रीराम रामदासी, राजेंद्र आमले, विजय टाकळीकर, योगेश जक्कल, वैशाली कुलकर्णी, आनंद देशपांडे, वल्लभ कुलकर्णी, स्नेहा कुलकर्णी, वेदांत कुलकर्णी, जितेंद्र लाड, जहागीरदार, बेडेकर पंडित आदींनी सहकार्य केले. अधिक माहितीसाठी स्मिता देशपांडे ९४०३७०१९३५ आणि श्री.शिरीष गोळवलकर ८९५६८७७३३३ यांच्याशी संवाद साधावा, असे आवाहन परसबाग सोलापूर आणि परसबाग स्त्री शक्तीच्यावतीने करण्यात आले आहे.



## विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियनचा वर्धापन दिन उत्साहात

**सोलापूर, दि. ६ सप्टेंबर-**

महाराष्ट्र राज्यामध्ये वीज क्षेत्रात अग्रगण्य असणारी व महाराष्ट्रातील पहिली नामांकन प्राप्त असलेली विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियनचा ४७ वा वर्धापन दिन महावितरण सोलापूर शहर ई उपविभाग येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी सोलापूर मंडळ अध्यक्ष सुनिल काळे, शुकुर शेख, अनिलकुमार बनसोडे, संजय फताटे, शिवलिंगप्पा हारगेरी, सोमनाथ कोनाळे, गुंडप्पा बनसोडे, नरेंद्र सुवर्णकार, जैन्नोद्दीन शेख, अमोल धायगुडे, परमेश्वर जाधव, रोहिदास डांगे, राहुल शिर्के, अनिल नंजुंडे, शरणप्पा बिजगे, रविकुमार आहेरवाडीकर, इमामोद्दीन शेख, व इतर सभासद उपस्थित होते.

# गत आर्थिक वर्षीत 'बांधकाम'चा शंभर टक्के निधी खर्च

**तभा वृत्तसेवा, ॲड. विजयकुमार जाधव**
**सोलापूर, दि. ०६ सप्टेंबर-**





जिल्हा परिषदेच्या बांधकाम दोन विभागाने शंभर टक्के निधी खर्च करुन इतर विभागापेक्षा उल्लेखनीय कामगिरी केली आहे. यासाठी जिल्हा परिषदेचे सीईओ कुलदीप जंगम,अतिरिक्त सीईओ संदीप कोहिणकर यांनी विशेष प्रयत्न केले आहे. मागील आर्थिक वर्षात मध्ये बांधकाम दोन विभागाला ५५ कोटी ८३ लाख ८६ हजारांचा निधी आलेला होता. त्यातील ५४ कोटी २६ लाख ३० हजारांचा निधी खर्च करण्यात आलेला आहे. त्यात २०४ कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत. मागील आर्थिक वर्षात मध्ये बांधकाम दोन विभागाने शंभर टक्के निधी जिल्हा परिषदेच्या बांधकाम दोन विभागाने खर्च केलेला आहे.

मागील आर्थीक वर्षात मध्ये बांधकाम दोन विभागाला ३०५४ साठी ग्रामीण रस्त्यासाठी २ कोटी ७५ लाख, ५०५४ साठी १० कोटी ५० लाखांचा निधी देण्यात आला आहे. दोन्ही निधी बांधकाम विभागाने वेळेत पूर्न केलेल्या आहेत. त्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, अतिरिक्त संदीप कोहिणकर यांनी बांधकाम विभागाचे कौतुक केले आहे तसेच ग्रामीण तीर्थ क्षेत्रासाठी २ कोटी ७५ लाखांचा निधी खर्च केला आहे. आरोग्य विभागाला प्राथमिक ३ कोटी १३ लाखांचा निधी आलेला होता. त्यातील ३ कोटी ११ लाख १८ हजारांचा निधी खर्च कारण्यात आलेला आहे. पशुसंवर्धन विभागाला १ कोटी ४८ लाख ९५ हजाराचा निधी आलेला होता. त्यातील १ कोटी ४८ लाख ९५ हजारांचा निधी खर्च करण्यात आलेला आहे. शिक्षण विभागास शाळा दुरुस्ती व खोली बांधकामासाठी ६ कोटी ६० लाख १८ हजाराचा निधी आलेला होता. त्यातील ६ कोटी ६० लाख १८ हजारांचा संपूर्ण निधी खर्च करण्यात आलेला आहे. अंगणवाडी बांधकामासाठी ३ कोटी ४६ लाखांचा निधी आलेला होता. त्यातील ३ कोटी २३ लाख १९ हजारांचा निधी खर्च करण्यात आलेला आहे. महिला व बालविकास योजनासाठी २ कोटी ५० लाखांचा निधी आलेला होता. त्यातील १ कोटी ३६ लाख ६८ हजारांचा निधी खर्च करण्यात आलेला आहे.

पारधीवस्ती शौचालय व विद्युतकरणसाठी ३९ लाखांचा निधी आलेला होता. त्यातील २० लाख ३५ हजारांचा निधी खर्च करण्यात आलेला आहे. एकंदरीत जिल्हा परिषदेच्या सर्व विभागांच्या निधीचा अंदाज घेत सर्वाधिक निधी हा बांधकाम विभागाने खर्च केलेला आहे.

### अधिकारी, कर्मचाऱ्यांचे यश



जिल्हा परिषदेच्या सीईओ कुलदीप जंगम, अतिरिक्त सीईओ संदीप कोहिणकर यांनी निधी खर्चाबाबत पाठपुरावा केल्यामुळे बांधकाम विभागाचा निधी शंभर टक्के खर्च झालेला आहे. त्यामुळे यश सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांचे आहे. बांधकाम विभाग क्रमाक़ २ ला आलेला निधी मुदतीत खर्च केलेला आहे.

- **संतोष कुलकर्णी,** कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग क्रमांक दोन, जिल्हा परिषद

## प्रार्थना-आत्म्याचा आवाज परमात्म्यापर्यंत नेण्याचा मार्ग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ सप्टेंबर-**

आत्म्याचा आवाज परमात्म्यापर्यंत घेऊन जाणारी संदेश वाहक म्हणजेच प्रार्थना. ईश्वराशी संवाद साधण्याचा सोपा व सहज मार्ग म्हणजे प्रार्थना. यासाठी कोणत्याही प्रकारचा खर्च येत नाही. फक्त प्रार्थना ही हृदयापासून केलेली असावी 'असे प्रतिपादन प्रवचन प्रभाविका साध्वी प्राचीश्रीजी यांनी केले.

मनात, हृदयात भाव असल्याशिवाय भगवान कसे भेटणार. म्हणून भक्ती करताना हृदयापासून करा. प्रार्थना ही अशी गोष्ट आहे की जे लहान मुलांपासून ते वृद्धांपर्यंत,गरीब व श्रीमंत प्रत्येक जण करू शकतो. यासाठी धनदौलत लागत नाही. दिवसरात्र पूजाअर्चा करायची गरज नाही.२४ तास मंदिरात अथवा देवाजवळ बसण्याचीही गरज नाही. फक्त हृदयापासून भक्ती करा. हृदय आणि ओठ यामध्ये फक्त आठ इंचाचे अंतर आहे.ओठापर्यंत जे येते ते हृदयापासून येऊ द्या.आज आपल्याकडे जे काही ऐश्वर्य आहे ते माझ्या परिश्रमामुळे,कष्टामुळे आहे




असा गैरसमज आपला असतो. परंतु यामागचे खरे कारण हे आहे की आपण लहान असताना शाळेत मनापासून ईश्वराची प्रार्थना केलेले असता ,त्याचे हे फळ असते. लहानपणी कोणत्याही प्रकारच्या इच्छाआकांक्षा अथवा देवाकडे काहीही मागणे नसते.अतिशय स्वच्छ, निर्मळ मनाने केलेली ती प्रार्थना असते. प्रार्थनेमुळे शांतता लाभते.

## समता विद्यालयातील शिक्षकांचा अभ्यास दौरा



**सोलापूर दि. ६ सप्टेंबर-**

येथील समता मराठी विद्यालयातील शिक्षकांनी शैक्षणिक सहलीच्या निमित्ताने अभ्यासासाठी आणि संशोधनाच्या उद्देशाने अभ्यास शाळेतील मुख्याध्यापक जयवंत हक्के यांच्या मार्गदर्शनाखाली अभ्यास दौरा करण्यात आला यावेळी होस्पेट, बदामी, कुडल संगम, विजापूर, अलमट्टी धरण, आदी भारतीय पुरातत्व सर्वेक्षण संग्रहालयाला भेटी देऊन माहिती घेतली. बदामी येथील लेणी, शाकंभरी बनशंकरी देवीचे मंदिर, हॉस्पेट येथील महासिध्द शिवयोगी मंदिर, पट्टदकल्लू, विजापूर येथील कुडल संगम,आणि अलमट्टी धरण कृष्णा गार्डन मधील लेजर-शोचा आनंद लुटला या शैक्षणिक अभ्यास दौऱ्यात शाळेतील मिनाक्षी संजय राठोड,ज्योती रणसिंग, समिना मुजावर, कल्पना वाघमरे, चारुशीला म्हमाणे, मिनाक्षी दिलीप राठोड, सुनिता पवार, संतोष रजपूत, सुजाता डोंगरे, लता क्षिरसागर, रामराव चव्हाण, अनिल चव्हाण या शिक्षकांचा सहभाग होता.



## यंदा स्वत: बनवलेली गणेशमूर्ती घरात स्थापना करणार

### नेताजी प्रशालेच्या विद्यार्थ्यांचा निर्धार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ५ सप्टेंबर-**

नीलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस प्रशालेत कला विभाग, स्काऊट गाईड विभाग व इको क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने पर्यावरण पूरक गणेश मूर्ती कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेत १७५ विद्यार्थ्यांनी मातीपासून गणेशमूर्ती बनविले. या सर्व विद्यार्थ्यांना अक्कलकोटचे मूर्तिकार शिवशंकर कुंभार यांनी मार्गदर्शन केले. प्रात्यक्षिकद्वारे माहिती सांगत पंधरा टप्यातून गणेश मुर्ती बनविण्यासाठी टिप्स दिले.

माती ओलसर करण्यापासून ते शेवटच्या फिनिशिंगपर्यंत लहान सुक्ष्म गोष्टी, आकार व आकर्षकता आणण्यासाठी कृती समजावून सांगितले. तळ, सिंहासन, पोट, पाय, हात, तोंड, कान, सोंड अशा क्रमाने कृती करुन घेण्यात आले. १७५ विद्यार्थ्यांना शाळेकडून सर्व साहित्य पुरविण्यात आले. विद्यार्थ्यांना टप्याटप्याने शिस्तबद्धरीतीने बसवून प्रात्यक्षिके करुन घेण्यात आले.

आकर्षक रंगसंगती कशी करावी याचे मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी आनंदाने या उपक्रमात सहभाग घेतले. यंदा स्वतः बनवलेली गणेशमूर्ती घरात स्थापना करणार असल्याचे विद्यार्थ्यांनी निर्धार केला. सजावट, पूजा पाठ मांडणी, आरती, सामुहिक पूजेची महत्त्व समजावून सांगितले. संस्थेचे अध्यक्ष अण्णाराव कुंभार यांनी सहभागी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे कौतुक केले. याप्रसंगी प्रशालेचे मुख्याध्यापक रविशंकर कुंभार, पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे, इको क्लबचे प्रमुख शिवकुमार शिरुर, प्रशालेचे कलाशिक्षक तथा स्काऊटर शैलेश स्वामी, क्रीडा शिक्षक अशोक पाटील आदी उपस्थित होते.

## रेल्वेच्या रनिंग स्टाफचे आंदोलन

**सोलापूर, दि. ६ सप्टेंबर-**



ऑल इंडीया लोको रनिंग स्टाफ असोसिएशन सोलापूर विभागाच्या वतीने रनिंग स्टाफच्या प्रलंबीत मागण्यासाठी सोलापूर, कुर्डुवाडी, दौंड, वाडी आणि पुणताम्बा चालक लॉबीच्या समोर धरणे आंदोलन करण्यात आले. या धरणे आंदोलनासाठी संघटनेचे विभागीय अध्यक्ष एस. जे. निगडे, विभागीय सचिव पिंटू रॉय, राजकुमार, निरजकुमार, आशुतोषकुमार, अनिल वर्मा, योगेश मडके, आकाश घाडगे, संतोष चौधरी यांचे मार्गदर्शन लाभले.

**रनिंग स्टाफच्या प्रमुख मागण्या याप्रमाणे**

मुख्यालय विश्राम ४६ तास मिळावे, कामाचे तास मालगाडीसाठी ८ व यात्री गाडीसाठी ६ तास करा, सलग २ रात्री पेक्षा अधिक सलग रात्री ड्युटी लावणेत येऊ नये, ३६ तासापेक्षा जास्त मुख्यालयाच्या बाहेर ठेऊ नये, मायलेज भत्ता डी.ए. २५% ने वाढविण्यात यावा, रनिंग स्टाफकडे टूल कीट व ट्रॉली बॅग देण्याचा निर्णय मागे घेण्यात यावा, एफ.एस.डी.इंजीन क्रू कडे न देता तो इंजीनमध्ये कायम स्वरुपात बसवणेत यावा, रनिंग स्टाफच्या रात्री भत्ता, पे स्केल आणि ग्रेड पे इ. विषयी भेदभाव व विसंगती दूर करावी, मायलेज भत्तामध्ये ७०% सूट देणेत यावी, रिक्त जागा त्वरीत भरणेत याव्यात.

## शमा उर्दू शाळेत रंगला बहुभाषिक मुशायरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ सप्टेंबर-**



विद्यार्थ्यां मध्ये साहित्या विषयी गोडी निर्माण व्हावी व साहित्याचे विविध प्रकारची माहिती विद्यार्थीदशे पासूनच व्हावी या हेतूने शमा उर्दू शाळेत बहुभाषिक काव्य संमेलनाचे आयोजन बज्मे गालीबचे अध्यक्ष प्रा बशीर परवाज यांच्या अध्यक्षतेखाली व कर्नाटकाचे ज्येष्ठ साहित्यिक चांद अकबर , मराठीचे ज्येष्ठ साहित्यिक पद्माकर कुलकर्णी , उर्दू विकास चौंडेशनचे सुलतान शेख यांच्या प्रमुख उपस्थित पार पडला.

अबरार नल्लामंदू , प्रा. पी पी कुलकर्णी यांनी सर्व उपस्थितांचे बुके व भेट वस्तु देऊन स्वागत केले. प्रस्ताविक माजी मुख्यध्यापक कुद्दूस नल्लामंदू यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. बशीर परवाज प्रमुख पाहुणे चांद अकबर (कलबुर्गी) पद्माकर कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांसाठी राबविलेल्या या अभिनन उपक्रमाचे कौतुक केले. यानंतर शादां पितापूरी यांच्या ईश्वस्तनाने मुशायरेची सुरुवात झाली. यात प्रा नरेंद्र गुंडेली, साबीर सोलापूरी , मयुरेश कुलकर्णी , मीर अफजल , कवि मुबारक शेख, सय्यद मुख्तार, पदमाकर कुलकर्णी (कलबुर्गी ) शाहीन सदफ , प्रा. शफी चोबदार, शुकूर अहमद शऊर, जुबेर चौकी, अय्यूब अहमद अय्यूब यांनी आपल्या उर्दू, मराठी, हिंदी कविता सादर करून दाद मिळविली.स्व. नसीम मन्नन सोलापुरी यांची दखनी कविता अबरार अहमद यांनी सादर केली सूत्रसंचालन प्रा. अय्यूब नल्लामंदू यानी केले तर मजहर अल्लोळी यांनी आभार मानले. कार्यक्रमास हाजी टी. ए. चांदा, जाफर बांगी, इकबाल सय्यद, शफी कैप्टन, मन्नान शेख, शाह वायज, योगीन गुर्जर, इकबाल बागबान, शमीम चांदा, मुसैब एजाज सय्यद उपस्थित होते.

## महिलांनी कायद्याचे संरक्षण अन् योजनांचा लाभ घ्यावा : ॲड. राऊत



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ६ सप्टेंबर-**

मुलगी पोटात असल्यापासून आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर तिच्या संरक्षणासाठी कायदा खंबीरपणे तिच्या पाठीशी उभा आहे. तसेच सरकारनेही प्रत्येक महिला मग ती आर्थिक, मानसिक, शारीरिक, सामाजिक, विधवा, परित्यक्ता, वृध्द असेल तर तिला स्वयंसिद्धा बनवण्यासाठी सरकारी योजना आणल्या आहेत. तरीही अप्रिय व दुर्दैवी घटना महिलांबाबत घडत आहेत. त्यामुळे महिलांना त्यांच्या हक्कासाठी आणि संरक्षणासाठी जागरूक असणे आवश्यक आहे. असे प्रतिपादन सोलापूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण मुख्य लोक अभिरक्षक ॲड. स्नेहल राऊत यांनी व्यक्त केले.

प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सोलापूर मो.सलमान आझमी व सचिव उमेश देवर्षी यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवार, दि. २ सप्टेंबर रोजी मोदी परिसरातील मसिहा नगर येथील मसिहा सामाजिक बहुउद्देशीय संस्था व सोलापूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांविषयक कायदे व योजना मार्गदर्शन शिबिराचे आयोजन पास्टर मंचले यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले.

यावेळी व्यापीठावर सामाजिक कार्यकर्ते अमित मंचले, ॲड. मोहन कुरापाटी, ॲड. अनिल वासम, डॉ. नोव्हेल अनमोल आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी ॲड. झुरळे यांनी भारतीय संविधानातील कायदा सर्वांसाठी समान आणि संधीची समानता यावर प्रकाश टाकले.तसेच सर्वसामान्य लोकांसाठी विधी सेवा प्राधिकरण कोणत्या प्रकारचे काम करते याची माहिती दिली. यावेळी संयोजक ॲड.मोहन कुरापाटी यांनी ही मार्गदर्शन केले. प्रास्ताविक ॲड.अनिल वासम यांनी केले. सूत्रसंचालन शाम आडम यांनी तर आभार मसिहा संस्थेचे अध्यक्ष अमित मंचले यांनी मानले.



## जिल्हास्तरीय राष्ट्रीय विज्ञान नाट्योत्सवात सहिने प्रशाला प्रथम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ सप्टेंबर-**

राष्ट्रीय नाट्योत्सव प्रादेशिक विद्या प्राधिकरण, राज्य विज्ञान व गणित शिक्षण संस्था रवि नगर नागपूर यांच्यातर्फे आयोजित केलेल्या जिल्हा राष्ट्रीय विज्ञान नाट्योत्सवात शतकोत्तर रौप्य महोत्सवी श्री सरस्वती मंदिर संस्था संचलित शतक महोत्सवी स.हि.ने. प्रशालेने सादर केलेल्या ह्यूमनॉईड या विज्ञान नाटिकेला प्रथम क्रमांक मिळाला.

माध्यमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद सोलापूर यांच्यातर्फे सोलापूर शहरांत जिल्हास्तरीय स्पर्धेचे आयोजन केले होते. या नाटकाची विभागीय स्तरावर निवड झाली आहे. या नाटकाचे लेखन जयप्रकाश कुलकर्णी यांनी केले. या एकांकिकेला दिग्दर्शन प्रशालेच्या मुख्याध्यापिका नीता येरमाळकर आणि सुचेता पोकळे तर मार्गदर्शन श्रीपाद येरमाळकर यांनी केले.

संवेदनशील रोबोट या मुख्य कल्पनेवर आधारित कृत्रिम बुद्धिमत्ता व समाज या विषयाशी निगडित या एकांकिकेत प्रशालेत स.हि. ने प्रशालेतील विद्यार्थ्यांनी अचूक पाठांतर, संयमित अभिनय करून सर्वांची मने जिंकली.या यशाबद्दल श्री सरस्वती मंदिर संस्थेचे अध्यक्ष रघुनाथ दामले, सचिव प्रिति चिलजवार, खजिनदार सुधीर देव आणि माध्यमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद सोलापूर उप शिक्षणाधिकारी स्वाती हवेली यांनी सर्वांचे अभिनंदन केले.



सोलापूर : विशेष सरकारी वकील प्रदिपसिंह राजपूत यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना तरुण भारतचे संचालक चैतन्य पेठे आणि तरुण भारतचे कायदेशीर सल्लागार प्रकाश जाधव.



सोलापूर : दैनिक तरुण भारतच्या मुख्य संपादकपदी पदोन्नती झाल्याबद्दल तसेच वाढदिवसानिमित्त प्रशांत माने यांना शुभेच्छा देताना संभाजी आरमारचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत डांगे, कार्याध्यक्ष तात्या वाघमोडे आणि त्यांचे सहकारी.



सोलापूर : दैनिक तरुण भारतच्या मुख्य संपादकपदी पदोन्नती झाल्याबद्दल तसेच वाढदिवसानिमित्त प्रशांत माने यांना शुभेच्छा देताना ज्येष्ठ पत्रकार बाळासाहेब वाघमोडे, राजकुमार पवार.

# गणेशोत्सवासाठी पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त

## ● शहरात ६९ ठिकाणी फिक्स पॉईंट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ सप्टेंबर-**

गणेशोत्सव काळात कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी खबरदारीचा उपाय म्हणून पोलिसांनी मोठ्या सार्वजनिक गणेश मंडळांसह गर्दीची ठिकाणे,बाजारपेठा आणि संवेदनशील ठिकाणी साध्या वेशातील गस्तीसोबतच सीसीटीव्ही कॅमेरेची देखरेख ठेवली जाणार आहे.तसेच पोलिस अधिकारी,कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत.



गणेशोत्सवास शनिवारपासून (आज) प्रारंभ होणार असून,१७ सप्टेंबरला विसर्जन होणार आहे.या कालावधीत अनुचित घटना टाळण्यासाठी शहर पोलिसांनी बंदोबस्ताचे नियोजन केले आहे. पोलिस आयुक्त एम.राजकुमार,यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पोलिस उपायुक्त विजय कबाडे यांनी बंदोबस्ताची आखणी केली आहे.चोरट्यांकडून दरवर्षी गर्दीत भाविकांचे मोबाईल, दागिने चोरीच्या घटना घडतात.अशा घटना रोखण्यासाठी गुन्हे शाखेने सराईत गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाई सुरू केली आहे.तसेच,साध्या वेशातील पोलिस कार्यरत असतील. बंदोबस्तात वरिष्ठ अधिकाऱ्यांसह पोलिस कर्मचारी,गुन्हे शाखेची पथके,क्यूआरटी,तसेच होमगार्ड आणि बॉम्ब शोधक व नाशक (बीडीडीएस) पथकांचा समावेश असेल.शिवाय,गणेश मंडळांचे पदाधिकारी आणि पोलिस मित्रांची मदत घेतली जाणार आहे.



**● ६९ ठिकाणी फिक्स पॉईंट :** विसर्जन होईपर्यंत शहर परिसरात ६९ ठिकाणी मुख्य फिक्स पॉईंट लावण्यात आलेले आहेत. याशिवाय पोलिस आयुक्तालयांच्या हद्दीतील सात पोलिस ठाण्यांतर्गत सशस्त्र पोलिस दल तैनात करण्यात आले आहे. शिवाय गल्ली बोळात विविध मार्गावर पायी पेट्रोलिंगही असणार आहे. शहर पोलिस आयुक्तालयांतर्गत सात पोलिस ठाण्यांच्या दुचाकीवरुन अंमलदार बीट मार्शल पेट्रोलिंग करतील. यामध्ये दिवसा प्रत्येक पोलिस ठाण्याचे पेट्रोलिंग असेल.

**● भाविकांसाठी मदत केंद्रे :** शहराच्या मध्यवर्ती भागात भाविकांसाठी पोलिस मदत केंद्रे सुरू करण्यात येणार आहेत. तसेच, काही प्रमुख चौकांमध्ये मनोऱ्यावरून गर्दीतील गैरप्रकारांवर लक्ष ठेवण्यात येणार आहे.

**● असा असणार बंदोबस्त :** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरात प्रतिष्ठापना म्हणजेच मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. तीन पोलीस उपायुक्त, पाच सहायक पोलीस आयुक्त, १८ पोलीस निरीक्षक,६४ सहायक पोलीस निरीक्षक, ८६९ पोलिस अंमलदार, ५०० पुरुष आणि महिला होमगार्ड तसेच एकएसआरपी एफची तुकडी बंदोबस्तासाठी तैनात असणार आहेत.



# भारतरत्न इंदिरा गांधी अभियांत्रिकी महाविद्यालयात शिक्षक दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ सप्टेंबर-**

भारतरत्न इंदिरा गांधी अभियांत्रिकी महाविद्यालयात शिक्षक दिन साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. दीपक ननवरे या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल देशमाने हे होते.

कार्यक्रमास सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी विद्यार्थिनी उत्साहाने भाग घेतले आहे. या कार्यक्रमात सुरुवातीला प्रमुख पाहुण्याची असते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमास सुरुवात केली. या कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल देशमाने यांनी सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या बद्दल मुलांना माहिती दिली. तसेच शिक्षक आणि शिष्य गुरु द्रोणाचार्य आणि अर्जुन श्रीकृष्ण याबद्दल ही माहिती दिली. डॉ. दीपक ननवरे बोलताना म्हणाले, मशीन आणि शिक्षक यांच्यातील तुलना आणि शिक्षकाचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना महत्त्वाचे का आहे. तसेच ससा आणि कासव यांच्यातील पुढील शर्यत विन विन आणि कन्सिस्टींग किती महत्त्वाची आहे. हे पटवून विद्यार्थ्यांना सांगितले तसेच कोगनटिव्ह, सायको मोटर, स्किल कशा उपयोगी आहेत आणि या स्कील फक्त टीचर शिक्षक देऊ शकतो याबद्दल शिक्षकाचे महत्त्व सांगितले. या कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते



सरिता सालीमठ, आरती कुसेकर, रंजना घोडके, सुकन्या दिंडोरे, गीता स्वामी, धानेश्वरी वाणी, सिद्धाराम चिट्टे

# दैनिक 'तरुण भारत' गणेशोत्सवच्या अध्यक्षपदी सरिता सालीमठ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ सप्टेंबर-**

दैनिक तरुण भारतच्या गणेशोत्सव मंडळाच्या अध्यक्षपदी सरिता सालीमठ यांची तर उपाध्यक्षपदी उपसंपादिका आरती कुसेकर यांची निवड करण्यात आली. इतर पदाधिकारी पुढीलप्रमाणे कार्याध्यक्ष सिद्धाराम चिट्टे, खजिनदार लेखापाल रंजना घोडके, सचिव सुकन्या दिंडोरे, पूजा प्रमुख गीता स्वामी, धानेश्वरी वाणी यांची निवड करण्यात आली.




# रखडलेले वीज कंपनीचे काम पूर्ण

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग, दि. ६ सप्टेंबर-**

वळसंग (ता. दक्षिण सोलापूर) येथील महावितरण वीज कंपनीकडून आचेगावातील मल्लिकार्जुन महादेव उपाध्ये यांनी घराच्या वीज जोडणीसाठी २०१७ साली अर्ज केला होता.

परंतु तांत्रिक अडचणीमुळे महावितरण कंपनीने जोडणी केली नव्हती. उपाध्ये यांचे कागदपत्र हरवले होते. पुन्हा अर्ज करा, असं सांगितल्याने ६ एप्रिल २०२४ ला पुन्हा अर्ज केला. सात वर्षांपासून रखडलेले काम पूर्ण झाल्याचे उपाध्ये यांनी सांगितले.







# सिद्धेश्वर पॉलिटेक्निकमध्ये शिक्षक दिनानिमित्त कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ सप्टेंबर-**

श्री सिद्धेश्वर वुमेन्स पॉलिटेक्निक येथे शिक्षक दिनानिमित्त फायनान्शियल एज्युकेशन लेव्हल-२ या विषयावर सेबीद्वारे प्राध्यापक व पालक यांच्यासाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेला मार्गदर्शक म्हणून डॉ. राजशेखर येळीकर (सेबी सर्टिफाइड ट्रेनर) यांचे मार्गदर्शन लाभले. या कार्यशाळेची शुभ सुरुवात मान्यवरांच्या हस्ते रोपट्याला पाणी घालून करण्यात आली.

या कार्यशाळेमध्ये डॉ. राजशेखर येळीकर यांनी स्टॉक मार्केटमध्ये गुंतवणुकीचे फायदे सांगितले तसेच स्टॉक मार्केटमध्ये गुंतवणूक करावी असे आव्हान केले. भारतातील ६९% टक्के लोक हे आर्थिक निरक्षर आहेत हे सांगताना त्यांनी आर्थिकदृष्ट्या साक्षर कसे बनता येईल हे सांगण्यावर भर देऊन त्याविषयी मार्गदर्शन केले. सेविंग खात्यामध्ये गरजे इतका पैसा ठेवणे, स्टॉक मार्केट हा सट्टा बाजार नाही, कंपनीचे ग्राहक न बनता मालक कसे बनता येईल, याविषयी मार्गदर्शन केले. सेबीद्वारे ऑनलाईन प्रश्नावली घेऊन विजेत्यांना डॉ. राजशेकर येळीकर यांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आले. कार्यक्रमास कॉलेजचे प्राचार्य गजानन धरणे, ट्रेनिंग प्लेसमेंटचे प्रमुख प्रमोद मेणसे, प्रा डॉ. नीता आळंगे, सूत्रसंचालन प्रा. गायत्री लंगोटी यांनी केले व आभार प्रा. प्रमोद मेणसे यांनी मानले.

# दिलीप माने विचार मंचच्यावतीने शहरात २१०० गणेशमूर्तींचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. ६ सप्टेंबर-**

विघ्नहर्त्या गणेशाच्या आगमनाची तयारी घरोघरी सुरु झाली आहे. गणरायाच्या आगमनासाठी सारेच उत्सुक आहेत. आपल्या घरीही विघ्नहर्त्या गणेशाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना व्हावी असे प्रत्येकाला वाटत असते. तोच विचार घेऊन दिलीप माने विचार मंचच्यावतीने घरोघर लंबोदर हा उपक्रम घेऊन यंदाही मोठ्याप्रमाणात देखण्या गणेशमूर्तीचे वाटप करण्यात येत आहे.

माजी आमदार दिलीप माने यांच्या संकल्पनेतून आणि युवा नेते पृथ्वीराज माने यांच्या मार्गदर्शनात मागील ४-५ वर्षांपासून प्रतीवर्षी गणेशमूर्तीचे वाटप करण्यात येते. यावेळीही दिलीप माने विचार मंचच्या वतीने घरोघर लंबोदर हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. शहरातील बसवेश्वर नगर, देगाव, सैफुल, मजरेवाडी, चौगुलेवस्ती, नीलम नगर यसह शहरातील इतर काही भागात मोठ्याप्रमाणात सुंदर अशा गणपती बाप्पाच्या तब्बल २१०० मूर्तीचे वाटप करण्यात आले आहे. गणपती बाप्पाच्या आगमनाचा आनंद असताना या उपक्रमांतर्गत होणाऱ्या गणेश मूर्तीच्या वाटपामुळे नागरिकांमध्ये आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. स्वतः पृथ्वीराज माने यांनी गणेश भक्तांना मूर्ती वाटप करताना दिसून आले. त्यामुळे नागरिकांनी या उपक्रमाचे कौतुक करत पृथ्वीराज माने यांचा सत्कार करत सन्मानही केला जात असल्याचे चित्र पाहायला मिळाले.



**कोरोना काळापासून गणेशमूर्तींचे वाटप :** गणेश मूर्ती वाटपा संदर्भात बोलताना माने म्हणाले की, कोरोनाच्या कालावधीमध्ये अनेक जणांची आर्थिक परिस्थिती हलाखीची झाली होती. अशा परिस्थितीत विघ्नहर्ता गणेशाचा उत्सव साजरा करण्यासाठी कोणताही खंड पडू नये म्हणून दिलीप माने विचार मंचच्या वतीने आम्ही सोलापूर शहरांमध्ये गणेश मूर्तीचे वाटप करण्याचा निर्णय घेतला. तेव्हापासून आजतागायत प्रतिवर्षी मोठ्या प्रमाणात गणेश मूर्तीचे वाटप केले जात आहे. दरम्यान, यावेळी सुख समृद्धी घेऊन येणाऱ्या गणपती बाप्पाचं वाजत गाजत स्वागत करण्याचे आवाहन पृथ्वीराज माने यांनी केले.

# ऐन गणेशोत्सवात रेशन कार्डधारक शिधापासून वंचित?

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ६ सप्टेंबर-**

शासनाकडून प्रत्येक वेळी योजना जाहीर करते आहे व ऐन सणा दिवशी किंवा सण झाल्यानंतर शिधा मिळतो. सणा आधी शिधा उपलब्ध झाला तर बाजारपेठमध्ये सुद्धा या वस्तूचे दर स्थिर राहतात परंतु शिधा वेळेमध्ये मिळत नसल्याने जास्तचे पैसे घालवून शेवटी सणामुळे बाजारा मधुन वस्तू खरेदी कराविच लागते. त्यामुळे नागरिकांच्या खिशाला झळ बसत आहे.




शासनाकडून गौरी गणपती सणनिमित्त फक्त ९० टक्के आनंदाचा शिधा उपलब्ध करून दिला जाणार आहे.शिधा १० टक्के कमी प्रमाणात मिळणार असल्याने रेशन दुकानदारा मधुन नाराजी व्यक्त केली जात आहे.तसेच शासनाचे मते १०० टक्के शिधा वाटप होत नाही. व १०० टक्के रेशनकार्ड धारक हे शिधा घेण्यासाठी येत नाहीत. यामुळे ९० टक्के शिधा वाटप शासनाकडून केले जाणार आहे.परंतु वास्तविक पाहता आमचे अनुभव असे आहेत कि मागील प्रत्येक वेळी शासनाकडून सणाच्या आदल्या दिवशी किंवा सणा दिवशी शिधा उपलब्ध करून दिला जात होता. व राज्यामध्ये एकाच दिवशी शिधावाटप चालू होत असल्याने मशीन वर लोड येऊन सर्वर प्रॉब्लेम येत असलेने मशीन बंद पडत होते व मशीन न चालण्यामुळे ऐनवेळी शासनाकडून सणाचे दिवस असल्याने ऑफलाईन वाटप करण्याची परवानगी दिली जात होती.यामुळे रेशनकार्ड धारक यांना १०० टक्के ऑफलाईन शिधा वाटप केले जात होते त्या मुळे परिणामी १०० टक्के ऑनलाईन ट्रांजेक्शन होत नाही असे गृहीत धरून शिधा कमी केला आहे. परंतु हे शासनाचे चुकीचे धोरण असुन या मुळे किमान आठ ते नऊ टक्के लाभार्थी हे आनंदाचा शिधा मिळण्यापासून वंचित राहणार आहेत, असे सोलापूर जिल्हा रास्त भाव धान्य दुकानदार जिल्हा संघटना महासंघ जिल्हाध्यक्ष विजय मंडलिक यांनी सांगितले.







**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

# सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## रेवणसिद्ध रोडगीकर यांना मुख्याध्यापक जीवन गौरव पुरस्कार जाहीर

**सोलापूर दि. ६ सप्टेंबर-**

सोलापूर जिल्हा मुख्याध्यापक संघाच्यावतीने दिला जाणारा मानाचा मुख्याध्यापक जीवन गौरव पुरस्कार यंदा मुख्याध्यापक संघाचे माजी विद्या सचिव रेवणसिद्ध रोडगीकर यांना जाहीर झाला आहे. शनिवार दि.१४ सप्टेंबर रोजी सकाळी १०.०० हुतात्मा स्मृती मंदिर येथे आयोजित कार्यक्रमात खासदार प्रणिती शिंदे, शिक्षक आमदार जयंत आसगांवकर, ज्ञानेश्वर म्हात्रे , शिक्षण उपसंचालक डॉ राजेंद्र अहिरे, शिक्षण निरीक्षक रावसाहेब मिरगणे यांच्या हस्ते रेवणसिद्ध रोडगीकर यांना मुख्याध्यापक जीवन गौरव पुरस्कार प्रदान येणार आहे.



रोडगीकर हे श्री बृहन्मठ होटगी संस्थेत ३३ वर्षे मुख्याध्यापक म्हणून कार्य केले आहेत. शहर व जिल्हा मुख्याध्यापक संघाच्या कार्यकारिणीवर अनेक वर्षे ते विविध पदे भुषविले आहेत. जिल्हा व राज्य मुख्याध्यापकांच्या अधिवेशनात विविध विषयांवर शोध निबंध सादर केले आहेत.एक अभ्यासू मुख्याध्यापक म्हणून त्यांची गणना आहे.



## क्राईम वृत्त...

### टेन्शनमध्ये ब्लेडने मारून घेतले

**सोलापूर, दि. ६ सप्टेंबर-**

दारूच्या नशेत घोंगडे वस्ती इंदिरा वसाहत येथे घरगुती टेन्शनमध्ये स्वतःच्या डाव्या हातावर ब्लेडने मारून घेतल्याची घटना ५ सप्टेंबर रोजी घडली यात अजय नागनाथ शिंदे (वय-३१,रा.भवानी पेठ) हा जखमी झाला. उपचारासाठी सिव्हिलमध्ये दाखल केले.

---

### किरकोळ कारणावरुन मारहाण

**सोलापूर, दि. ६ सप्टेंबर-**

घरामध्ये जेवत बसले असताना अभि सकट, सुजत सकट, विजय सकट यांनी माझ्या घरात का आलास म्हणून तिघांनी लथाबुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना ५ सप्टेंबर रोजी घडली. यात प्रशांत विजय सकट (वय-२४, रा.जय मल्हार चौक,बुधवार पेठ) हा जखमी झाला.उपचारासाठी सिव्हीलमध्ये स्वतः दाखल झाला आहे.

---

### चक्कर आल्याने महिला जखमी

**सोलापूर, दि. ६ सप्टेंबर-**

कामाला जाताना बेडर पुलावर अचानक चक्कर येऊन पडल्याने डोक्यात व हातापायास मार लागून जखमी झाल्याची घटना ५ सप्टेंबर रोजी घडली. यात चिन्ना विराट कलाटकर (वय- ३४, रा.बेडर पूल) हे जखमी झाले. उपचारासाठी सिव्हिलमध्ये मित्र राजू बोनसे यांनी दाखल केले.

---

### वयोवृद्ध महिला जखमी

सोलापूर, दि. ६ सप्टेंबर-

मार्केट यार्ड ते वसंत विहार पुणे नाका येथे मुलासोबत दुचाकीवरून जाताना अचानक गाडी स्लीप होऊन शेळगी ब्रिज सर्विस रोड येथे पडल्याने वयोवृद्ध महिला जखमी झाल्याची घटना पाच सप्टेंबर रोजी घडली. यात मीराबाई विठ्ठलसिंग ठाकूर (वय-७१, १८७ मोठे वस्ती, बुधवार पेठ) ही महिला जखमी झाली. उपचारासाठी सिव्हिलम ध्ये मुलगा मनोज ठाकूर यांनी दाखल केले.

---

### गरम पाणी पडल्याने जखमी

**सोलापूर, दि. ६ सप्टेंबर-**

आंघोळीसाठी गॅस शेगडीवर पाणी गरम करण्यास ठेवले असता पाणी उतरवताना हातातून निसटल्याने गरम पाणी दोन्ही पायावर पडून जखमी झाल्याची घटना ५ सप्टेंबर रोजी घडली. यात कुमार नाथा कांबळे (वय-४५, रा. राजस्व नगर, विजापूर रोड) हे जखमी झाले. उपचारासाठी सिव्हिलमध्ये येथे भाची अनुराधा साखरे यांनी दाखल केले.

---

### पाय घसरून पडल्याने जखमी

**सोलापूर, दि. ६ सप्टेंबर-**

घरी बाथरूमला जाताना पाय घसरून पडल्याची घटना ५ सप्टेंबर रोजी घडली. यात वंदना हनुमान बऱ्हाणपुरे (वय-१९,रा.बापूजी नगर) ही मुलगी जखमी झाली.उपचारासाठी सिव्हिलमध्ये स्वतः दाखल झाली आहे.

---

### शेतात काम करताना सर्पदंश

**सोलापूर, दि. ६ सप्टेंबर-**

शेतात काम करताना डाव्या पायास सर्पदंश झाल्याची घटना ५ सप्टेंबर रोजी दुपारी बारा वाजता घडली. यात शालन मारुती लोकरे (वय-५५, रा.अनगर तालुका मोहोळ) यांना सर्पदंश झाला. उपचार मोहोळ येथे करून पुढील उपचारासाठी सिव्हिलमध्ये सून मोहिनी लोकरे यांनी दाखल केले.

---

### मशीन लागल्याने जखमी

**सोलापूर, दि. ६ सप्टेंबर-**

घरी फरशी कट करण्याच्या मशीन हाताला व डाव्या पायाला लागण्याची घटना पाच सप्टेंबर रोजी साडेअकरा वाजता घडली. यात जावेद मोती मुलाणी (वय ४५ रा. कासेगाव, तालुका दक्षिण सोलापूर) हे जखमी झाले. उपचारासाठी सिव्हिलम ध्ये शेजारी गोपाळ चव्हाण यांनी दाखल केले.

---

### दुचाकी स्लिप होऊन जखमी

**सोलापूर, दि. ६ सप्टेंबर-**

तुळजापूर ते सोलापूर येत असताना हगलूर गावाजवळ दुचाकी स्लीप होऊन पडल्याने वीस वर्षीय तरुण जखमी झाल्याची घटना ५ सप्टेंबर रोजी घडली. यात महेश शर्मा (वय २० रा. हिप्परगा) हा जखमी झाला. उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटल येथे मदतनीस तुकाराम बंडगर यांनी दाखल केले.

### तरुणास सात जणांकडून मारहाण

**सोलापूर, दि. ६ सप्टेंबर-**

उमरड गावात प्रेम संबंधातून परशु घनवट व बाळू घनवट व इतर पाच जणांनी मिळून मारहाण केल्याची घटना ५ सप्टेंबर रोजी घडली. यात दिलीप पांडुरंग शिंदे (वय-४६, रा. उमरड, तालुका करमाळा) हे जखमी झाले.

# जिल्ह्यातील मध्यम प्रकल्प भरण्यासाठी मोठ्या पावसाची गरज

- जिल्ह्यात सरासरी ६३.४६ टक्के उपयुक्त पाणीसाठा
- उजनीसह हिंगणी आणि पिंपळगावढाळे १०० टक्के भरले

**तभा वृत्तसेवा/ अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. ०६ सप्टेंबर -**

**यंदा सर्वच नक्षत्रातील पाऊसधारा कोसळल्याने शेतकरी फिलगुड झाला. सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यातच वार्षिक सरासरीच्या तुलनेत १०५ टक्के पाऊस झाल्याची गुडन्युज नुकतीच कृषी खात्याकडून मिळाली. इतकेच नाहीतर खरिपाच्या पेरण्याही दीडपट झाल्याने बळीराजा जाम खुशीत आहे. मात्र आगामी नक्षत्रातील पावसाने हातातोंडाशी आलेला घास हिरावून घेवू नये, अशीच माफक अपेक्षा शेतकरी बांधवांची आहे. दरम्यान, जिल्ह्यात सरासरीच्या तुलनेत आताच १०५ टक्के जरी पाऊस झाला असला तरी उजनी धरण आणि एकदोन मध्यम प्रकल्प वगळता अजून इतर प्रकल्प ६० ते ७० टक्केच भरल्याची माहिती समोर येत आहे. सध्या जिल्ह्यात सरासरी ६३.४६ टक्के इतकाच उपयुक्त पाणीसाठा आहे.**

लाभक्षेत्र विकास प्राधिकरणकडून आलेल्या दैनंदिन अहवालानुसार आजतागायत जिल्ह्यात उजनी प्रकल्पात १०४.४६ टक्के उपयुक्त पाणीसाठा आहे. याच धरणात गतवर्षी याच काळात अवघा १७.८४ इतका उपयुक्त पाणीसाठा होता. सध्या हे धरण ११९ टीएमसी भरले आहे. तर मध्यम प्रकल्पांपैकी एकरूख प्रकल्प ३७.६९ टक्के भरला आहे. या साठवण तलावात मराठवाड्यातून येणारे पाणी तामलवाडी, सुरतगाव आणि माळुंब्रा गावात अडविल्याने मोठा पाऊस पडूनही हा तलाव भरलेला नाही. यानंतर हिंगणी साठवण तलाव १०० टक्के भरला आहे. जवळगाव मध्यम प्रकल्पात ४१.९३ टक्के, मांगी ८७.१९, आष्टी ७२.८४, बोरी ३०.५५ तर पिंपळगाव ढाळे हा प्रकल्प १०० टक्के भरला आहे.

यंदा मृग नक्षत्रात वेळेवर पाऊस झाल्याने खरिपाची पेरणीही दीडपटीने झाली आहे. पिकेही जोमदार आली आहेत. दरम्यान, जुलैमध्ये पावसाने थोडी ओढ दिली होती. यामुळे काही तालुक्यातील पिकांनी दुपार धरायला सुरूवात केली होती मात्र ऑगस्ट महिन्यात पुन्हा पावसाने जोर धरल्याने खरिपाच्या पिकांना जीवदान मिळाले आहे. तर सप्टेंबरच्या सुरूवातीलाही पाऊसधारा चांगल्याच कोसळू लागल्याने शेतकरीवर्ग आनंदात दिसत आहे. तसा तर पुणे विभागातच सरासरीच्या तुलनेत मुबलक पाऊस झाल्याने आगामी वर्षासाठी पाणीसाठाही मोठ्या प्रमाणात होणार आहे. पुणे, सोलापूर, सांगली, सातारा आणि कोल्हापूर



या भागातील मोठी धरणेही ओव्हरफ्लो झाली आहेत. आता मराठवाड्यातही चांगला पाऊस पडू लागल्याने अवघ्या राज्यातच यंदा मुबलक पाणीसाठा होणार आहे. सोलापूर जिल्ह्याची वरदायिनी उजनी धरणही ओसंडून वाहू लागल्याने जिल्ह्यातील उत्पन्नाचा टक्का वाढणार आहे. इतकेच नाहीतर ऊस पिकाचीही मोठ्या प्रमाणात लागवड होणार आहे. सध्याही जिल्ह्यात काही दिवसांपासून पाऊसधारा सर्वदूर कोसळत असल्याने शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. तसं तर हवामान विभागाकडून या पावसाचा मुक्काम अजून ८ दिवस असल्याचे सांगितले जात होते. या पावसामुळे सोयाबीन, मूग, ऊस, कापूस, तीळ, मका आदी विविध पिकांना फायदा होणार आहे. तर फळबागा, फुलबागाही बहरणार आहेत. इतकेच नाहीतर गतवर्षी कमी झालेल्या उसाचीही लागवड यंदा मोठ्या प्रमाणात होण्याचे संकेत शेतकरी बांधवांकडून मिळत आहेत. सध्याच्या पावसाने पिकांना धोका होत नाही मात्र आगामी नक्षत्रातील पाऊसधारा जास्त कोसळल्या तर मात्र हातातोंडाशी आलेल्या खरिपातील पिकांना धोका होण्याची शक्यता आहे.

### पावसाळ्यात तरी जिल्हा टँकरमुक्त का होत नाही?

गतवर्षी दुष्काळी स्थिती निर्माण झाल्याने जिल्ह्यातील अनेक गावात टंचाईसदृष्य स्थिती निर्माण झाल्याने २५० पर्यंत टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत होता. गावोगाव किंवा वाडीवस्तीवर नवीन पाणीटँकर चालू करताना संबंधित तहसीलदार आणि जिल्हा प्रशासनाकडून अनेक निकष लावले होते. आता जिल्हाभरात मुबलक पाऊस पडूनही अक्कलकोट आणि दक्षिण सोलापूर तालुक्यातील ५ गावांना अजून १० टँकरने पाणीपुरवठा सुरुच आहे. या गावातही चांगला पाऊस झाला आहे मात्र पाण्याचा चांगला साठाही असताना हे पाणीटँकर चालू कसे? असा सवाल जाणकार नागरिकांतून उठत आहे. यामुळे संबंधित तहसीलदार, जिल्हा प्रशासनातील अधिकाऱ्यांनी या पाणी टँकरची शहानिशा करूनच किमान पावसाळ्यात तरी जिल्हा टँकरमुक्त करावा, अशीही मागणी होत आहे.

# मिळकत कर थकबाकीपोटी मनपाने दोन शाळांचे कार्यालय केले सील

- महापालिकेची धडक वसुली मोहिमेअंतर्गत कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ सप्टेंबर-**

सोलापूर : सोलापूर शहरातील मिळकतकर थकबाकीदारांच्या विरोधात महापालिका मिळकतकर विभागाने कारवाईची मोहीम सुरू केली आहे. दरम्यान, मिळकत कर थकबाकी पोटी आज शहरातील दोन शाळांचे कार्यालय व मुख्याध्यापक कक्ष सील करण्यात आले आहे.

सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त शीतल तेली - उगले यांच्या आदेशाने व उपायुक्त आशिष लोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली मिळकत कर थकबाकीदारांविरोधात कारवाईची मोहीम सुरू करण्यात आली आहे.आज दि.६ सप्टेंबर २०२४ रोजी मालमत्ता कर विभागाकडील वसुली मोहिमेअंतर्गत विजापूर रोड, नेहरुनगर येथील मिळकत क्रमांक ३०१०८४ पोस्ट बेसिक आश्रम शाळा याची माहे सप्टेंबर २०२३ अखेर पर्यंतची थकबाकी २ लाख ११ हजार ७०४ व मिळकत क्रमांक ३०१२२८ प्राथमिक गांधी आश्रम शाळा नेहरूनगर यांची रक्कम ४ लाख ६० हजार ८८६ रुपये इतक्या थकबाकीपोटी दोनही प्रशालांचे मुख्याध्यापक कक्ष व कार्यालय सील करण्यात आले आहे.सोलापूर शहरातील सर्व थकबाकीदार मिळकतदारांनी त्यांच्या मालमत्ता कराची थकबाकीची रक्कम भरुन महानगरपालिकेस सहकार्य करावे अन्यथा अशा मिळकतदारांची स्थावर मालमत्ता सील करण्यात येईल, असा इशारा उपायुक्त आशिष लोकरे यांनी दिला आहे.

### उपायुक्त लोकरे यांनी दिला कारवाईचा इशारा



# उद्यानात डॉ. आंबेडकर आणि माता रमाई यांचे पुतळे केव्हा उभारणार ?

- विश्वरत्न डॉ. आंबेडकर उद्यान समितीचा सवाल
- कार्यवाही करण्याची आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली मागणी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ सप्टेंबर-**

सम्राट चौक येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाचे काम अर्धवट स्थितीत थांबले आहे. डॉ. आंबेडकर आणि माता रमाई यांचे पुतळे केव्हा उभारणार असा सवाल उपस्थित करत उद्यानाचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असून या कामाचे थर्ड पार्टी ऑडिट करावे, अशी मागणी डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यान कृती समितीने आयुक्तांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

कृती समितीच्या वतीने महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांना निवेदन देण्यात आले. उद्यानातील माता रमाई व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा उभारणीची वाट सर्व अनुयायी गेल्या ३ वर्षांपासून पाहत आहेत. चबुतऱ्याचे काम वर्षभरापूर्वी अत्यंत निकृष्ट झाले आहे. ॲम्फी थिएटरचे काम देखील अर्धवट स्थितीत बंद आहे. पुतळे उभे करण्यासाठी नेम की अडचण कोणती व त्याबाबत महापालिका प्रशासन गप्प का आहे? असा सवाल कृती समितीने उपस्थित केला आहे. माता रमाई व डॉ. आंबेडकर यांचे पुतळे उभे करण्यासाठी तयार केलेल्या चबुतऱ्यासाठी ८५ लाख इतका खर्च झाल्याचे सांगण्यात येत आहे. सदरचे काम अत्यंत निकृष्ट व अर्धवट अवस्थेत आहे. यासाठी उपायुक्त यांच्याकडे निवेदन देण्यात आले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर व माता रमाई यांचे पुतळे लवकर उभारावेत, अन्यथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान कृती समितीच्यावतीने आंदोलन करण्यात येईल, असा इशारा निवेदनाद्वारे दिला आहे.

# ह. दे. प्रशालेत पर्यावरण पूरक कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ सप्टेंबर-**

शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन यांच्या प्रोत्साहनानुसार पर्यावरण पूरक गणेश मूर्ती बनवण्याचे प्रशिक्षण शिबिर झाले. उपक्रमामध्ये प्रशालेचे १०० विद्यार्थी सहभागी झाले होते.



प्रशालेच्या सभागृहात कलावंत विकास गोसावी यांनी सर्व विद्यार्थ्यांना मूर्ती बनवण्याचे प्रशिक्षण दिले. विद्यार्थ्यांना पर्यावरण पोषक संदेश मिळावा तसेच मूर्ती कामाचा आनंद मिळावा या हेतूने कलाशिक्षक कोरवलीकर, रत्नपारखी, रोणे यांनी परिश्रम घेतले. मुख्याध्यापिका श्रीमती दीपा फाटक यांच्या हस्ते गोसावी यांचा सत्कार केला. पर्यवेक्षक मोतीबने, कमळे कार्याध्यक्ष व पर्यवेक्षक सर्वगोड यांनी या उपक्रमासाठी मार्गदर्शन केले.

# मेहता माध्यमिक शाळेत शिक्षक दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ सप्टेंबर-**

कै. वि. मो. मेहता माध्यमिक शाळेत शिक्षक दिन उत्साहात साजरा झाला. या दिवशी विद्यार्थ्यांकडून त्यांच्या शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली जाते.



या दिवशी इयत्ता १० वीच्या विद्यार्थ्यांनी दिवसभर शाळेचे कामकाज पाहिले. इयत्ता ९ वीच्या वर्गातून द्वितीय आलेली विद्यार्थिनी गुंजन कोकाटे हिने मुख्याध्यापकपद भूषविले तर तृतीय आलेली विद्यार्थिनी कविता बिराजदार हिने पर्यवेक्षकाची भूमिका बजावली. इतर विद्यार्थ्यांनी शिक्षक म्हणून कार्यभार सांभाळला. शिक्षकांचा आदर आणि कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी एक छोटासा कार्यक्रम विद्यार्थ्यांनी आयोजित केला. यामध्ये सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. मुख्याध्यापिका श्रुती बागेवाडी तसेच गुंजन व कविता यांनी शिक्षक दिनाविषयी विचार प्रकट केले. सूत्रसंचालन स्नेहा पाटील व समर्थ जाधव यांनी केले.

# हजारात एक ब्रास वाळू या शासन धोरणाचा जिल्ह्यात बोजवारा

- आजही वाळूचा दर सोन्याप्रमाणे खडी अन् क्रश सॅन्डही भाव खातंय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ सप्टेंबर-**

राज्यातील नागरिकांना स्वस्त दराने रेती मिळण्यासाठी तसेच अनधिकृत रेती उत्खननाला आळा घालण्यासाठी नवे सर्वंकष सुधारित रेती/वाळू धोरण राज्य शासनामार्फत जाहीर करण्यात आले होते. १ मे २०२४ या महाराष्ट्र दिनी या धोरणाची अंमलबजावणी सुरु करण्यात आली. मोबाईलच्या माध्यमातून रेती/ वाळू सर्वसामान्यांना एका क्लिकवर मिळणार असल्याची खात्री महसूल मंत्री राधाकृष्ण विखे- पाटील यांनी दिली.

मात्र सर्वसामान्य नागरिकांच्या बांधकामाला आजही वाळूच मिळत नसून, खडी अन् क्रश सॅन्डवर आपली बांधकामे उरकावी लागत आहेत. दरम्यान, आजही वाळूला सोन्याचा दर असल्याने या वाळूच्या वाट्याला कोणीही जात नसून, त्या शासन निर्णयाचे काय झाले? असा सवाल जाणकार नागरिकांतून उठत आहे.



सोलापूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी मुंबई येथे राज्याचे महसूल कार्यालयातील उपायुक्त, विभागीय आयुक्त, अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी यांच्याशी या विषयाबाबत बैठक घेवून वाळू उत्खनन व्यवसायात शिरलेल्या अपप्रवृत्तींना नष्ट करणे याला प्राधान्य देणे गरजेचे असल्याचे सांगितले. राज्य शासनाने जाहीर केलेल्या रेती/वाळू धोरणानुसार रेतीचे/ वाळूचे उत्खनन, साठवणूक आणि ऑनलाईन प्रणालीद्वारे विक्री करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले होते. या नवीन धोरणामुळे सर्वसामान्यांना वाळू / रेती सोप्या पध्दतीने खरेदी करता येईल अशी आशा सर्वांना होती. राज्याचे वाळू आणि गौण खनिज बाबतचे धोरण नुकतेच जाहीर करण्यात आले आणि त्यानुसार नागरिकांना एक हजार रुपयात एक ब्रास वाळू मिळणार होती मात्र अद्याप तरी या निर्णयाची अंमलबजावणी सोलापूर जिल्ह्यात झाल्याचे दिसून येत नाही. यामुळे सर्वसामान्य नागरिकांना वाळूचा हा जाहीर झालेला शासन निर्णय मृगजळाप्रमाणेच वाटू लागला आहे. तर खडी, क्रश सॅन्डचे भावही खडी क्रशर व्यावसायिक हळूहळू भाव वाढवू लागल्याचे दिसून येत आहे.

### नद्यांचे पाणी ओसरताच वाळू ठेके लिलावाने देणार

गतवर्षी सोलापूर जिल्ह्यात वाळूचे ठेके देण्यासाठी निविदा काढली मात्र हरित लवादाच्या अटी अन् शर्तीनुसार एकाही ठेकेदारांनी निविदा भरली नाही. यामुळे गतवर्षी वाळू लिलाव झाले नाहीत. यंदा मात्र नद्यांचे पाणी ओसरताच वाळू लिलावाच्या पुन्हा निविदा निघतील आणि ठेके देण्यात येतील. तोपर्यंत शासनाकडून वाळूबाबतचे नवीन काही धोरण आल्यास त्या पध्दतीने सर्वसामान्यांना वाळू पुरवठा करण्यात येणार महसूल उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर यांनी सांगितले.

# पोलीस प्रशिक्षण केंद्राच्या प्राचार्यपदी विजय चव्हाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ सप्टेंबर-**



महाराष्ट्र राज्याच्या गृह विभागाने महाराष्ट्र पोलीस अधिनियम मधील तरतुदीनुसार राज्यातल्या पाच अधिकाऱ्यांच्या गुरुवारी बदल्या केल्या आहेत.यात राज्य पोलीस बल गट क्रमांक १० चे समादेशक विजय चव्हाण यांची सोलापुरातील पोलीस प्रशिक्षण केंद्राच्या प्राचार्य पदी नियुक्ती करण्यात आली आहे. वैशाली कडूकर यांची बदली झाल्याने त्यांच्या रिक्त जागेवर विजय चव्हाण यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

याशिवाय सोलापूरच्या तत्कालीन पोलीस अधीक्षक व सध्या पोलीस उपायुक्त बृहन्मुंबई येथे कार्यरत असलेल्या तेजस्वी सातपुते यांची पोलीस उपायुक्त पुणे शहर पदी नियुक्ती करण्यात आली आहे.तसेच संदीपसिंह गिल यांची पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण,पंकज देशमुख यांची पोलीस उपायुक्त बृहन्मुंबई,राज तिलक रोशन यांची सहाय्यक पोलीस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था) आणि निमित्त गोयल यांची पोलीस उपायुक्त बृहन्मुंबई या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे.यासंबंधीचे आदेश गुरुवारी सायंकाळी प्रसिद्ध करण्यात आले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - ८८०

**तुझे विश्वरुप पण आघवें । माझिये दिठीसि गोचर होआवें ।**
**ऐशी थोर आस जीवें । बांधोनि आहे ।।**

मोहग्रस्त अवस्थेतून अर्जुनाला बाहेर काढण्यासाठी भगवंतानी वेगवेगळया विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. सदरचे मार्गदर्शन ऐकत असतांना अर्जुनाने विविध प्रश्न विचारुन स्वत:ची ज्ञान मिळविण्याची इच्छा पूर्ण करुन घेण्याचा उत्कृष्ट प्रयत्न आत्तापर्यन्त केला आहे. युध्दात मी कोणाला मारणार नाही. तसेच आपण हातात शस्त्र धरणार नाही असे म्हणणा-या अर्जुनाला तू मारणारा कोण आहेस ? तुझ्या हातून हे सगळे मरतीलच कशावरुन ? तु यांच्या हातून मारला जाणार नाहीस हे कशावरुन ? असे बोलता-बोलता भगवंतांनी मी म्हणजे कोण ? हा देह म्हणजे नेमके काय आहे ? हे सर्व जीव कसे तयार झाले ? हा सर्व जीवांचा कर्ता कोण



? या सर्व जीवांची उत्पत्ती, वाढ, लय कसा होतो ? अशा अनेक विषयाचे स्पष्टीकरण भगवंतांनी केले. सर्व प्राणीमात्र आपल्यापासून भिन्न नाहीत. तसेच आपणही या प्राणीमात्रांपासून भिन्न नाही. सर्व लहान-मोठे जीव हे एकाच ईश्वराचा अंश असून त्यांची सेवा म्हणजे ईश्वराची सेवा असल्याचेही भगवंतानी अर्जुनाला सांगीतले. जन्म आहे त्याला मृत्यू आहेच याचे स्पष्टीकरणही भगवंतानी केले. मरणे, मारणे हे आपल्या हातात नसून, त्याचा कर्ता होण्याचा प्रयत्न तू करु नकोस, असे सांगून भगवंतानी अर्जुनाला तू फक्त निष्काम कर्म कर असा सल्ला दिला.

केलेल्या कर्मात जर अर्जुन अडकला तर त्याला मोह, चिंता, शोक, दु:ख, क्लेश निर्माण होतील असे भगवंतांना वाटले. म्हणून अर्जुनाने त्याच्या वाटयाला आलेले कर्म नितिनियमाला अनुसरुन नि:स्वार्थ भावनेने करावे असे भगवंतानी सांगीतले. आपल्यापासून हे जीव वेगळे नाहीत. त्या सर्वांचा समावेश एका भगवंतातच होतो. भगवंत हा सगुणरुप नसून तो निर्गुणरुप आहे. सर्व प्राणीमात्र म्हणजेच चालते-बोलते भगवंत आहेत. चांगला, वाईट, पशु, पक्षी, बोलका, मुका ही सर्व आपलीच रुपे आहोत. या सर्व जीवांचे एकत्रीकरण म्हणजेच एक भगवंत होय. भगवंतासमोर लहान-मोठा, आप-पर हा भेद नसतो. कारण ही सर्व जीवसृष्टी म्हणजेच भगवंत आहे. भगवंताला पाहायचे असेल तर केवळ सुंदर, चांगले, आकर्षक शारीरिक रुप म्हणून पाहता येणार नाही. तर चांगल्या-वाईटाची सर्व गोळा बेरीज म्हणून त्याच्याकडे पाहावे लागेल. अकारण माणूस भगवंतात सुध्दा भेद पाहतो. जीवसृष्टीमध्ये लहान-मोठा, आपला-परका असा भेद करतो. आपणाला विशेष असे रुप, स्वरुप नसून सर्व जीव आपलेच अंश असल्याने आपण विश्वरुपच आहोत असे भगवंत म्हणाले. अर्जुनाने हे सर्व शांत ऐकले, आणि कसलीही भीडभाड न धरता तो म्हणाला,

**तुझे विश्वरुप पण आघवें । माझिये दिठीसि गोचर होआवें ।**
**ऐशी थोर आस जीवें । बांधोनि आहे ।।.**

अर्थात, अर्जुन म्हणाला, भगवंता हे सर्व जीव तुझीच रुपे आ-हेत, म्हणजे तू विश्वरुपी आहेस. तर मग मला ते विश्वरुप पाहण्याची इच्छा आहे. ते विश्वास तू मला दाखवावे अशी इच्छा अर्जुनाने प्रकट केली आहे. भगवंतांवरील विश्वासामुळे अर्जुनाने विश्वरुप दाखव असे म्हटले. आपणाला असा एखादा सखा मिळतो का, की ज्याचे खरे रुप तरी आपण पाहु शकतो. माणसांच्या सहवासात असुनही आपलेही रुप कळत नाही आणि त्यांचेही खरे रुप कळत नाही.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : शनिवार
दि. ७ सप्टेंबर २०२४
विक्रम संवत् २०८०,
शके - १९४६
संवत्सर - क्रोधी नाम
मास - ज्येष्ठ
शु. चतुर्थी (१७.३६)
ऋतु - वसंत
नक्षत्र - चित्रा (१२.३३)
योग - ब्रह्मा (२३.१५)
करण - बव (अहोरात्र)
सुर्योदय - ०६.२७
सूर्यास्त - १८.४६
दिनविशेष - गणेश चतुर्थी, चांगला दिवस

....राहू काल....
रविवार : दु.४.३० ते ६.००
सोमवार : स. ७.३० ते ९.००
मंगळवार : दु. ३ ते ४.३०
बुधवार : दु. १२ ते १.३०
गुरुवार : दु. १.३० ते ३.००
शुक्रवार : स.१०.३० ते १२
शनिवार : स. ९ ते १०.३०

### राशीभविष्य

**मेष :** जीवनसाथीच्या सहकार्याने कौटुंबिक समस्या दूर होतील. फायदेशीर चर्चा घडून येई. भोग-विलास प्रवृत्तीत वाढ होईल. व्यापार चांगला चालेल.

**वृषभ :** सहनशिलता कमी होऊ देऊ नका. आर्थिक अडचणी येऊ शकतील. व्यापार, नौकरीमधील स्थिती मध्यम राहील. जास्त विश्वास, जास्त उत्साह आपले होणारे काम बिघडवू शकतात.

**मिथुन:** अविवाहितांना लग्नाचे प्रस्ताव येतील. कामकाजाचे क्षेत्र विस्तारीत होईल. व्यापाराकरिता आजचा दिवस शुभ जाईल.

**कर्क :** विश्वासदर्शक वातावरण राहील. स्वत:च्या प्रयत्नाने सम ाजात मान मिळेल.

**सिंह :** प्रतिष्ठित व्यक्तींच्या उदारपणामुळे आपली कार्यक्षम ता वाढणार आहे. कामकाजात सुधारणा होईल. विद्यार्थ्यांनी अभ्यासाकडे लक्ष द्यावे.

**कन्या :** व्यापार चांगला चालेल. कार्यक्षेत्रात नवीन काम ाची योजनेमुळे फायदा होईल. मेहनतीचे उचीत फळ मिळेल.

**तुळ :** नवीन कामाची आखणी कराल. फायदेशीर बातम्या ऐकण्यास मिळतील. जुना रोग उदभवण्याची शक्यता आहे.

**वृश्चिक :** साहित्य वाचनाची गोडी वाढणार आहे.आधिकारी लोकांशी नवीन संबध जुळतील. चैनीच्या वस्तू घेण्याकडे आपला ओढा राहील. रोजगारात प्रगीत होईल. खर्चावर नियंत्रण राखा.

**धनु :** आपली कार्यकुशलता व इतरांच्या सहयोगाने कामात यश मिळेल. आपले विचार योग्य असतील. कर्मचाऱ्यांवर लक्ष ठेवा.

**मकर :** नातेवाईंकाशी असलेले संबंध मर्यादित ठेवा. मुलांच्या प्रकृतीत सुधारणा होईल. विरारधीन असलेले कामे पार पडतील. व्यवसायिक निर्णय वेळेवर घ्या.

**कुंभ :** लोकांशी संपर्क वाढवून आपण आपल्या योजना पूर्णत्वास न्याल. राजकीय लोकांपासून फायदा होईल. व्यापारात नवीन संबंध प्रस्तापित होतील. म ुलांच्या कामाकडे लक्ष द्या.

**मीन :** रचनात्मक कार्यात प्रगती होईल. मुलांच्या इच्छा पूर्ण होतील. फायद्याच्या संधी मि ळतील. मित्रांची मदत मिळेल. व्यवहारात नम्रता व सहनशिलता आवश्यक आहे.

# जिल्ह्यात 'स्वच्छ माझे अंगण'ची अंमलबजावणी करा

**सीईओ कुलदीप जंगम यांचे आवाहन**

**२५ सप्टेंबरपर्यंत अभियान राबविणार**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ सप्टेंबर-**

राज्याच्या ग्रामविकास विभाग व पाणी व स्वच्छता विभागाच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छतेच्या बाबींची सवय अंगीकृत करण्यासाठी आता जिल्ह्यात



कुटुंबस्तरावर स्वच्छ माझे अंगण हे अभियान राबवण्यात येणार आहे. १ सप्टेंबर ते २५ सप्टेंबर या कालावधीत हे अभियान राबविण्यात येणार असून यात उत्कृष्ट स्वच्छता असणाऱ्या कुटुंबांचा ग्रामपंचायतीकडून गौरव करण्यात येणार आहे. या अभियानाची जिल्हयात प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याचे आवाहन सोलापूर जिल्हा परिषदेचे प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी केले.

स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा २ अंतर्गत वैयक्तिक शौचालय, घनकचरा व्यवस्थापन,



(कुटुंबस्तर), सांडपाणी व्यवस्थापन (कुटुंबस्तर) राबवीत असलेल्या राज्यातील सर्व कुटुंबस्तरावर या बाबींची प्रभावीपणे अंमलबजावणी होऊन नित्य नियमाने स्वच्छतेच्या बाबींची सवय अंगीकृत करण्यासाठी जे कुटुंब वैयक्तिक शौचालय, सांडपाणी व्यवस्थापनकरिता शोषखड्डा/परसबाग/पाझरखड्डा, घनकचरा व्यवस्थापनाकरिता कंपोस्ट खतखड्डा अथवा घरगुती खतखड्डा आणि कुटुंबस्तरावर कचराकुंड्या याबाबतची उपलब्धता करून घेतली असून, त्यांचा नियमितपणे वापर करतात अशा कुटुंबांना प्रोत्साहन देणे आणि त्यांचे अनुकरण करण्याकरिता इतर ग्राम स्थांना, कुटुंबधारकांना त्यांच्या प्रमाणेच वैयक्तिक स्वरुपांच्या स्वच्छतेच्या सुविधा आपल्या घरात किंवा परिसरात उपलब्ध करून घेण्यासाठी उद्युक्त करणे ही या अभियानाची संकल्पना आहे.

### निवडीचे निकष

- * घरगुती खतखड्डा, परसबाग
- * वैयक्तिक शोषखड्डा, पाझरखड्डा
- * वैयक्तिक शौचालय
- * घरगुती कचराकुंड्या

जिल्ह्यातील सर्व कुटुंब स्तरावर वैयक्तिक शौचालय, सांडपाणी व्यवस्थापनकरीता शोषखड्डा / परसबाग/पाझरखड्डा, घनकचरा व्यवस्थापनकरीता कंपोस्ट खत खड्डा अथवा घरगुती खतखड्डा आणि कुटुंबस्तरावर कचराकुंडी या बाबींची प्रभावीपणे अंमलबजावणी होवून स्वच्छतेची सक्य अंगीकृत करण्यासाठी लोक चळवळ उभी करण्याच्या उद्देशाने जिल्ह्यामध्ये स्वच्छ माझे अंगण अभियानाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**-कुलदीप जंगम, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद**

### अभियान अंमलबजावणी कालवधीचे टप्पे

- * अभियान कालावधी
  दि. १ सप्टेंबर ते २५ सप्टेंबर
- * पडताळणी कालावधी
  दि. २६ सप्टेंबर ते 30 सप्टेंबर
- * प्रशस्तीपत्र वितरण
  दि. २ ऑक्टोबर

कुटुंबस्तरावरील प्रत्येक घटकाचे शास्त्रशुद्ध पद्धतीने व्यवस्थापन करण्यासाठी गावातील सर्व कुटुंबामध्ये स्वच्छ माझे अंगणवाडी अभियान राबविण्याचे निर्देश देण्यात आले असून उत्कृष्ट व्यवस्थापन करणाऱ्या कुटुंबांना २ ऑक्टोबर रोजी ग्रामपंचायत ग्रामसभेमध्ये सरपंच व ग्रामसेवक यांच्या संयुक्त स्वाक्षरीने प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

**- अमोल जाधव, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, पाणी व स्वच्छता विभाग**

# रोटरी क्लब ऑफ सोलापूरतर्फे आरोग्य चिकित्सा, चाचणी शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ सप्टेंबर-**

रोटरी क्लब ऑफ सोलापूरतर्फे असंघटित कामगारांसाठी अक्कलकोट रोड येथे मोफत आरोग्य चिकित्सा आणि चाचणी शिबीर झाले. अक्कलकोट रोडम धील कामगारांसाठी कन्हय्या टेक्सपोर्ट या ठिकाणी डॉ. व्ही. एम मेडिकल कॉलेज आणि श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वो पचार रुग्णालय यांच्या सहकार्याने हे शिबिर आयोजित केले होते. यात २२० कामगारांची तपासणी करण्यात आली.

यात ब्लड शुगर, थायरॉईड इत्यादी मोफत करण्यात आल्या तसेच तज्ज्ञ डॉक्टर कडून हृदय तपासणी, नेत्र तपासणी, डेंटल तपासणी इत्यादी करण्यात आल्या. शिवाय या सर्व कामगारांचे आभा कार्ड काढण्यात आले जेणेकरून ते शासनाच्या विविध आरोग्य योजनांचा फायदा घेऊ शकतात. एकूण २२० पैकी २० कामगार याना प्राथमिक चाचणी आणि त्यातील निष्कर्ष च्या अनुषंगाने पुढील चाचण्या साठी रेफर करण्यात आले आणि रोटरी क्लब ऑफ सोलापूर त्याचा योग्य तो पाठपुरावा करेल. शिबीर यशस्वी करण्यासाठी डॉ. वि. एम. मेडिकल कॉलेज आणि श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वो पचार रुग्णालय याचे असोसिएट प्राध्यापक डॉ गजानन जत्ती, सिनियर रेसिडेंट डॉ तृप्ती, इतर तज्ज्ञ डॉक्टर, इंटर्न, लॅबोरेटरी विभागाच्या वैष्णवी चौगुले आणि आरोग्य सहायक यांचे सहकार्य लाभले

या शिबीरचे नियोजन करण्यात कॉलेज चे असिस्टंट प्राध्यापक आणि आपले रोटे आणि कम्युनिटी डायरेक्टर (मेडिकल प्रोजेक्ट्स) डॉ. प्रत्युष काबरा यांचे विशेष योगदान आणि समन्वय होते. रोटे निलेश पोफलिया यांचे सहकार्य लाभले. शिबीर यशस्वी करणायसाठी अध्यक्ष रोटे सुनील माहेश्वरी, क्लब सचिव ब्रिजकुमार गोयदानी, जयेश पटेल माजी अध्यक्ष रोटे डॉ ज्योती चिडगुपकर सर्व रोटे धनश्री केळकर अलोक गुप्ता संदीप झवेरी आकाश बाहेती यांनी परिश्रम घेतले.

# राज्यभर सरासरी १२१ टक्के पाऊस; १०२ टक्के खरिपाचा पेरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ सप्टेंबर-**

यंदा जून महिन्यातील मृग, आर्द्रा नक्षत्रच नाहीतर उर्वरित सर्वच नक्षत्राच्या पावसाने दमदार हजेरी लावल्याने राज्यात सरासरीच्या १२१ टक्के पाऊस झाला असून, १०२ टक्के पेरण्या झाल्या आहेत अशी माहिती राज्याच्या कृषी विभागाच्या वतीने देण्यात आली. गेल्या वर्षी याच सुमारास सरासरीच्या ८१.४ टक्के पाऊस झाला होता. १ जून ते २ सप्टेंबर पर्यंत १००२ मि.मी. पाऊस झाला आहे.

राज्यात खरिपाचे १४२.०२ लाख हेक्टर क्षेत्र असून, त्यापैकी १४४.९२ लाख हेक्टर क्षेत्रावर म्हणजेच १०२ टक्के पेरण्या झाल्या आहेत. केवळ पाच तालुक्यात ५० ते ७५ टक्के पाऊस झाला असून, ३०५ तालुक्यात १०० टक्क्यांपेक्षा जास्त पाऊस झाला आहे. ज्या ठिकाणी अतिवृष्टी झाली आहे; अशा भागातील खरिपाची पिके सडून जाण्याची भीती



असली तरी ज्या भागात वेळेवर आणि पिकांना पोषक पाऊस झाला आहे, त्या ठिकाणी खरिपाचा हंगाम यंदा चांगला साधणार असल्याची माहिती काही जाणकार शेतकऱ्यांनी दिली. विशेषत: मराठवाड्याच्या काही जिल्ह्यात गत आठवड्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे म ोठ्या प्रमाणात पिकांचे नुकसान झाल्याने या भागातील उत्पन्नात मोठ्या प्रमाणात घट होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. मात्र यंदाच्या मुसळधार पावसाम ुळे राज्यातील बहुतांश सर्वच धरणात ९० टक्केच्याही वर पाणीसाठा झाला आहे. इतकेच नाहीतर अजून दीड ते २ महिने पावसाळा असल्याने आणि मोठ्या पावसाची नक्षत्रे असल्याने ही धरणे, मोठे साठवण तलाव भरभरून वाहण्याचे संकेत आहेत. यामुळे आगामी रब्बी हंगाम आणि उन्हाळी हंगामातील पिके बळीराजाच्या पदरात पडण्याची आशा वाटत आहे.

### २४ तास वीज पुरवठा केल्यास भरीव उत्पन्न

राज्यातील शेतकऱ्यांना वीज पुरवठा सुरळीत मिळत नसल्याने उत्पन्नात मोठी घट होत आहे. राज्यभरातील शेतकऱ्यांना शेतीसाठी २४ तास वीज पुरवठा झाल्यास रब्बी आणि उन्हाळी हंगामात मोठ्या प्रमाणात उत्पन्न वाढेल. इतकेच नाहीतर फळांच्या बागाही चांगल्या फुलतील.

**- सोमनाथ पाटील, प्रगतशील शेतकरी, सोलापूर**

# हमाल मापाडी कामगारांनी प्रशासनाला दिला अल्टिमेटम

**टप्पा दुरुस्तीचा ठराव रद्द न केल्यास सोमवारपासून कामबंदचा इशारा**

**तभा वृत्तसेवा ,**
**सोलापूर , दि. ६ सप्टेंबर -**

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये कार्यरत असणाऱ्या हमाल मापडी कामगारांनी आंदोलन आता तीव्र स्वरूपाचे केले आहे. टप्पा दुरुस्तीचा ठराव रद्द करण्याच्या मागणीकडे शासन आणि प्रशासन गांभीर्याने विचार करत नसल्याने, बाजार समितीत कार्यरत असणाऱ्या सोलापूर जिल्हा हमाल, मापाडी, माथाडी श्रमजीवी कामगार समन्वय समितीने आता बेमुदत कामबंद आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

दरम्यान आपल्या प्रलंबित मागण्यांच्या पूर्ततेसाठी हमाल , मापडी , माथाडी श्रमजीवी कामगार समन्वय समितीने प्रशासनाला सोमवार ( दि. ९ ) सप्टेंबर पर्यंतचा अल्टिमेटम दिला आहे. बाजार समिती प्रशासकीय कार्यालय, जिल्हा उपनिबंधक कार्यालय, पोलीस आयुक्त कार्यालय, कामगार आयुक्त कार्यालय, या प्रशासकीय कार्यालयांना यासंबंधीचे पत्रव्यवहार करून कामबंद आंदोलन करण्याचा इशारा संघटनेच्या वरिष्ठ पातळीवरून देण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने संयुक्त समितीच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा केली जाणार आहे. यावेळी समितीचे अध्यक्ष शिवाजी शिंदे, संचालक शिवानंद पुजारी, उपाध्यक्ष भिमा सिताफळे, अध्यक्ष सिध्दाराम हिप्परगी, सचिव दत्ता मुरुमकर, विशाल मस्के, शिवलिंग शिवपुरे, सचिन बहिरजे, अण्णा कांबळे, मुग्यप्पा धनोरे, किरण मस्के आदींची उपस्थिती होती.

शासन आणि प्रशासन कामगारांच्या म ागण्यांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे. आंदोलन सुरू करून आठ दिवस उलटले तरी देखील यावर निर्णय होत नाही. आता आंदोलन उग्र करण्याची वेळ आली आहे. टप्पा दुरुस्तीचा ठराव रद्द न केल्यास आंदोलन यापेक्षा अधिक उग्र आणि तीव्र स्वरूपाचे होईल, त्यास सर्वस्वी शासन आणि प्रशासन जबाबदार राहिले.

**- भिमा सिताफळे, उपाध्यक्ष**
**कामगार समन्वय समिती सोलापूर**

### कामगारांच्या मागण्या

* भुसार बाजाराकरीता लागू करण्यात आलेला टप्पा दुरुस्तीचा ठराव रद्द झाला पाहिजे.
* संपूर्ण माथाडी कामगाराच्या हमाली तोलाईचा भरणा माथाडी बोर्डात झाला पाहिजे.
* माथाडी कामगाराकरीता घरकुल व प्राथमिक उपचार केंद्र झालेच पाहिजे.
* कांदा विभागामधील माल राखणे बंधनकारक करु नये.



# लोकमंगल कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयात शिक्षक दिन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ सप्टेंबर-**

श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयात भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिन साजरा करण्यात आला . कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून विद्यार्थी प्रतिनिधी सोहम बोधले हे लाभले होते.

या कार्यक्रमात महाविद्यालयांतील विद्यार्थी मंजुनाथ कुंभार, धम्मेश गवळी, तृप्ती जाधवर आदींनी आपल्या मनोगतातून डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे कार्य व शिक्षक दिनाचे महत्त्व सांगितले. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी गणेशमूर्ती व इतर भेटवस्तू देऊन उपस्थित शिक्षकांचा सत्कार केला. महाविद्यालयातील विद्यार्थी प्रतिक्षा गुंड, दर्शना शिंदे, प्रतिभा शिंदे, आशिष पालवे, मंजुनाथ कुंभार, प्रतिक्षा कोळी, आरती खूने, सायली सोनवणे, सोहम बोधले, दक्षता देशमुख आदींनी महाविद्यालयातील अध्यापनाची एकदिवसीय जबाबदारी पार पाडत अतिशय उत्साहाने शिक्षक दिन साजरा केला. सूत्रसंचालन विद्यार्थी प्रसाद नेटके व आभार प्रदर्शन विद्यार्थीनी प्रज्ञा मंद्रूपकर यांनी केले. या कार्यक्रमाचे समन्वयन महाविद्यालयाच्या तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी केले.या कार्यक्रमास म हाविद्यालयाचे प्राचार्य प्रदीप आदलिंगे व प्रा. सागर म हाजन यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमास प्रा. आशिष सरकाळे, प्रा. सायली बडेकर, प्रा. वर्षा म ानेदेशमुख, प्रा. मंजुश्री डोंगरे तसेच महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

# विणकर महामंडळासाठी ५०० कोटींची तरतूद करण्यास भाग पाडू

**कॉ. आडम मास्तर यांची विणकर मेळाव्यात गर्जना**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.६ सप्टेंबर-**

महाराष्ट्र शासनाने पहिल्यांदाच विणकरांसाठी विणकर आर्थिक विकास महामंडळाची घोषणा १६ मार्च २०२४ रोजी केली. परंतु या महामंडळासाठी अत्यंत तुटपुंजे असे निधीची तरतूद आहे. यामुळे या महामंडळाचा विणकरांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक विकास होऊ शकत नाही. आज महाराष्ट्रात साधारणत: लाखोंच्या संख्येने विणकर आहेत. त्या विणकरांचा मुख्य व्यवसाय हातमाग हेच आहे. यामुळे विणकर आर्थिक विकास महामंडळाच्या निधीत ५०० कोटी रुपयांची तरतूद



करण्यास महाराष्ट्र शासनाला भाग पाडू, अशी गर्जना माधव नगर येथील विणकरांच्या मेळाव्यात कॉ. नरसय्या आडम यांनी केली.

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने सोलापुरातील विणकर व हातमाग कामगार यांच्या विविध समस्या व प्रलंबित मागण्या संदर्भात हातमाग कामगार चंद्रकांत चीटमिल यांच्या अध्यक्षतेखाली मेळावा पार पडला. यावेळी व्यासपीठावर यशोदा दंडी, गजेंद्र दंडी, बाळकृष्ण मल्याळ, वीरेंद्र पद्मा, नागनाथ मादगुंडी आदींची उपस्थिती होती. कॉ. आडम पुढे म्हणाले की, हातमाग व्यवसाय हा घरगुती आणि कुटुंबातील सर्वांनी मिळून करण्याचा व्यवसाय आहे. उत्पादनाप्रमाणे मजुरी मिळत नाही. त्यामुळे यांना आर्थिक स्थैर्य प्राप्त होत नाही. शासनाने २ जून २०२३ रोजी विणकरांसाठी उत्सव भत्ता महिलांसाठी १५ हजार आणि पुरुषांसाठी १० हजार ची घोषणा केली होती. मात्र त्याचा प्रत्यक्ष लाभ सोलापुरातल्या विणकरांना मिळालेला नाही. यासाठी जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्यासोबत प्रदीर्घ चर्चा व सल्लामसलत करून उत्सव भत्ता मिळवून देण्यासंबंधी तसेच काम गार आयुक्त नागपूर येथे प्रत्यक्ष भेटून चर्चा करूनही सोलापूरातील विणकर उत्सव भत्त्यापासून वंचित राहिले. विणकर व हातमाग काम गारांच्या वतीने ज्येष्ठ नेते माजी आमदार कॉ. नरसय्या आडम (मास्तर) यांचा यथोचित सत्कार करून आगामी विधान सभा निवडणुकीत कोणत्याही अमिषाना व प्रलोभनांना बळी न पडता प्रचंड मताधिक्याने विजयी करण्याचा एकमुखी निर्णय या मेळाव्यात घेण्यात आला. प्रास्ताविक विजय हरसुरे यांनी केले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन बाळकृष्ण मल्याळ यांनी केले.



# लायन्स क्लबतर्फे इको फ्रेंडली गणपती बनविण्याचे प्रशिक्षण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ६ सप्टेंबर-**

लायन्स इंटरनॅशनल अंतर्गत लायन्स क्लब ऑफ सोलापूर ट्विन सिटीच्या वतीने इको फ्रेंडली गणेश मूर्ती प्रशिक्षण घेण्यात आले.

यावेळी क्लबचे सन्माननीय लायन नंदिनी जाधव झोन चेअरमन एम.जे.एफ लायन डॉ. राहुल चंडक, डॉ. कृष्णा चंडक, एम.जे.एफ लायन ममता बुगडे, लायन मुकुंद जाधव, द्वितीय उपाध्यक्ष इकोफ्रेंडली सेवाकार्य प्रमुख लायन सातलिंग शटगार यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. सचिव लायन सोमशेखर भोगडे, खजिनदार लायन प्रभाकर जवळकर, राजेश परसगौंड, लायन सागर पुकाळे आदी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांना मुख्यमंत्र्यांकडून दिलासा

## राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना
## युनिफाईड निवृत्ती योजना
## सुधारित निवृत्तीवेतन योजनेतून एका पर्यायाची निवड करण्याची संधी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ६ सप्टेंबर-**

राज्य शासनाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना, युनिफाईड निवृत्ती योजनेसह सुधारित निवृत्तीवेतन योजनेतून एका पर्यायाची निवड करण्याची संधी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून देण्यात आल्याची माहिती नगरपरिषद कामगार संघटनेचे सुनील वाळुजकर यांनी दिली.

या संदर्भात माहिती देताना वाळुजकर यांनी सांगितले की, महाराष्ट्र राज्य शासकीय मध्यवर्ती कर्मचारी संघटना व महाराष्ट्र राज्य नगरपरिषद नगरपंचायत कर्मचारी व संवर्ग कर्मचारी संघर्ष समितीच्या शिष्टमंडळाचे पदाधिकारी यांची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव आय. एस. चहल, मुख्यमंत्र्याचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे, वित्त विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, सामान्य प्रशासन विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव व्ही.राधा, महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाचे सल्लागार ग.दी.कुलथे, अध्यक्ष विनोद देसाई, अखिल भारतीय राज्य सरकारी महासंघाचे उपाध्यक्ष विश्वास काटकर, महाराष्ट्र राज्य नगरपरिषद नगरपंचायत व संवर्ग कर्मचारी संघर्ष समितीचे मुख्य संघटक ॲड. संतोष पवार, अनिल जाधव यांची सह्याद्री अतिथी गृह येथे कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नाबाबत बैठक संपन्न झाली.



या बैठकीमध्ये राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्या बाबत चर्चा झाली. राज्यातील सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना केंद्र शासनाच्या नव्याने जाहीर झालेल्या युनिफाईड निवृत्तीवेतन योजना, राष्ट्रीय पेन्शन योजना आणि राज्य शासनाने अर्थसंकल्पीय अधिवेशनात जाहीर केलेल्या सुधारित निवृत्ती योजनेपैकी एका पर्यायाची निवड करण्याची संधी देण्यात येईल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. मुख्यमंत्री यांच्या या निर्णयावर विविध अधिकारी आणि कर्मचारी संघटनांनी सहमती दर्शवत राज्य शासकीय मध्यवर्ती कर्मचारी संघटना यांनी आंदोलन मागे घेण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला.

दरम्यान या चर्चेच्या वेळी प्रामुख्याने राज्यातील ३ हजार संवर्ग कर्मचाऱ्यांच्या मागण्या कडे राज्य शासनाने लक्ष घालून त्वरित त्यांच्या मागण्या संदर्भात बैठक लावावी अशी मागणी करण्यात आली. त्यानंतर प्रधान सचिवांनी शुक्रवारी याबाबत मीटिंग लावण्याचा आश्वासन दिले. महाराष्ट्रातील सर्व नगरपरिषद नगरपंचायत कर्मचारी यांना १०/२०/३० ची आश्वासित प्रगती योजना लागू करण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. महाराष्ट्रातील नगरपरिषद नगरपंचायत मधील सर्व कर्मचाऱ्यांचे विना शर्त विना अट समावेशन व सफाई कर्मचाऱ्यांचे आकृती बंधामध्ये पदे मंजूर करून त्यांचेही समावेशन करण्याबाबत यावेळी चर्चा झाली. लवकरात लवकर याबाबत निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन यावेळी दिले.

यावेळी ॲड. संतोष पवार व अनिल जाधव यांनी नगरपरिषद नगरपंचायत कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्याबाबत ठोस भूमिका घेतल्याने नगरपरिषद नगरपंचायत कर्मचाऱ्यांचा प्रश्न मार्गी लागण्याचा मार्ग मोकळा झाला झाला असल्याचे संघर्ष समितीचे मुख्य संघटक ॲड. सुनील वाळूजकर यांनी यावेळी सांगितले.

### फायद्याच्या योजनेची निवड

राज्य शासनाने जाहीर केलेली सुधारित निवृत्ती वेतन योजना निवडण्याची संधी त्यामुळे देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना या योजनांचा अभ्यास करुन त्यांच्या दृष्टीने फायद्याची योजनेची निवड करता येणार आहे, असे ही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केले.

### नुकसान होऊ देणार नाही : मुख्यमंत्री

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले की, आपण सर्व अधिकारी, कर्मचारी शासनाचा भाग आहात. सर्वांना न्याय मिळावा व शाश्वत निवृत्तीवेतन मिळावे ही आमची भावना आहे. शासन शब्दाला पक्के असून अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे नुकसान होऊ देणार नाही. संघटनाची मागणी लक्षात घेऊन सर्व कर्मचाऱ्यांना योग्य तो न्याय देण्याचा प्रयत्न शासनाच्या वतीने करण्यात येईल, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

## संक्षिप्त वृत्त



### माहिती अधिकार दिन साजरा करण्याची मागणी

**अक्कलकोट, दि. ६ सप्टेंबर-**

माहिती अधिकार दिन सरकारी कार्यालयामध्ये साजरा करण्याबाबत अक्कलकोट तालुक्यातले सर्व कार्यालयामध्ये निवेदन देण्यात आले. माहिती अधिकारी कार्यकर्ता महासंघ यांच्या वतीने शासकीय कार्यालयात २८ सप्टेंबर रोजी हा दिवस माहिती अधिकार दिन म्हणून साजरा करण्यात यावा याबद्दल अक्कलकोट तालुक्यातील माहिती अधिकारी कार्यकर्ते महासंघाचे पदाधिकारी व पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष संजय किणीकर व अक्कलकोट तालुका माहिती अधिकार महिला आघाडी तालुका संघटक वैशाली हावनूर, अक्कलकोट तालुका महिला आघाडी प्रचार प्रमुख वर्षा मेत्रे, अक्कलकोट तालुका प्रचार संघटक बाशा पटेल, अक्कलकोट तालुका सहप्रचार प्रमुख सिद्धराम मैंदर्गी-हिरेमठ, स्वामीनाथ हेगडे, अक्कलकोट तालुका प्रचार संयोजक प्रवीण घाटगे, आकाश बबलाद, सहसंघटक रमेश ईश्वरकट्टी, समीर शेख, ब्रिजराज हिरेमठ उपस्थित होते.



### टेंभुर्णीत निमिया जनजागृती शिबीर

**टेंभूर्णी, दि. ६ सप्टेंबर-**

एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प टेंभुर्णी व प्राथमिक आरोग्य केंद्र टेंभुर्णी व रॉकेट लर्निंग सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित राष्ट्रीय पोषण माह कार्यक्रमानिमित्त निमिया जनजागृती कॅम्प व अंगणवाडीस्तरावर तंत्रज्ञानाचा वापर याविषयी नुकताच कार्यक्रम पार पडला. बाल विकास प्रकल्प अधिकारी बालाजी अल्लडवाड यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यसेविका खटके, जयश्री पवार यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले. प्रास्ताविक अर्चना खटके यांनी केले. आभार जयश्री पवार यांनी मानले. यावेळी बालविकास प्रकल्प अधिकारी बालाजी अल्लडवाड, विस्तार अधिकारी आकाश कोकाटे, डॉ. सायली माळी, एनएमएम बैरागी सिस्टर, एलएचव्ही गायकवाड, नितीन थोरात आदी उपस्थित होते.



### राष्ट्रवादी विद्यार्थी संघटनेच्या कामाचे प्रदेशाध्यक्ष प्रशांत कदम यांच्याकडून कौतुक

**करकंब, दि. ६ सप्टेंबर-**

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे प्रदेश सरचिटणीस श्रीकांत शिंदे यांच्यावतीने शारदाई पुरस्कार वितरण व गरजू मुलींना सायकल वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदितीताई तटकरे, युवक प्रदेशाध्यक्ष ूरज चव्हाण, राष्ट्रवादी विद्यार्थी कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष प्रशांत कदम उपस्थित होते. प्रशांत कदम यांनी पंढरपूर शहर व तालुक्यातील पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक घेत पक्ष संघटनात्मक बांधणीसाठी मार्गदर्शन केले. राष्ट्रवादी विद्यार्थी कॉंग्रेस पंढरपूरमध्ये चांगल्या पद्धतीने काम करत असून कल्याण काळे, समाधान काळे यांच्या नेतृत्वात आपण आणखी ताकदीने काम करावे, मी तुमच्या पाठीशी आहे असे त्यांनी सांगत कौतुक केले. याप्रसंगी राष्ट्रवादी विद्यार्थी कॉंग्रेसचे प्रदेश सरचिटणीस महेश बोचरे, राष्ट्रवादी विद्यार्थी कॉंग्रेसचे जिल्हा प्रवक्ते साहिल शेख, जिल्हा सरचिटणीस वंशभूषण शिंदे, पंढरपूर कार्याध्यक्ष विजय सुतार, सचिव प्रेम शिंदे उपस्थित होते.



### नवभारत स्कूलमध्ये आरोग्य तपासणी

**करमाळा, दि. ६ सप्टेंबर-**

येथील नवभारत स्कूलमध्ये शिक्षक दिन अनोख्या पद्धतीने साजरा करण्यात आला. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी शाळेच्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांचा सन्मान केला व एकदिवसीय शिक्षकांचे कामकाज विद्यार्थ्यांनी हाती घेतले. तसेच शिक्षकांनीही या धकाधकीच्या काळात तब्येतीकडे दुर्लक्ष करू नये यासाठी नवभारत इंग्लिश स्कूलच्या अध्यक्ष मुख्याध्यापिका दीपाली चिंचकर यांनी सर्व शिक्षकांचे तसेच ट्रॅव्हलिंग विभागाच्या सर्व स्टाफच्या आरोग्याची तपासणी केली. शिक्षक शारीरिक, मानसिकदृष्टीने सक्षम असावा यासाठी विद्यार्थ्यांबरोबर शिक्षकांचे बॉडीचेकप गरजेचे असल्याचे मुख्याध्यापक चिंचकर यांनी सांगितले.

# श्री शहाजी प्रशालेत २६ माजी शिक्षकांचा सत्कार




**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ६ सप्टेंबर-**

येथील मराठा मंदिर श्री शहाजी प्रशालेत शिक्षक दिनाचे औचित्य साधून प्रशालेचे माजी शिक्षक, पर्यवेक्षक, उपमुख्याध्यापक व मुख्याध्यापक अशा २६ जणांचा सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी मुख्याध्यापक एस.एन. शिंदे, सत्कारमूर्ती माजी मुख्याध्यापक बी. जी. शिंदे, एस. एस. फडतरे, ए. पी. काळे. ए. आय. बिळ्ळूर, ए. आर. कांबळे, एम. एन. मनियार, आर. एल. बनसोडे आदीसह २६ माजी शिक्षक-शिक्षिका उपस्थित होते. प्रारंभी मान्यवरांना बँडच्या तालावर सलामी देण्यात आली. प्रास्तविक पर्यवेक्षक आर. एस. पडवळकर यांनी केले. बालचमूंनी एम. पी. भडकुंभे यांच्या मदतीने स्वागतगीत सादर केले. पाककलेतील प्रथम तीन क्रमांक, उत्कृष्ट अध्यापन केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. माजी मुख्याध्यापक एस. एन. फडतरे यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख वाय. पी. कबाडे व एम. एम. जाधव यांनी केले तर आभार ए. बी. शिंदे यांनी मानले.

### यांचा झाला सत्कार

माजी मुख्याध्यापक एस. एन. फडतरे, बी. जी. शिंदे, डॉ. एस. एस. फडतरे, ए. पी. काळे, ए. आय.बिळ्ळूर, आर. एल. बनसोडे, एम. एन. मनियार, ए. आर. कांबळे, माजी उपमुख्याध्यापक व्ही.एस. कडगंची, माजी पर्यवेक्षक बी .ए. कुरनूरकर, आय. एस. चेंडके, ए. बी. शहाबादे, माजी शिक्षक एस. आय. हिप्परगी, सी. एस. बगले, एम. बी. पाटील, ए. ए. बेळगांवकर, एम. ए. बिराजदार, एस. सी. मुजावर, यु. एस. टिंगरे, ए. एस. स्वामी, एम. पी. भडकुंभे, एस. व्ही. पाचुपते, एम. बी. बोधले, बी. एल. सुतार, माजी लिपीक ताराबाई हांडे, माजी प्रयोगशाळा परिचर विलास शिंदे यांचा सन्मानपत्र देऊन सत्कार झाला.

## अक्कलकोटला पुन्हा पावसाने झोडपले

**अक्कलकोट, दि. ६ सप्टेंबर-**

शनिवार, रविवार, सोमवार, बुधवारी पाऊस झाला. गुरुवारी पुन्हा रात्री आठ ते ९.३० दरम्यान तालुक्यातील बहुतांश भागात विजेच्या लखलखाट व ढगांच्या गडगडाटासह पावसाने झोडपले. सलगच्या पावसामुळे सोयाबीन, मूग, उडीद पिकाचे नुकसान झाले असून तूर, सूर्यफुलही पाण्यात उभे असल्याने याच्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे. खरीप पिकाला काढणीला किमान पंधरा दिवस उघडीप गरजेचे आहे. पण मंगळवार एकच दिवस वगळला तर सलग पाऊस झाला आहे.






## शिक्षक हे विद्यार्थ्यांना पुत्रवत प्रेम देणारे दैवत : प्राचार्य आवटे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ सप्टेंबर-**

स्वतःच्या कुटुंबातील व्यक्तीपेक्षा वर्गातील विद्यार्थ्यांवर पुत्रवत प्रेम करुन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करणारी एकमेव व्यक्ती म्हणजे शिक्षक होय, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. सखाराम आवटे यांनी केले.

श्री क्षेत्र तीर्थ (ता. दक्षिण सोलापूर) येथील श्री रामलिंगेश्वर शिक्षण संकुलात शिक्षक दिनानिमित्त आयोजित गौरव समारंभात ते बोलत होते. याप्रसंगीनम्रता घोंगडे, राजश्री ऐवळे या विद्यार्थिनींनी शिक्षकांप्रती आदरभाव व्यक्त करणारी भाषणे केली. महेश पट्टणशेट्टी, नागराज पाटील, प्रा. रेवण मठपती, मुख्याध्यापक सुधीर सोनकवडे यांनी मार्गदर्शनपर भाषणे केली. सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा शिक्षक दिनानिमित्त संस्थेतर्फे पुष्पगुच्छ व लेखणी देऊन प्रा. डॉ. भीमाशंकर बिराजदार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रा. डॉ. भीमाशंकर बिराजदार म्हणाले की, विद्यार्थ्यांचे कल्याण होवो, प्रगती होवो, असा विश्वास देऊन वर्गातील विद्यार्थ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणारे शिक्षक देश घडविण्यासाठी झिजत असतात. सूत्रसंचालन महेश पट्टणशेट्टी यांनी केले.




## शिक्षण, प्रशिक्षण निरंतर चालणारी प्रक्रिया : बंडेवार

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. ६ सप्टेंबर-**

शिक्षण आणि प्रशिक्षण ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. विद्यार्थी म्हणून आपण याचा किती उपयोग करून घेतो हे फार महत्त्वाचे आहे असे प्रतिपादन बंडेवार उद्योग समूहाचे सर्वेसर्वा अनिल बंडेवार यांनी केले.

श्री साई चारिटेबल ट्रस्ट संचलित साई औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्रांगणात ते बोलत होते. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या सन २०२४ च्या नवीन प्रवेशित प्रशिक्षणार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. कौशल्य असेल तरच कौतुक होईल, या ब्रीदवाक्याची आठवण करून देताना संस्थेच्या अध्यक्ष डॉ. मीरा सूर्यवंशी यांनी उपलब्ध पायाभूत सुविधांचा वापर करून कुशल होण्यास सांगितले.संवाद कौशल्य ही सर्वांची प्राथमिक गरज आहे आणि आपण त्यात तरबेज असले पाहिजे. यासाठी लागणाऱ्या सर्व सुविधा पुरवू असे सांगितले. संस्थेच्यां अध्यक्ष डॉ. मीरा सूर्यवंशी, इंदिरा पॉलिटेक्निकचे प्राचार्य डी. आर. पिसाळ, साई औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य श्याम गोवर्धन उपस्थित होते. सूत्रसंचालन मानसी वाघमारे यांनी केले.

# विद्यार्थ्यांची मानसिकता ओळखून शिक्षकांनी ज्ञानदान करावे

## प्रा. पी.सी. झपके यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ६ सप्टेंबर-**

शिक्षकाला विद्यार्थ्यांची मानसिकता ओळखून ज्ञानदान करता आले पाहिजे तरच तो चांगला शिक्षक होऊ शकतो. एक शिक्षक आपल्या कर्तुत्वाने देशाच्या राष्ट्रपती पदापर्यंत पोहचू शकतो हे आपणास डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जीवन कार्याकडे पाहिल्यास समजू शकते असे गौरवोदगार सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रा. पी. सी. झपके यांनी काढले.



ते सांगोला येथील शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेज मध्ये शिक्षक दिन व नवप्रवेशित विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभात बोलत होते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष बाबुराव गायकवाड, उपाध्यक्ष एम. आर. गायकवाड, सचिव ए. आर. गायकवाड, विश्वस्त जयमालाताई गायकवाड उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून झाली. यावेळी मान्यवरांच्या हस्ते नवप्रवेशित विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. बाबुराव गायकवाड यांनी विद्यार्थ्यांनी आपले शिक्षण उत्तमरीत्या पूर्ण करून आपले,आपल्या पालकांचे तसेच संस्थेचे नाव उज्वल करून स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण करावी असे आवाहन केले. यावेळी नवप्रवेशित विद्यार्थिनी प्राजक्ता पवार, मृदुला पाटील, साक्षी शेटे, शांभवी बाबर, तनुजा मोरे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. आर.ए. देशमुख, सूत्रसंचालन प्रा. शेखर गायकवाड, प्रा. पी.जी. पवार यांनी केले. आभार प्रा. पी. सी.चव्हाण यांनी मानले.

# ग्रामीण विद्यार्थ्यांमध्ये आव्हानात्मक क्षेत्र पेलण्याची ताकद : अभिनेते पाध्ये

## पंढरपुरातील पाच दिवसीय नाट्य कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ६ सप्टेंबर-**

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी गोर, गरीब, वंचित आणि उपेक्षितांच्या मुलांसाठी ज्या उद्देशाने शाळा सुरु केली. तो उद्देश आज सफल होताना दिसत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये विविध कौशल्ये असतात. त्यांची संघर्षाची तयारी असते. त्यांच्यामध्ये सुप्त कलागुण असतात. विद्यार्थ्यांनी न्यूनगंड न बाळगता अभिनयाच्या क्षेत्रात उडी घेतली पाहिजे. सिनेमा आणि नाटक ही आव्हानात्मक क्षेत्रे असली तरी देखील ग्रामीण भागातील विद्यार्थी ती लीलया स्वीकारू शकतील, असे प्रतिपादन धर्मवीर चित्रपटातील अभिनेते मकरंद पाध्ये यांनी केले.



रयत शिक्षण संस्थेच्या येथील कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात रुसा काम्पोनंट आठ अंतर्गत मराठी विभाग व कामाक्षी क्रिएटिव्ह मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने पाच दिवसीय नाट्य कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या नाट्य कार्यशाळेच्या उद्घाटन समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे हे होते. मकरंद पाध्ये पुढे म्हणाले की, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय विद्यार्थ्यांच्या विकासासाठी नाटक या कला प्रकारावर पाच दिवसाची कार्यशाळा घेते आहे ही अतिशय कौतुकास्पद बाब आहे. आपला विद्यार्थी घडावा. त्यांच्यात प्रात्यक्षिक स्वरुपात कौशल्ये विकसित करावीत. ही भूमिका अभिमानास्पद आहे. महानगरातील महाविद्यालयातून अशा स्वरूपाच्या कार्यशाळा घेतल्या जात नाहीत. शहरातील विद्यार्थ्यांना अशा स्वरूपाच्या संधी शोधाव्या लागतात. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेचा सदुपयोग करून घ्यावा.

प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. रमेश शिंदे यांनी केले. तर पाहुण्यांचा परिचय राकेश तळगावकर यांनी करून दिला. उमेश घळसासी, डॉ. सोमनाथ सोनवलकर, आकाश भडसावळे, निलम चव्हाण, शांताराम सावंत आदी तज्ज्ञ उपस्थित होते. या कार्यक्रमात उपप्राचार्य डॉ. तुकाराम अनंतकवळस, प्रा. हरिभजन कांबळे, प्रा. उज्ज्वला शिंदे, डॉ. बापूसाहेब घोडके, डॉ. सुमित साळुंखे व सहभागी विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सारिका भांगे यांनी केले. आभार प्रा. डॉ. दत्ता डांगे यांनी मानले.

### मूल्ये जतन करणे नैतिक जबाबदारी

पंढरपूर क्षेत्राला सांस्कृतिक वारसा आहे. त्यामध्ये भर घालण्याचे काम महाविद्यालय करत आहे. सध्या अतिशय वेगाने समाज जीवनात बदल घडत आहेत. त्यामुळे मूल्ये जतन करणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे. कलेच्या माध्यमातून समाजातील संस्कृतीची जोपासना करता येते. विद्यार्थ्यांनी कलांची जोपासना केली तर त्यांना आनंदी जीवन जगता येईल, असे प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे यांनी सांगितले.

आपला
# जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## पिलीवच्या कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयात विद्यार्थ्यांनी दिला धडा

**पिलीव, दि. ६ सप्टेंबर-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयात डॉ. सर्वपल्ली राधाकृषणन यांचा जन्म दिन हा शिक्षक दिन म्हणून साजरा करण्यात आला.



यावेळी मुख्याध्यापक शिवाजी कापसे व पर्यवेक्षक प्रतिभा मोरे यांच्या उपस्थितीत प्रथम डॉ. सर्वपल्ली राधाकृषणन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. दहावीच्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांचे काम केले. मुख्याध्यापक म्हणून अलवीया तांबोळी, उप मुख्याध्यापक म्हणून प्रियंका पिसे, पर्यवेक्षक पृथ्वी दोलताडे हिने सूत्रसंचालन श्रावणी बुगड, तृपती वाघमारे तर आभार शिवम साळुंखे यांनी मानले.



## संक्षिप्त वृत्त...



### शिक्षक दिनानिमित्त प्रियदर्शनी महिला मंडळाकडून शिक्षकांचा सत्कार

**माढा, दि. ६ सप्टेंबर-**

माढ्यात प्रियदर्शनी महिला विकास मंडळाच्या वतीने शिक्षक दिनाच्या निमित्ताने माढा तसेच परिसरतील शिक्षकांच्या सत्कार समारंभ पार पडला. यावेळी तुळजाभवानी बहुउद्देशीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. मगन सुरवसे, ज्येष्ठ साहित्यिक प्रा. डॉ. राजेंद्र दास उपस्थित होते. अध्यक्षस्थानी काँग्रेसचे नेते दादासाहेब साठे होते. प्रास्ताविकात करताना मंडळाच्या अध्यक्ष ॲड. मीनल साठे यांनी प्रियदर्शनी महिला मंडळाच्या माध्यमातून सतत नाविन्यपूर्ण उपक्रम दरवर्षी राबवले जातात. याचाच एक भाग म्हणून माढा शहर व परिसरातील शाळेतील सर्व शिक्षकांचा आदर सन्मान करणे हे आमचे कर्तव्य आहे. कारण समाजातील शिक्षक हा घटक अत्यंत महत्त्वपूर्ण आहे आई-वडिलांनंतर मुलांवर संस्कार करण्याचे काम हे शिक्षकच करत असतात. आपल्या मुला मुलींचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी सर्व शिक्षक सदैव प्रयत्नशील असतात. डॉ. सुरवसे यांनी माढा तालुक्यामध्ये नगराध्यक्ष साठे यांच्या मार्गदर्शनाखाली नेहमी महिला सबलीकरण, विद्यार्थी, शिक्षक, पालक यांच्यासाठी नेहमी नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले जातात. शिक्षक हा आजन्म विद्यार्थी असतो .त्याने सतत वाचन करत राहिले पाहिजे. प्रा. राजेंद्र दास यांनी शिक्षकांना पुरस्कार हे प्रेरणा देतात व या प्रेरणेमुळेच त्यांचा आत्म विश्वास वाढतो व विद्यार्थ्यांची सर्वांगीण प्रगती होण्यास मदत होते, असे सांगितले. सूत्रसंचालन प्रकाश जाधव व लक्ष्मण राऊत यांनी केले तर आभार मंडळाच्या सदस्या अरुणा देशपांडे यांनी मानले.

### छत्रपती शिवाजी तरुण मंडळाच्या अध्यक्षपदी दुधाळ, उपाध्यक्षपदी दाळवाल, नलवडे

**करमाळा, दि. ६ सप्टेंबर-**



येथील सावंत गल्ली येथील छत्रपती शिवाजी तरुण मंडळाच्या पदाधिकाऱ्याची निवड सुनील सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली झाली. या मंडळाचे हे ७७ वे वर्ष आहे. मंडळाच्या अध्यक्षपदी संदीप दुधाळ, उपाध्यक्षपदी समद दाळवाले व दिनेश नलवडे यांची निवड करण्यात आली. मिरवणूक प्रमुख पियुष सावंत, उपमिरवणूक प्रमुख गणेश किरवे, सचिव शुभम चाँदगुडे तर खजिनदार म्हणून योगेश काकडे, सल्लागार रविंद्र नलवडे, संघटक शुभम सांळुके यांची निवड करण्यात आली. सुनील सावंत म्हणाले की या मंडळाची स्थापना सन १९४७ साली कै. अनंतराव आबा सावंत यांनी केली असून पुढे हमाल पंचायतचे संस्थापक सुभाष अण्णा सावंत यांनी ही परंपरा चालवली. आमच्या मंडळात सर्व हिंदू-मुस्लिम समाजातील युवकांना गणेशोत्सव मंडळात संधी दिली जाते. मंडळाची मिरवणूक ही विना पोलिस बंदोबस्तात शांततेत पार पडते, असे त्यांनी सांगितले. आभार बापू उबाळे यांनी मानले.



### करकंब येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षकदिन साजरा

**करकंब, दि. ६ सप्टेंबर-**

राष्ट्रपती सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिन म्हणून साजरा करण्यात येतो. रंगीबेरंगी खडूंचा वापर करून विद्यार्थ्यांच्या आयुष्यात रंग भरणारे, त्यांचे भविष्य उज्वल करणारे, हुशार, विविध कलाकौशल्यात पारंगत विद्यार्थी घडवून राष्ट्र उभारणीचे पवित्र कार्य करणाऱ्या शिक्षकांप्रति त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाबद्दल शिक्षकदिन साजरा करण्यात येतो. त्या अनुषंगानेच न्यू. इंग्लिश स्कूल करकंब येथील दहावीतील विद्यार्थ्यांनी पाचवी ते नववीमधील विद्यार्थ्यांचे तास घेतले. यावेळी अध्यापन व अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरती वेगळाच आनंद दिसून येत होता. या उपक्रमात संस्थेचे अध्यक्ष संजीवकुमार मेहेत्रे, स्कूलकमिटीचे अध्यक्ष प्रशांत वेळापूरकर, सचिव देवकते, शाळेच्या मुख्याध्यापिका संगीता करमाळकर, दहावीचे वर्गशिक्षक खपाले, भिसे यांनी मार्गदर्शन केले.

### संगोगी आ. तंटामुक्त अध्यक्षपदी गुरप्पा चलगेरी यांची निवड

**मैंदर्गी, दि. ६ सप्टेंबर-**

अक्कलकोट तालुक्यातील संगोगी आ येथील तंटामुक्त अध्यक्षपदी गुरप्पा बसण्णा चलगेरी, शरणपा श्रीमंत चलगेरी यांची उपाध्यक्षपदी पहिल्यांदा बिनविरोध निवड करण्यात आली. शुक्रवारी हनुमान मंदिर येथे ग्रामसभा भरविण्यात आली होती, यावेळी या निवडी करण्यात आल्या. यावेळी सरपंच बसवराज निम्मे, सचिव ग्रामसेवक धनराज व्होट्टे उपस्थित होते.



# पंढरीत २७२ सार्वजनिक मंडळे

**• गणेशोत्सवासाठी पोलिस प्रशासन सज्ज**

**• शहरात १४५, तालुक्यात १२७ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांची नोंदणी, सहा ठिकाणी एक गाव, एक गणपती**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.६ सप्टेंबर-**

या वर्षी शहरात १४५ तर तालुक्या मध्ये १२७ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाकडून गणेशचतुर्थीच्या दिवशी गणपतीबाप्पांची प्राणप्रतिष्ठापना केली जाणार आहे. तालुक्यात सहा गावांमधून एक गाव, एक गणपतीचे आयोजन केले गेले आहे. डीजेमुक्त किंवा नो डीजे मुव्हमेंट या थीममधून या वर्षीचा गणेशोत्सव साजरा केला जात आहे. या संदर्भात सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ पदाधिकाऱ्यांच्या घेण्यात आलेल्या बैठकीत संबंधितांना सुचना देण्यात आल्याची माहिती उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ.अर्जुन भोसले यांनी दिली.



पोलिस ठाण्याच्या स्तरावर दंगाकाबू पथकाची रंगीत तालीम सुरू आहे. रुट मार्च, कोम्बिंग ऑपरेशन सुरू आहेत. गणेश मंडळांसह शासकीय यंत्रणेशी समन्वय साधून गणेशोत्सव आनंदात साजरा व्हावा व निर्विघ्न पार पडावा, यासाठी पोलिस प्रशासनाकडून प्रयत्न केले जात आहेत. उपविभागीय पोलिस अधीक्षक डॉ. अर्जुन भोसले, पोलिस निरीक्षक टी. वाय. मुजावर यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलिस स्टेशन हद्दीतील प्रत्येक गावोगावी जाऊन पोलिस अधिकारी मंडळातील सदस्यांना योग्य त्या सूचना आणि मार्गदर्शन करत आहेत. या बरोबरच गावातील मंडळांची नोंदणी करणे, पोलिस स्टेशनमधून परवाने घेणे, पारंपरिक पद्धतीने गणेशोत्सव साजरा करणे, महिला व ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक गोष्टींचे नियोजन करणे, डॉल्बीमुक्त गणेशोत्सव साजरा करणे, प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करणे, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले जात आहे. पंढरपूर तालुक्यातील गोपाळपूर, लक्ष्मी टाकळी यासह अन्य गावात रुट मार्च, कोम्बिंग ऑपरेशन केले आहे. या रुट मार्चच्या दरम्यान पोलिस निरीक्षक टी. वाय. मुजावर, सपोनि.विश्वास पाटील, पोसई विक्रम वडणे, सपोनि, विभावरी रेळेकर, पोलिस कर्मचारी विजय आवटी, गजानन माळी सतीश चंदनशिवे, सुजीत उबाळे सुधाकर हॅबाडे, सुनील मोरे आदी उपस्थित होते.

> डीजेमुक्त गणेशोत्सव साजरा करावा, रस्त्यावर, मंडपाजवळ गर्दी होऊन वाहतुकीस अडथळा येणार नाही, याची खबरदारी मंडळांनी घ्यावी. सोशल मीडियावरील अफवांवर विश्वास ठेवू नये. उत्सव काळात अनुचित प्रकार आढळल्यास नागरिकांना तत्काळ पोलिसांशी संपर्क साधावा. गणेशोत्सव काळात जर कोणी अनुचित प्रकार करण्याचा प्रयत्न केला तर त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल.
>
> **-डॉ. अर्जुन भोसले,** उपविभागीय पोलिस अधिकारी, पंढरपूर

**या गावात एक गाव, एक गणपती**

या वर्षी तालुक्यातील नळी, शंकरनगर, भैरवनाथवाडी, बिटरगाव, पुळूजवाडी, अजोती या सहा गावांमधून एक गाव, एक गणपतीचे आयोजन करण्यात आल्याची माहिती तालुका पोलिसांकडून देण्यात आली.

## टेंभूर्णीत यंदा नो डीजे, नो नृत्यांगना

**• टेंभूर्णी पोलिस ठाण्याच्या पोनि दीपक पाटील यांची सक्त ताकीद**

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. ६ सप्टेंबर-**

टेंभुर्णी पोलीस ठाण्यांतर्गत ४८ गावे येत असून १० गावांमध्ये एक गाव, एक गणपती असणार आहे. गणेशोत्सव काळात व मिरवणुकीमध्ये डीजे वाजवल्यास आणि नृत्यांगनांना नाचविल्यास कायदेशीर कारवाई करण्याच्या सक्त सूचना पोनि दीपक पाटील यांनी दिल्या आहेत.



टेंभुर्णी पोलीस ठाण्यात उपविभागीय अधिकारी अजित पाटील यांच्या अध्यक्षतेखाली गणेशोत्सव व ईद ए- मिलादनिमित्त झालेल्या बैठकीत ते बोलत होते. पाटील म्हणाले, घोटी, वेणेगाव, रोपळे, वडोली, उजनी टें, टाकळी टें, चव्हाणवाडी टें, भोगेवाडी, परितेवाडी व चांदन उर्वरित ३८ गावांमध्ये प्रत्येक गणेश उत्सव मंडळांनी गणपती विसर्जनापर्यंत काळजी घ्यावी. प्रत्येक गणेशोत्सव मंडळांनी सीसीटीव्ही कॅमेरे लावावेत. ज्या गावांमध्ये दारू विकली जाते, त्या गावांतील पोलीस पाटील यांना दारू विक्रीवर कारवाई करण्याचा अधिकार आहे. अडचण आल्यास आपल्या मदतीला बीट हवालदार आहेतच. यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख मधुकर देशमुख, शिवसेना टेंभुर्णी शहराध्यक्ष सुरेश लोंढे, आरपीआयचे जिल्हा संघटक परमेश्वर खरात, मोहल्ला कमिटीचे सदस्य रावसाहेब रस्तापुरे, जहागीर मुलाणी, मदणी तांबोळी, सपोनि गिरीश जोग, पोसई स्वाती सुरवसे, पोहे राजेश लांडगे, बबलू गाडे उपस्थित होते. यावेळी मिटकलवाडीचचे पोलीस पाटील शंकर हनुमंत पाटील यां श्रद्धांजली वाहण्यात आली. आभार बेंबळेचे पोलीस पाटील कीर्ते यांनी मानले.

**२४ तास स्वयंसेवक नेमा :** श्री गणेश प्रतिष्ठान मंडळ ठिकाणी २४ तास स्वयंसेवक नेमावेत. सर्वांनी ऑनलाईन अर्ज करून परवानगी घेऊन मिरवणूक घ्यावी. गणेश मंडळाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष सदस्यांनी गणेशोत्सव मिरवणूकदरम्यान काळजी घ्यावी. कुठल्याही मिरवणुकीसमोर नृत्यांगना नाचवले जाणार नाही, याची दखल घ्यावी. गणेशोत्सव मंडळसमोर संध्याकाळी जुगार खेळू नये, डीजे लावू नये, अशी ताकीद पोनि पाटील यांनी दिली.

## विवेकानंद प्रतिष्ठानतर्फे ९ सप्टेंबरपासून गणेशोत्सव व्याख्यानमाला

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ६ सप्टेंबर-**

सालाबादाप्रमाणे यंदाही गणेशोत्सव निमित्य विवेकानंद प्रतिष्ठान च्या वतीने व्याख्यानमाला सोमवार दिनांक ९ ते १४ सप्टेंबर दरम्यान दररोज सायं.६.३० वाजता प्रियदर्शनी सांस्कृतिक भवन, ए-वन चौक, अक्कलकोट येथे होणार असल्याची माहिती विवेकानंद प्रतिष्ठानचे अध्यक्ष आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी पत्रकाद्वारे दिली . सालाबादाप्रमाणे यंदाही विवेकानंद प्रतिष्ठानचे वतीने अक्कलकोटकरांसाठी नामवंत व्याख्यात्याची विविध कार्यक्रमाची मेजवानी आयोजित करण्यात आली आहे. व्याख्यानमाला ६ दिवस चालणार आहे.





या व्याख्यानमालेचे पहिले पुष्प सोमवार, दि.०९ सप्टें रोजी प्रख्यात व्याख्याते पार्थ बावस्कर (छत्रपती संभाजीनगर) हे 'भारत काल आज आणि उद्या' दुसरे पुष्प मंगळवार दि.१० रोजी प्रख्यात व्याख्याते गणेश शिंदे (संभाजी नगर) जीवन सुंदर आहे. तिसरे पुष्प बुधवार, दि.११ रोजी प्रसिद्ध गायक अभिजीत कोसंबी, अबोली गिऱ्हे व अमिता घुगरी हे 'रंग जल्लोष' मराठी व हिंदी गाण्याचा बहारदार कार्यक्रम सादर करतील. दि.१२रोजी झी मराठी हास्य सम्राट 'हसवा हसवी' जॉनी रावत शीखंडकर व राजदीप कदम पाचवे पुष्प शुक्र दि.१३ रोजी धमाल विनोदी बाल नाट्य लेखक दिलीप प्रभावळकर हे 'बोक्या सातबंडे' निर्माते राहुल कर्णिक,रणजीत कदम व दीप्ती जोशी व प्रमुख भूमिकेत आरुष बेडेकर सादर करणार आहेत. सहावे पुष्प शनि , दि. १४ सप्टें रोजी 'चाणक्य' महानाट्य अभिजात क्रिएशन निर्मित मिलाफ थिएटर्स प्रकाशित नाटक सादर होणार आहे.

या व्याख्यानमालेत साहित्य, व्यवस्थापन, अभिनय, जीवन व विनोद या विषयावर चतुरस्त्र व्याख्यान होणार आहे तरी अक्कलकोट तालुक्यातील रसिकांनी व विशेषता तरुण-तरुणी या व्याख्यानमालाचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन प्रतिष्ठानचे अध्यक्ष आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केले.

## बुद्ध विहारासाठी निधी दिल्याबद्दल आ.राऊत यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ६ सप्टेंबर-**

तालुक्याचे आमदार राजेंद्र राऊत यांनी बौद्ध समाजाच्या मागणीनुसार बार्शी शहरातील नवीन कोर्टाजवळील जागेत बुद्ध विहारासाठी २ कोटी ५३ लाख ११ हजार रुपयांचा भरघोस निधी मंजूर केल्याबद्दल आंबेडकरी अनुयायांच्यावतीने व सर्व दलित संघटनांच्यावतीने आमदार राजेंद्र राऊत यांचा कृतज्ञतापूर्वक जाहीर नागरी सत्कार करण्यात आला.



यावेळी प्रबुद्ध भारत चॅरिटेबल ट्रस्ट, आरपीआय, भीम टायगर संघटना, दलित महासंघ, होलार समाज संघटना व सर्व भीम जयंती मंडळाच्यावतीने आमदार राजेंद्र राऊत यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मोठ्या प्रमाणात दलित बंधू आणि भगिनी उपस्थित होते. आमदार राजेंद्र राऊत यांचा सत्कार आयुष्यमान गवळी सर, सत्यजित जानराव सर, माजी शिक्षणाधिकारी विष्णू कांबळे, सामाजिक कार्यकर्ते सुमित खुरुंगुळे, भीम टायगरचे शंकर वाघमारे, दलित महासंघाचे सुनील अवघडे, नगरसेवक संदेश काकडे, पाचु उघडे, बापू धावारे, आबा थोरात, ॲड. अविनाश गायकवाड, दादासाहेब जानराव, प्रतिष्ठानचे सुनील जानराव, सुनील कांबळे, इंटकचे नागनाथ सोनवणे यांच्यासह महिला भगिनी व तरुणांच्यावतीने सत्कार करण्यात आला.

## धनगर आरक्षण जागर यात्रेचे स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ६ सप्टेंबर-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथे धनगर आरक्षण जागर यात्रा रथाचे स्वागत करण्यात आले.

धनगर समाजाला एसटीचे आरक्षण मिळावे म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात धनगर आरक्षण जागर यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. संपूर्ण महाराष्ट्रात गावोगावी जाऊन आरक्षणाविषयी जनजागृती या माध्यमातून करणयात येत आहे. पिलीव येथे धनगर जागर आरक्षण यात्रेचे स्वागत शयामतात्या मदने, शिवराज पुकळे, सचिन मदने, नितीन कपने, संतोष पडळकर, खंडू माने, संजय पाटील, भीमराव मदने, देवा घेरडे, आबा बनसोडे, संतोष दुबे यांनी स्वागत केले. प्रथम पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी धनगर समाजाला एसटीचे आरक्षण मिळावे याविषयी माहिती देणयात आली. यावेळी डॉ. गोफणे, अजित कर्णवर-पाटील, सोमनाथ देवकाते उपस्थित होते.



## दीड एकर पेरुतून पहिल्याच वर्षी २४ लाखांचे उत्पन्न

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. ६ सप्टेंबर-**

बदलते हवामान, वाढती मजुरी, नेहमी पडणारे पिकाचे बाजारभाव यामुळे शेतकरी बांधवांना शेती करणे जिकीरीचे झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची मुले शेती करण्यास धजावत नाहीत. हे चित्र नेहमी पहायास मिळत आहे. या सर्वांवर मात करणारे चित्र वाशिंबे परिसरात पाहण्यास मिळत आहे. दीड एकर पेरुतून पहिल्याच वर्षी २४ लाखांचे उत्पन्न विजय जगदाळे यांनी घेतले.

करमाळा तालुक्यातील वाशिंबे येथील उच्च शिक्षित शेतकरी विजय नामदेव जगदाळे व पत्नी प्रियंका विजय जगदाळे या दांपत्याने जिद्द, चिकाटी मेहनतीच्या जोरावर दीड एकर तैवान पिंक पेरु लागवडीतून पहिल्याच वर्षी २४ लाख२० हजार रुपयांचे उत्पादन घेतले आहे. वाशिंबे गाव हे उजनी लाभक्षेत्रात असल्याने या परिसरात ऊस व केळी हे मुख्य पीक घेतले जाते. परंतु वारंवार उसाचे एकच पीक घेतल्याने ऊत्पन्नात होणारी घट, पिकासाठी लागणारा जास्तीचा कालावधी, खतांचा वाढलेला खर्च, गाळपासाठी होणारा त्रास त्यामुळे जगदाळे यांनी पारंपरिक पिकाला फाटा देत पेरु लागवडीचा निर्णय घेतला. २०२३ मध्ये तैवान पिंक या जातीच्या १५५० रोपांची दीड एकर क्षेत्रावर दोन ओळीत ८ फूट व दोन रोपात ५ फूट अंतर ठेवून शेणखत व रासायनिक खत वापर करुन लागवड केली.



लागवडीपासून विक्री पर्यंत ५ लाख ५० हजार रुपये खर्च आला.अठरा महिन्यात विक्रीसाठी आलेल्या पेरूची शेताच्या बांधावरच ५० रुपये ते ८५ रुपये प्रतिकिलो दराने मुंबई, पुणे येथील व्यापाऱ्यांना मालाची विक्री केली. एकूण ३६ टन मालाच्या विक्रीतून २४ लाख २० हजार रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे. रोगापासून पेरूचे संरक्षण करण्यासाठी क्रॉप कव्हर व प्लास्टिक बॅगचा वापर केला. त्यामुळे गुणवत्ता व दर्जा चांगला राखण्यात यश मिळाले आहे. जगदाळे यांनी आत्तापर्यंत आपल्या शेतात केळी, कलिंगड, ऊस याचे भरघोस उत्पादन घेतले आहे. योग्य व्यवस्थापन व कमी कालावधीत घेतलेले भरघोस उत्पन्न त्यामुळे त्यांची शेती परिसरातील शेतकऱ्यांना मार्गदर्शक ठरत असून आपल्या शेतात माहितीसाठी आलेल्या शेतकऱ्यांना आवर्जून पिकातील बारकावे सांगत आहेत.

**अभ्यास करुन पेरु लागवडीचा निर्णय**

बारामती, पुणे येथील कृषि मेळाव्याला उपस्थित राहून व यशस्वी पेरु बागायतदारांच्या प्लॉटला भेट देऊन त्यातील बारकावे जाणून पेरु लागवडीचा निर्णय घेतला. बाजारपेठेचा अंदाज घेत फळ छाटणी करुन बहर घेत पहिल्याच वर्षी भरघोस उत्पन्न निघाले.

**- विजय जगदाळे, वाशिंबे, ता. करमाळा**

**जीवामृत ठरले वरदान :** देशी गाईचे शेण, गोमूत्र, गूळ, कडधान्याचे पिठ यांचे प्रमाणानुसार व्यवस्थित मिश्रण करून वस्त्रगाळ करुन दर आठ दिवसाला ठिबकच्या सहाय्याने झाडांना दिले. जीवामृतामुळे जमिनीतील सूक्ष्म जिवाणुंची संख्या, सेंद्रिय कर्ब, जमिनीतील कार्बन वाढण्यास मदत झाली. त्यामुळे झाडांची रोगप्रतिकारक शक्ती वाढून झाडाची योग्य वाढ, फुलांचे प्रमाण व पर्यायाने उत्पादनात वाढ झाली. तसेच दीड एकर बागेला सहा टेलर शेणखताचा वापर केला.

CMYK

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



तेर : तेरणा नदी पाण्याने पूर्णपणे भरून वाहू लागल्याने नदीच्या पाण्याची खणा नारळाचे ओटी भरताना महिला.



## ▶▶ संक्षिप्त वृत्त...



### शरण पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त स्कूल बॅगचे वाटप

**कदेर, दि.६ सप्टेंबर -**

उमरगा तालुक्यातील कदेर येथे युवा नेते शरण पाटील यांचा वाढदिवसानिमत्त लोकमान्य टिळक महाविद्यालय कदेर येथील विद्यार्थ्यांना शालेय स्कुल बॅगचे वाटप करण्यात आले व आदर्श शिक्षक निवडीबद्दल विनोद गायकवाड यांचा सत्कार करण्यात आलाफ तसेच स्वच्छ व सुंदर शाळा निवडमध्ये द्वितीय क्रमांक (२०२३) आल्यामुळे मुख्याध्यापक बाळासाहेब गायकवाड यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक बाळासाहेब गायकवाड, मदन पाटील, डॉ, विक्रम जिवनगे, धनराज जाधव, शीतल पाटील, संभाजी कलबुर्गे, पमु ऐकुरगे, विश्वंभर सुरवसे, शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### आलुरसह परिसरात अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान

**आलुर, दि.६ सप्टेंबर -**

आलुर, अचलेर, केसरजवळगा, वरनाळवाडी या शिवारात चार पाच दिवस सतत पडत असलेल्या पावसाम ुळे उडिद, मुग, सोयाबीन या पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. जुनमध्ये पहिल्या दुसऱ्या आठवड्यात बऱ्यापैकी पाऊस पडल्याने शेतकऱ्यांनी पेरणी केली त्यानंतर वेळोवेळी थोडाफार पाऊस पडल्याने खरीप पिके चांगल्याप्रकारे आली होती. गेल्या चार पाच दिवसांपासून सतत पडत असलेल्या पावसामुळे पिकांचे नुकसान होऊन निसर्गाच्या लहरीपणामुळे हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला आहे. उडिद व मुग पावसामुळे शेतातच कुजुन जात आहे. वेळेवर मजुर मिळत नाहीत, वाढलेली मजुरी आणि अवेळी पाऊस यामुळे शेतकरी हैराण झाले आहेत.



### रोपटे भेट देऊन शालेय विद्यार्थ्यांना वही, पेनचे वाटप

**परंडा, दि.६ सप्टेंबर -**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भोंजा हवेली येथे श्री गणेश बँक सेवा केंद्र व पाटील बुवा जि.प. प्रोडुसर कंपनी लि. भोंजा हवेलीचे सर्वेसर्वा डायरेक्टर गणेश नेटके यांच्या वाढदिवसानिमित्त मागील वर्षी केक न कापता अनोखा उपक्रम राबवुन झाडे लावा, झाडे जगवा या संदेशातून विद्यार्थी यांना जागृत करून शालेय शिक्षक वृंद यांनी सत्कार केला होता. तर यावर्षी देखील लघुउद्योग सल्लागार, डायरेक्टर गणेशदादा नेटके यांचा वाढदिवस रोपटे भेट देऊन साजरा करण्यात आला. तसेच इतर खर्च टाळून सर्व शालेय विद्यार्थी यांना वही व पेन देऊन शालेय परिसरातील सर्व प्रकारच्या जोपासलेल्या झाडांची पहाणी करण्यात आली यावेळी कवी मुख्याध्यापक बाळासाहेब घोगरे, सरपंच समाधान कोळी, शालेय अध्यक्ष सुब्राव मोरे, उद्योजक देविदास सरवदे, शिक्षक वृंद सोमनाथ पवार, आदिकराव शेळवणे, राऊत उपस्थित होते.

### गजेंद्र घोलकर यांचे निधन

**धाराशिव, दि.६ सप्टेंबर -**



तेरणा महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. अशोक घोलकर यांचे वडिल गजेंद्र नरसू घोलकर यांचे दि.४ सप्टेंबर २०२४ रोजी वयाच्या ९४ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी व नातवंडे असा परिवार आहे. ते पोहनेर येथील शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक सचिव होते.

### वामन डावरे यांचे निधन

**लोहारा, दि.६ सप्टेंबर -**



लोहारा तालुक्यातील दस्तापुर येथील रहिवाशी लोहारा पंचायत समितीचे माजी सदस्य, भाजपाचे ज्येष्ठ नेते कै. वामन डावरे (वय ६५) यांचे हृद्यविकाराच्या झटक्याने निधन झाले आहे. यांच्या अंतविधीस विविध राजकिय पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते, ग्रामस्थ, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. यांच्या निधनाने तालुक्यात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. यांच्या पश्चात्य एक मुलगा, तीन मुली, सुन, नातवंडे, असा मोठा परिवार आहे.

### नळदुर्गमध्ये पोलिसांचे पथसंचलन

**नळदुर्ग, दि.६ सप्टेंबर -**

गणेशोत्सव,ईद-ए-मिलाद व नवरात्र महोत्सवाच्या पार्श्वभुमीवर दि. ६ सप्टेंबर रोजी नळदुर्ग पोलिस ठाण्याच्या वतीने शहरातील प्रमुख मार्गांवरून पथसंचलन करण्यात आले. आगामी काळात साजरे होणारे सर्व सण, उत्सव शांततेत व उत्साहात पार पडावेत. शहरात शांतता राहुन कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावे यासाठी नळदुर्ग पोलिस ठाण्याच्या वतीने शहरातील प्रमुख मार्गांवरून पोलिसांचे पथसंचलन करण्यात आले.

# जिल्ह्यातील दहा प्राथमिक आरोग्य केंद्रांना राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानांकन

**तभा वृत्तसेवा**

**धाराशिव, दि.६ सप्टेंबर -**

केंद्र आणि राज्य सरकारच्या माध्यमातून आरोग्य सुविधांच बळकटीकरण करून त्यातून अधिकाधिक दर्जेदार आरोग्य सुविधा मिळाव्यात यासाठी राष्ट्रीय स्तरावर राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानांकन दिल जाते. धाराशिव जिल्ह्यातील दहा प्राथमिक आरोग्य केंद्रांना राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानांकन मिळाले असून राज्यात एकाच वेळी दहा आरोग्य संस्थांना राष्ट्रीय मानांकन मिळवणारा धाराशिव हा राज्यातील एकमेव जिल्हा ठरला आहे.

यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रांची जिल्हा आणि राज्यस्तरावर तपासणी झाली. त्यानंतर राष्ट्रीय स्तरावरील तपासणीत जिल्ह्यातील या दहा प्राथमिक आरोग्य केंद्रांम धील बाह्य रुग्ण विभाग अंतर रुग्ण विभाग प्रयोगशाळा प्रसुती कक्ष राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांचे अंम लबजावणी तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रातील सामान्य प्रशासन या सहा विभागांची तपासणी केली गेली.

यात प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या लोकाभिमुख दर्जेदार आरोग्य सुविधा आणि अंतरबाह्य सुशोभीकरण स्वच्छता यासह प्राथमिक आरोग्य केंद्रांचा अभिलेख कक्षाची तपासणी आणि थेट रुग्णांना सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या मुलाखती घेण्यात आल्या आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे या प्राथमिक आरोग्य केंद्रात येणाऱ्या रुग्णांना मिळणाऱ्या सुविधांची त्यांच्याशी प्रत्यक्ष संवाद साधून या राष्ट्रीय मानांकन तपासणी पथकाने चौकशी केली असता प्रत्यक्ष लाभार्थ्यांकडून प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये मिळालेल्या सुविधांबद्दल समाधान व्यक्त करण्यात आले. या शिवाय धाराशिव जिल्ह्यातील या दहा प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या परिसरात असलेल्या आयुष्य गार्डन यामध्ये औषधी वनस्पतींची लागवड आणि परिसर स्वच्छता तसेच इतर अनुषंगिक बाबींच्या मदतीने या दहा आरोग्य संस्थांना एकाच वेळी राष्ट्रीय मानांकन दिले गेले आहे.

धाराशिव जिल्हा एकाच वेळी अशा दहा आरोग्य संस्थांना म ानांकन मिळवणारा राज्यातील एकम ेव जिल्हा ठरला आहे.

## कै. वसंतराव सोनवणे यांच्या पुण्यतिथीनिमित्त वृक्षारोपण



**तभा वृत्तसेवा**

**उमरगा, दि.६ सप्टेंबर -**

तालुक्यातील कवठा येथे कै. वसंतराव सोनवणे यांच्या पुण्यतिथीनिमित्त विजयकुमार सोनवणे यांनी वृक्षारोपण केले.

सोनवणे यांनी पुण्यतिथीचा इतर खर्च टाळून कवठा येथे एकूण १०० आंब्याचे झाडे वाटप करून एक नवा पायंडा कवठा येथे पाडला.

कै. वसंतराव सोनवणे यांची पुण्यतिथी उत्साहात साजरी केली. यावेळी सामाजिक नेते विनायकराव पाटील, गुंडाप्पा बिराजदार, नानाराव भोसले, डॉ. रवींद्र सोनवणे, डॉ.दिवे, मलंग गुरुजी, प्रकाश कुलकर्णी, सुरेश सोनवणे, शेषेराव मोहिते, कांबळे, मुख्याध्यापक गंगथडे गुरुजी, कलावती पौळ, सरोजा गायकवाड, अक्षरा सोनवणे आदींची उपस्थिती होती.

## मुरूम येथे मुख्यमंत्री वयोश्री योजनेच्या शिबिरास प्रतिसाद

### पहिल्या दिवशी ५८० लाभार्थ्यांनी अर्ज...

**तभा वृत्तसेवा**

**मुरूम, दि.६ सप्टेंबर -**

मुरूम शहरात भाजपच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या मुख्यमंत्री वयोश्री योजनेच्या शिबिराला मोठा प्रतिसाद मिळाला शिबिराच्या पहिल्या दिवशी ५८० लाभार्थ्यांनी अर्ज दाखल केले.

भाजप उद्योग आघाडीचे जिल्हाध्यक्ष श्रीकांत मिणियार यांच्या नेतृत्वाखाली शहरातील भाजप कार्यालयात मुख्यमंत्री वयोश्री योजनेचा एकदिवसीय शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यात ५८० नागरीकांनी सदर योजनेचा लाभ मिळवण्यासाठी अर्ज दाखल केले. पत्रकार सुरक्षा समितीचे जिल्हा उपाध्यक्ष रफिक पटेल व सामाजिक न्याय विभागाचे निवासी शाळेचे मुख्याध्यापक दत्तात्रय कुंभार यांच्या हस्ते शिबीराचे शुभारंभ करण्यात आला. यावेळी भाजपचे शहराध्यक्ष गुलाब डोंगरे होते. तर व्यासपीठावर शंकर टेकाळे, शिवशंकर ब्याळे, दत्ता गिरीबा, बाबा कुरेशी, दिलीप निलवाडे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमासाठी शहराध्यक्ष सिद्धलिंग हिरेमठ, सुनील निलेवाड, म नीष ब्याळे, विशाल व्हणाळे, आकाश क्षीरसागर, राजकुमार हिरेमठ, सुरेश गायकवाड, विजयसिंह चव्हाण, महादेव गिरीबा यांनी परिश्रम घेतले.

## मातोश्री कारखान्याचे ऊस बिल थकले; शेतकऱ्यांचे ठिय्या आंदोलन

### सातलिंग स्वामी यांची मध्यस्थी फलदायी...



**तभा वृत्तसेवा**

**उमरगा, दि.६ सप्टेंबर -**

माजी मंत्री काँग्रेस पक्षाचे नेते सिद्धाराम म्हेत्रे चेअरमन असलेल्या मातोश्री शुगर लिमिटेड रुद्देवाडी (ता. अक्कलकोट जि. सोलापूर) येथील साखर कारखान्यास तुळजापूर, उमरगा, लोहारा तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी आपला ऊस घातला होता. ऊस घालून तब्बल नऊ महिने उलटूनही संबंधित कारखान्याने ऊस बिलापोटी अद्याप एक छदामही शेतकऱ्यांना दिलेला नसल्याने संतापलेल्या शेतकऱ्यांनी सोलापूर येथे काँग्रेस भवन कार्यालयासमोर दि.४ सप्टेंबर पासून ठिय्या आंदोलन चालू केले आहे.

हे समजताच शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न असल्याने दिव्यांग कल्याण मंत्रालयाचे अध्यक्ष ओमप्रकाश उर्फ बच्चु कडू यांचे स्वीय सहाय्यक तथा सामाजिक कार्यकर्ते व उमरगा लोहारा मतदारसंघातून आगामी विधानसभा निवडणूक लढवण्यास इच्छूक असलेले उमरगा-लोहारा मतदार संघातील रहिवाशी असलेले उमेदवार सातलिंग स्वामी यांनी सदर आंदोलन स्थळी शेतकऱ्यांची भेट घेऊन संबंधित कारखान्याचे चेअरमन यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला मात्र त्यांचा भ्रमणध्वनी बंद असल्याने संपर्क होऊ शकला नाही.

त्यामुळे त्यांनी मातोश्री शुगर कारखान्याचे चेअरमन सिद्धाराम म्हेत्रे यांचे चिरंजीव शिवराज म्हेत्रे यांच्याशी भ्रमणध्वनीवरून संपर्क साधला असता त्यांनी संबंधित शेतकऱ्यांची थकीत ऊस बिले दि.सहा सप्टेंबरपर्यंत बँक खात्यात जमा केली जातील असे आश्वासन देऊन ठिय्या आंदोलन संपवावे अशी विनंती केली. मात्र संतापलेल्या शेतकऱ्यांनी जोपर्यंत खात्यावर पैसे पडत नाहीत तोपर्यंत आंदोलन मागे घेणार नाही अशी ठाम भूमिका घेतली आहे.

सदर आंदोलनात उमरगा-लोहारा व तुळजापूर तालुक्यातील तब्बल अडीचशे ते तीनशे शेतकरी सहभागी झालेले आहेत.

याप्रसंगी शेतकऱ्यांचे मनोधैर्य वाढवून मानसिक आधार देण्यासाठी संभाजी ब्रिगेडचे धाराशिव जिल्हाध्यक्ष शरद पवार, संभाजी ब्रिगेडचे उमरगा तालुकाध्यक्ष अण्णासाहेब पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

## भाजपा नेते मा. आ. सुजितसिंह ठाकूर यांचा परंडा भाजपाच्या वतीने सत्कार



**तभा वृत्तसेवा**

**परंडा, दि.६ सप्टेंबर -**

भाजपचे विधान परिषदेचे माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांना महाराष्ट्र विधानपरिषद शतक महोत्सवी कार्यक्रमात भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांच्या हस्ते विधान परिषदेतील उत्कृष्ट भाषण पुरस्कार देण्यात आला त्याबद्दल परंडा भाजपाच्या वतीने सत्कार करुन शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी भाजपा जिल्हा सरचिटणीस विकास कुलकर्णी, परंडा न.प. मा. गटनेते सुबोधसिंह ठाकूर, ॲड. संतोष सुर्यवंशी, तालुकाध्यक्ष ॲड. गणेश खरसडे, अरविंद रगडे, सुखदेव टोंपे, जिल्हा चिटणीस विठ्ठल तिपाले, तानाजी पाटील, धनाजी गायकवाड, ॲड. तानाजी वाघमारे, ॲड. भालचंद्र औसरे, तुकाराम हजारे, अनिल पाटील, फारुख मुलानी, विलास गायकवाड, शिवाजी पाटील, जयंत पाटील, उमाकांत गोरे, मिलींद शिंदे, अजित काकडे, रामकृष्ण घोडके, मनोहर पवार, धनंजय काळे, गौरव पाटील, सुरज काळे, अविनाश विधाते, अमर ठाकूर, दत्ता ठाकरे, नुतन खोसरे, ज्योती भातलवंडे तसेच इतर मान्यवर पदाधिकारी व कार्यकर्ते असंख्य प्रमाणात उपस्थित होते.

## कसबे तडवळे जि.प. शाळेत शिक्षक दिन साजरा



**तभा वृत्तसेवा**

**कसबे तडवळे, दि.६ सप्टेंबर -**

डॉ. सर्वोपल्ली राधाकृष्णन यांचा जयंती उत्सव शिक्षक दिन म्हणून व भगवान चक्रधर स्वामी यांचा जन्म दिवस जि.प. कन्या प्रा. शाळा कसबे तडवळे येथे मोठ्या उत्सहाने साजरा करण्यात आला. याचे औचित्य साधून शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने शाळेतील सर्व शिक्षक बंधु भगिनीचा मानाचा फेटा हार, पुष्प गुच्छ व लेखनी (पेन) देवून सन्मानीत करण्यात आले. यावेळी शाळेतील विद्यार्थीनींनी देखील आपल्या सर्व शिक्षकांना सन्मान फुले व भेटवस्तू देवून गौरव केला.

त्याच बरोबर शाळेतील जेष्ट शिक्षिका वाघमाले एल.बी. यांचा तेरणानगर बीटच्या वतीने खामगाव येथे विस्तार अधिकारी जोशी के.ए. यांच्या हस्ते बीट आदर्श शिक्षक म्हणून सन्मानित करण्यात आले.

यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सोमनाथ भोसले उपाध्यक्षा करंजकर, सदस्या देवकन्या जमाले, मनिषा दिघे, सदस्य सुभाष धनके, मुख्याध्यापक रहिमान सय्यद, जगन्नाथ धायगुडे सह सर्व शिक्षक बंधु भगिनी, पालक व तोडकर उपस्थित होते.

## सोयाबीनला ६ हजार ९४५ रुपये दर द्या

### भारतीय किसान संघाची मागणी...

**तभा वृत्तसेवा**

**लोहारा, दि.६ सप्टेंबर -**

शेतकऱ्यांच्या सोयाबिनला ६ हजार ९४५ रुपये दर द्या, अशा मागणीचे निवेदन भारतीय किसान संघ जिल्हा धाराशिव जिल्हा अध्यक्ष ॲड. नितीन घुले यांच्या मार्गदर्शनाखाली लोहारा तालुकाध्यक्ष काशीनाथ लकडे यांनी दि.५ सप्टेंबर रोजी लोहारा तहसीलदार यांना दिले आहे.

महाराष्ट्रात सोयाबीन हे क्रम ांक दोनचे मुख्य नगदी पीक आहे. राज्यात यावर्षी सुमारे ५० लाख हेक्टर क्षेत्र या पीकाखाली आहे. राज्याची सरासरी उत्पादकता हेक्टरी १४.५६ क्विंटल आहे. राज्याचा सरासरी उत्पादन खर्च ६०३९ रु. क्विंटल आहे. त्या अनुशंगाने राज्य सरकारने कृषि लागत एवं मुल्य आयोगाकडे प्रती क्विंटल ६ हजार ९४५ रुपये दर दिला जावा अशी शिफारस केली आहे. ती रास्त आणि योग्य आहे. म्हणून चालू हंगामात सोयाबीनला ६ हजार ९४५ रुपये क्विंटलला दर द्यावा. बाजारात यावर्षी सोयाबीन खरेदीदारानी संघटीत प्रयत्नातुन दरावर नियंत्रण ठेवुन दर साडेचार हजारच्या वर जावू दिले नाहीत. अश्या परिस्थितीत जर शेतकऱ्याला उत्पादन खर्चावर लाभकारी किंमत मिळत नसेल तर राज्य सरकारने भावांतर पद्धतीने किंवा बोनसच्या माध्यमातून फरक देण्याची व्यवस्था करावी. निसर्गाच्या प्रकोपाने अतिवृष्टी, किड रोग या कारणाने सरासरी उत्पादनावर विपरीत परिणाम झाला आहे. अशा परिस्थितीत गणेश चतुर्थी, दसरा, दिवाळी हे सण तोंडावर आहेत. उत्पादन खर्चावर आधारित लाभकारी किंमत व घामाचे दाम अन्नदात्याला मिळून हे सणासुदीचे दिवस सुखाचे जावे ही अपेक्षा आहे.



आपण लाडक्या बहिणीचा विचार केलात तसा लाडक्या शेतकरी दादाचा पण निश्चित विचार करून वरील निर्णय घोषित कराल, अशी आशा असल्याचे निवेदनात म्हटले आहे. निवेदनावर तालुका मंत्री अनंत शिवकर, विकास लंगडे, शिवकांत बिराजदार, शिवाजी सूर्यवंशी, सोमनाथ शिंदे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## दमदार पावसाची प्रतीक्षा, ओढे, नाले, तलाव कोरडेठाक; भविष्यात पाणीटंचाई जाणवणार?



**तभा वृत्तसेवा**

**मंगरूळ, दि.६ सप्टेंबर -**

मंगरूळ व परीसरातील दहा पंधरा गावात पावसाळा चालू झाल्यापासून मुसळधार पाऊस पडला नसल्यामुळें मंगरूळ व परिसरातील अनेक गावातील ओढे, नाले, तलाव कोरडेठाक आहेत. तुळजापूर तालुक्यात सर्वात कमी पर्जन्याम ानाची नोंद मंगरूळ परीसराची झाली असुन भविष्यात उन्हाळ्यात पिण्यासाठी पाणी मिळेल की नाही अशी चिंताजनक परीस्थिती निर्माण झाली आहे.

सध्यातरी पिकापुरता रीमझीम स्वरुपातच पाऊस पडला असल्याम ुळें परीसर हिरवेगार होऊन पिके डोलू लागले आहेत.

पण तलाव कोरडेठाक असल्याचे दिसते आहे. मंगरूळ व परिसरातील गावात तीन मोठे साठवण तलाव असुन येमाई देवी साठवण तलावाची साठवण क्षमता तब्बल १.५६४ दलघमी असून सध्या पाण्याची पातळी जोत्याखाली असल्याची नोंद आहे.

तर शनी मंदिर साठवण तलावाची क्षमता १.१० दलघमी एवढी असून यातही जोत्याखाली पाणी असल्याची नोंद आहे. तसेच कुंभारी-कोरेवाडी साठवण तलावाची साठवण क्षमता २.१२ दलघमी असून उपयुक्त पाणी साठा ०.३६० असल्याचे लघु पाटबंधारे विभागाकडे नोंद आहे. आगस्ट महीना संपला परंतु मोठा पाऊस पडला नसल्यामुळें तलावातील खड्डेच भरले नाहीत.

सुरवातीच्या रीमझीम पावसातच शेतकऱ्यांनी खरीप पेरणी केली अधुनमधून हलका पाऊस पडल्याम ुळे सध्यातरी पिके चांगल्या अवस्थेत आहेत.

सोयाबिन, उडीद, मूग आदी पिकांचं बऱ्यापैकी उत्पादण होण्याची शक्यता आहे. पण भविष्यात उन्हाळ्यात पिण्यासाठी पाणी मिळेल की नाही यात शंका निर्माण झाली आहे.

पावसाळा जवळपास संपण्याच्या आधीच वरुणदेवाच्या आशीर्वादाने ढगफुटी पाऊस पडला तरच भविष्यात उन्हाळ्यात येणारी सम स्या संपेल अशी चर्चा परिसरातील शेतकरी वर्गातुन होत आहे.

> मंगरूळ व परिसरात तीन मोठे साठवण तलाव असुन येमाई देवी साठवण तलावाची साठवण क्षमता तब्बल १.५६४ दलघमी असून सध्या पाण्याची पातळी जोत्याखाली असल्याची नोंद आहे. तर शनी मंदिर साठवण तलावाची क्षमता १.१० दलघमी एवढी असून यातही जोत्याखाली पाणी असल्याची नोंद आहे. तसेच कुंभारी -कोरेवाडी साठवण तलावाची साठवण क्षमता २.१२ दलघमी असून उपयुक्त पाणी साठा ०.३६० आहे.
>
> **- राम लोंढे,** लघु पाटबंधारे विभाग

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# कणखर नेतृत्व जोपासण्याची जबाबदारी जनतेची

## भाजपा प्रदेशाध्यक्ष बावनकुळे; जनसन्मान पदयात्रेचा समारोप



**तभा वृत्तसेवा,**
**निलंगा, दि. ६ सप्टेंबर-**

जनसामान्यांच्या प्रश्नांची जाण असणारा, शाश्वत विकास कामे खेचून आणण्याची धमक असलेला आ. संभाजीराव पाटील निलंगेकर हा भाजपाचा मराठवाड्यातील खंबीर नेता व कुशल संघटक आहे, असा बाणेदार व कणखर नेतृत्व जोपासण्याची जबाबदारी जनतेची आहे. आ. संभाजीराव यांच्या मंत्रीपदासाठी केंद्र व राज्यातील भाजप नेतृत्वाकडे शिफारस करण्यासाठी त्यांचे वकीलपत्र मी तुमच्या सर्वांच्या साक्षीने घेत असून तुम्ही त्यांना साथ द्या असे आवाहन भाजपज्ञचे प्रदेशाध्यक्ष आमदार चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

निलंगा येथे आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या जनसन्मान पदयात्रेच्या समारोप कार्यक्रमाच्या जाहीर सभेत ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर अण्णासाहेब आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष आ. नरेंद्र पाटील, माजी खासदार श्रीमती रूपा पाटील निलंगेकर, बसवकल्याणचे आमदार शरणू सलगर, माजी आमदार शिवाजीराव पाटील कव्हेकर, गोविंद केंद्रे,माजी खासदार डॉ सुनील गायकवाड, जिल्हा प्रभारी किरण पाटील, भाजप जिल्हाध्यक्ष दिलीप देशमुख, देविदास काळे, प्रदेश प्रवक्ते गणेश हाके, प्रेरणा होनराव, युवा नेते अरविंद पाटील निलंगेकर आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना आ.बावनकुळे म्हणाले, काँग्रेसचे सरकार येणं म्हणजे मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना बंद करणे होय.. पुढील पाच वर्ष लाडकी बहीण योजना चालू ठेवण्यासाठी भाजपाला भरघोस अशिर्वाद द्या. एक उत्कृष्ट आमदार म्हणून विधीमंडळात काम करणारा संभाजीराव पाटील निलंगेकर हा भाजपचा प्रभावी नेता आहे. मत म्हणजे जनतेचं कर्ज आहे ते व्याजासह परत करण्याचे काम संभाजीराव विकास कामाच्या माध्यमातून करत आहेत. मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेचे विरोधक टिंगल चवाळी करत आहेत परंतु राज्यातील भाजप महायुतीच्या सरकारने लाडक्या बहिणीला दिलेली ही ओवाळणी आहे. संभाजीरावांना भाजप पक्षाचा ए.बी. फार्म देतो..... तुम्ही त्यांना मतांनी निवडून द्याल असा प्रश्न करताच... उपस्थित हजारो जनतेनी व माता भगिनींनी एक लाख मतांनी निवडून देणार असा प्रतिसाद दिला. तेव्हा आ. बावनकुळे यांनी आ.संभाजीराव यांना मंत्रीमंडळात घेण्यासाठी मी स्वतः त्यांचा वकील म्हणून काम करणार असल्याचे जाहीर केले.

यावेळी आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर म्हणाले की, राखी म्हणजे रक्षणाची जबाबदारी आहे सर्व बहीणीच्या पाठीशी खंबीर पणे उभे राहणे माझी जबाबदारी आहे. तुमच्या मुलांचा मामा झालो भाच्याची जबाबदारी घेण्यासाठी हा मामा म्हणून खंबीर पणे उभा राहणार, चांगला रोजगार मिळेल, चांगले शिक्षण देणे, सर्वांनी पाठीशी राहून मला अशिर्वाद द्या असे आवाहन केले.

यावेळी गोविंद केंद्रे, शिवाजी पाटील कव्हेकर, आमदार शरणू सलगर, माजी खासदार रूपात पाटील-निलंगेकर यांची भाषणे झाली. यावेळी हजारोचा जनसमुदाय समारोप सभेला उपस्थित होता.

## संक्षिप्त वृत्त



### समर्थ माध्यमिक विद्यालयात सखी सावित्री मंचाची स्थापना

**उदगीर, दि. ६ सप्टेंबर-**

तालुक्यातील एकुर्का रोड येथील समर्थ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात विद्यार्थ्यांच्या मनात शालेय जीवनातच भावनिक, शारीरिक व बौद्धिक विकासाबरोबर ताण-तणाव मुक्तीसाठी सखी सावित्री मंच स्थापन करण्यात आले. सावित्री मंचामध्ये अनेक सदस्यांची निवड करण्यात आली असून सदस्य सचिव मुख्याध्यापक प्रमोद चौधरी, तज्ज्ञ डॉक्टर म्हणून योजना मुखेडकर, पोलीस पाटील विश्वास नरले, अंगणवाडी सेविका जिजाबाई पेरके, पालक आशाबाई श्रावण कांबळे तर समुपदेशकपदी सहशिक्षक संतोष तेलंग, महिला प्रतिनिधीपदी शिक्षिका वर्षा कवडगावे यांची निवड करण्यात आली.




### अभ्यासिका बनतील गुणवान विद्यार्थ्यांच्या यशाचे ज्ञानमंदिर : केंद्रे

**उदगीर, दि. ६ सप्टेंबर-**

महाकवी चंदबरदाई सार्वजनिक वाचनालय व अभ्यासिकाचे उद्घाटन तीवेटग्याळ येथे माजी जिल्हा परिषद अध्यक्ष राहुल केंद्रे यांच्या हस्ते पार पडले यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना राहुल केंद्रे म्हणाले ग्रामीण भागामध्ये शिक्षण व्यवस्थेचा आजही अभाव आहे समाजामध्ये कित्येक विद्यार्थी गुणवान आहेत पण त्यांना पाहिजे तशी व्यवस्था परिस्थितीमुळे उपलब्ध होऊ शकत नाही पण या अभ्यासिका यामुळे गुणवान विद्यार्थ्यांसाठी यशाचे ज्ञानमंदिर निमर्ाण होणार आहे खरे तर नेहमी आम्ही सार्वजनिक विकास करत असताना प्रत्येक गावातील सरपंच असो की राजकीय सामाजिक कार्यकर्ता असो यांनी शिक्षण व्यवस्था कडे लक्ष दिले पाहिजे प्रत्येक गावामध्ये अभ्यासिका निर्माण झाल्या तर गुणवान विद्यार्थ्यांना या अभ्यासिकाच्या माध्यमातून खूप मोठा आधार मिळू शकतो आसे मत वेक्त केले यावेळी गावचे सरपंच प्रशांत पाटील, रमेश साळुंखे, भास्कर पाटील, देविदास पाटील, बालाजी पाटील, दिनेश पाटील, दिनेश पवार, ज्ञानेश्वर पवार, बालाजीराव गवारे, विजयकुमार पाटील, कैलास पाटील, जयसिंग पाटील-कोरे, आप्पा नरारे, कारभारी निलेश पेठे गावातील नागरिक उपस्थित होते.



### शास्त्री शाळेत पर्यावरणपूरक गणेशमूर्ती कार्यशाळा

**उदगीर, दि. ६ सप्टेंबर-**

लालबहादुर शास्त्री प्राथमिक विद्यालयात विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून कलोपासक मंडळातर्फे पर्यावरणपूरक गणेशमूर्ती बनविणे कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेसाठी अध्यक्ष म्हणून पहिली, दुसरी विभागाच्या विभाग प्रमुख श्रीमती सुरेखाबाई कुलकर्णी, प्रमुख पाहुणे म्हणून अर्चना सुवर्णकार, कलोपासक मंडळ प्रमुख सोनिया देशपांडे उपस्थित होत्या. पर्यावरणपूरक गणेशमूर्ती बनविणे कार्यशाळेतून निश्चितच पर्यावरणाचे रक्षण होणार आहे.याविषयी सविस्तर मार्गदर्शन सौ. अर्चनाताई सुवर्णकार यांनी केले. शाडूच्या मातीपासून गणेशमूर्ती कशी बनवावी याचे प्रात्यक्षिक सौ.सोनिया देशपांडे यांनी करून दाखवले.पहिली, दुसरी विभागातील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी खूप छान प्रकारे गणेशमूर्ती बनवून सादर केल्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षा श्रीमती सुरेखाबाई कुलकर्णी यांनी अश्या उपक्रमातून निश्चितच विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला चालना मिळेल, पर्यावरणाच्या रक्षणासाठी आणखी काय काय करता येईल,याबद्दल विद्यार्थ्यांशी चर्चा केली.पर्यावरणाच्या रक्षणासाठी आपण आग्रही राहण्याचे आवाहन केले. याप्रसंगी शाळेतील सर्व शिक्षक कर्मचारी उपस्थित होते.

### मंडप तपासणीसाठी पालिकेचे पथक

**लातूर, दि. ६ सप्टेंबर-**

सार्वजनिक गणेशोत्सवाच्या कालावधीत उभारण्यात येणाऱ्या मंडपांची तपासणी करण्यासाठी उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार समित्यांची स्थापना करण्यात आली असून त्यासाठी अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मुंबई उच्च न्यायालयात दाखल जनहित याचिका क्रमांक १७३/२०१० चा निकाल देताना मा.उच्च न्यायालयाने मंडपांची तपासणी करण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार या पथकांची स्थापना करण्यात आली आहे. लातूर शहर महानगरपालिका हद्दीत असणाऱ्या ४ पोलीस ठाण्यांतर्गत ही चार पथके तयार करण्यात आली आहेत.यात संबंधित ठाण्याचे पोलीस निरीक्षक, नायब तहसीलदार व मनपाच्या क्षेत्रीय अधिकाऱ्याचा समावेश आहे. एमआयडीसी पोलीस ठाणे कार्यक्षेत्रासाठी स्थापित समितीमध्ये पोलीस निरीक्षक बाबासाहेब नरवाडे (संपर्क क्र.९५६१०४५३०६ ), नायब तहसीलदार सतीश कांबळे (९५४५२९२९०१) आणि अ झोनच्या क्षेत्रीय अधिकारी श्रीमती निर्मला माने (७०२८५२७०७२) यांचा समावेश आहे. गणेशोत्सवासाठी उभारलेल्या मंडपा संदर्भात नागरिकांच्या तक्रारी असतील तर त्यांनी संबंधित क्षेत्रासाठी नियुक्त समितीमधील सदस्यांकडे तक्रारींची नोंद करावी.

# 'लालबहादूर'मध्ये आजी-माजी शिक्षकांचा गौरव सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**उदगीर, दि. ६ सप्टेंबर-**



येथील लालबहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात शिक्षक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी सेवानिवृत्त शिक्षक व सेवेत असणाऱ्या सर्व शिक्षकांचा सन्मान विद्यालयाच्या वतीने करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संकुलाचे अध्यक्ष मधुकरराव वट्टमवार तसेच प्रमुख अतिथी स्थानी सेवानिवृत्त मुख्याध्यापक जेमला राठोड, लक्ष्मीकांत नेलवाडकर स्थानिक समन्वय समितीचे कार्यवाह शंकरराव लासुणे उपस्थित होते .प्रमुख व्याख्याते म्हणून सेवानिवृत्त पर्यवेक्षक रमाकांत क्षीरसागर तसेच व्यासपीठावर सेवानिवृत्त शिक्षक व्यंकटराव गुरमे, उमाकांत बुधे, रंजना देशपांडे, सरोज जनवाडकर, बलभीमराव नळगीरकर, उमाकांत कोनाळे, वसंत कलकोटे, विजयकुमार पोतदार, लालासाहेब गुळभिले,मुख्याध्यापक अनंतराम कोपले, उपमुख्याध्यापक अरुण पत्की यांची उपस्थिती होती.

सर्वप्रथम मुख्य व्यासपीठावर डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक रूपाने कार्यक्रम प्रमुख अनिता येलमटे यांनी मांडले. तसेच सर्व उपस्थित सेवानिवृत्त शिक्षकांचा सविस्तर परिचय देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. शिक्षक दिनाचे औचित्य साधून उपस्थित मान्यवर व वर्ग प्रतिनिधी मार्फत मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक व सर्व शिक्षकांचा व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचाही गौरव करण्यात आला.

गुरुगीत नववीचे विद्यार्थी शरयू पांचाळ व विरेन पांचाळ यांनी सादर केले. यावेळी सेवानिवृत्त मुख्याध्यापक जेमला राठोड व लक्ष्मीकांत नेलवाडकर यांनी शिक्षक दिनाच्या शुभेच्छा देत विद्यालयाचे व आपले ऋणानुबंध कायम आहेत असे नमूद केले.कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते सेवानिवृत्त पर्यवेक्षक रमाकांत क्षीरसागर यांनी सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जीवनातील अनेक प्रसंग सांगत त्यांचे चरित्र विद्यार्थ्यांसमोर जिवंत केले. तर रामदास नारंगवाडे यांनी शिक्षकी पेशाचं महत्त्व अधोरेखित केले.

अध्यक्षीय समारोपात मधुकरराव वट्टमवार यांनी गुरुचे जीवनात स्थान महत्त्वाचे असते. माणसाला घडविण्याचे काम शिक्षक करत असतात म्हणून ते समाजासाठी आदरणीय असतात, असे नमूद केले.

सूत्रसंचालन अंबिका पारसेवार, करुणा गायकवाड, स्वागत व परिचय नीता मोरे तर आभार छाया दिक्कतवार यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता कल्याणमंत्राने जान्हवी देशमुख यांनी केली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पर्यवेक्षक कृष्णा मारावार, किरण नेमट, माधव मठवाले, आशा गौतम, विजया गोविंदवाड, संदीप बोधनकर यांनी परिश्रम घेतले.

# सातारा मॅरेथॉनमध्ये उद्धव ईप्पर यांना रौप्यपदक

**तभा वृत्तसेवा,**
**अहमदपूर, दि. ६ सप्टेंबर-**



सैनिकी व पोलिस प्रशिक्षण कार्यात अग्रेसर अहमदपूर च्या ज्ञानदीप अॅकॅडमी उद्धव ईप्पर यांना सातारा येथील प्रतिष्ठित जेबीजी सातारा हाफ हिल मॅरेथॉन स्पर्धेत ईप्पर हे रौप्यपदकाचे मानकरी ठरले.

सातारा येथे आयोजित करण्यात आलेल्या मॅरेथॉनच्या स्पर्धेत ज्ञानदीप अॅकॅडमी चे संचालक उद्वध ईप्पर यांनी २ तास १७ मिनीट मध्ये २१ किमी अंतर पूर्ण केल्याने ते रौप्यपदकाचे मानकरी ठरले. सातारा रनर्स फाउंडेशनच्यावतीने दरवर्षी आयोजित केली जाणारी ह्यजेबीजी सातारा हिल हाफ मॅरेथॉनल स्पर्धा सप्टेंबर चे सुरुवातीला घेण्यात आली. स्पर्धेत आठ हजारांहून अधिक स्पर्धकांनी सहभाग नोंदविला होता. देशभरातील धावपटूंना एकत्र आणणे हा स्पधेर्चा मुख्य हेतू आहे. या मॅरेथॉन स्पधेर्ने ह्यगिनीज बुक ऑफ वर्ल्ड 'रेकॉर्ड्सह्णमध्ये ह्यद मोस्ट पीपल इन सिंगल माऊंटन रनह्ण चा किताब प्राप्त करत आपली छाप निर्माण केली असून. यंदाचे या स्पधेर्चे सोळावे वर्ष आहे. देशातील सर्वात खडतर अशी ही मॅरेथॉन मानली जाते. पोलीस परेड मैदान ते यवतेश्वर घाट (कास रस्ता) अशी ही स्पर्धा झाली. या स्पर्धेत अनेक मान्यवर धावपटू भाग घेताना पाहायला मिळतात.या स्पधेर्चे उद्घाटन खासदार उदयनराजे भोसले, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, जिल्हा पोलीस अधीक्षक समीर शेख, पोलीस महासंचालक कृष्णप्रकाश यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले.

# ग्रामीण भागात विनामूल्य आरोग्य शिबिरांचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. ६ सप्टेंबर-**

जिल्ह्यातील धर्मादाय रुग्णालय आणि महात्मा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत असलेल्या रुग्णालयांमार्फत जिल्ह्यात सप्टेंबर व ऑक्टोबर, २०२४ मध्ये शासनाच्या धोरणानुसार सामुदायिक आरोग्य शिबिरे विनामुल्य राबविण्यात येत आहेत.

८ सप्टेंबर रोजी औसा तालुक्यातील बेलकुंदा येथे शिबीर होईल. ९ सप्टेंबर रोजी कामखेडा येथे शिबिराचे आयोजन केले जाणार आहे. १० सप्टेंबर रोजी गातेगाव येथे, अल्फा सुपर स्पेशालिटीच्यावतीनेऔसा तालुक्यातील लिंबाळा येथे, ११ सप्टेंबर रोजी निलंगा तालुक्यातील कासार शिरसी येथे, देशपांडे हॉस्पिटलच्यावतीने अंबुलगा यथे, सह्याद्री मल्टीस्पेशालिटीच्यावतीने नागरसोगा येथे शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे. १२ सप्टेंबर रोजी उदगीर, सामनगाव येथे, आयकॉन हॉस्पिटलच्यावतीने औसा तालुक्यातील फत्तेपूर येथे आरोग्य शिबीर होईल. १३ सप्टेंबर रोजी वानवाडा येथे आरोग्य तपासणी होईल. १४ सप्टेंबर रोजी उदयगिरी लायन्स हॉस्पिटलच्यावतीने लातूर तालुक्यातील तांदूळवाडी येथे, औसा तालुक्यातील बोरफळ येथे, सह्याद्री मल्टीस्पेशालिटीच्यावतीने तांबरवाडी येथे आरोग्य तपासणी केली जाणार आहे. १५ सप्टेंबर रोजी बोरफळ, टेंभी, बुधोडा येथे आणि लामजना येथे, सह्याद्री मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलच्यावतीने बोरफळ येथे उबुरगा येथे आरोग्य तपासणी शिबीर आयोजित केले जाईल, असे लातूरचे धर्मादाय उपायुक्त यांनी कळविले आहे.

# शेतकऱ्यांना सरसकट पीक विमा देण्यात यावा

## महाविकास आघाडीचे तहसीलदार जाधव यांना निवेदन



**तभा वृत्तसेवा,**
**चाकूर, दि. ६ सप्टेंबर-**

चाकूर तालुक्यात मागील काही दिवसापासून संततधार पाऊस पडल्याने अतिवृष्टीमुळे खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले आहे.त्यामुळे शेतकऱ्यांना शासनाकडून आर्थिक मदत मिळावी व सरसकट पीक विमा देण्यात यावा या प्रमुख मागणीचे निवेदन चाकूर तालुका महाविकास आघाडीच्यावतीने तहसिलदार नरसिंग जाधव यांना निवेदन देण्यात आले.

दि. १ व २ सप्टेंबर या दिवशी चाकूर तालुक्यामधील सर्वच चाकूर, वडवळ नागनाथ, नळेगांव, झरी बु.शेळगांव, आष्टा या ६ ही मंडळामध्ये अतिवृष्टी झालेली आहे. यामुळे शेतामध्ये उभे असलेल्या सर्वच पिकाचे मोठे नुकसान झालेले आहे. या नुकसानीची माहिती पिक विमा कंपनीला ७२ तासामध्ये ऑनलाईन अॅपद्वारे द्यावे अशी ही अट आहे, पण चाकूर तालुक्यातील सर्व शेतकरी बांधवांना हे अॅप चालवता येत नाही. यामुळे ७२ तासात नुकसानाची माहिती विमा कंपनीला देणे शक्य झाले नाही. अशा जाचक व जुलमी अटीमुळे शेतकऱ्याचे नुकसान होणार नाही याची शासनाने दखल घेऊन चाकूर तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांना त्यांच्या पिकाचे झालेले नुकसान म्हणून पिक विमा सरसकट मंजूर करावा व शासनाकडून नुकसानभरपाई मदत पंचनामे करण्याच्या भानगडीत न पडता सरसकट आर्थिक मदत करावी, अशी मागणी महाविकास आघाडीचे घटक पक्ष भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरचंद्र पवार व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या तर्फे तहसीलदार यांना निवेदनाद्वारे देण्यात आले आहे. यावेळी माजी राज्यमंत्री विनायकराव पाटील, अण्णासाहेब पाटील, विलासराव पाटील, तुकाराम मद्दे, निलेश देशमुख, शिवाजी बैनगिरे, नंदकिशोर पवार, पप्पू शेख, भागवत फुले, अनिल चव्हाण, निळकंठ मिरकले, सलीम तांबोळी, विकास महाजन, बाबुमिया दापकेवाले, शमीम कोतवाल, सुरेश मुंडे, धोत्रे गोविंद, लहुजी कोरे, धनंजय कोरे, नरसिंग गोलावार, शेख युसूफ, गफूर मासूलदार, भोसले विलास, अमोल शेटे, डॉ. धनंजय चाटे, पठाण इकबाल, रामराव बुदरे, गुडू पटेल, रणजित पाटील, सुनील शिंदे, सुभाष शंकरे, प्रमोद अशोक पाटील, मोठेराव पवन, काशिनाथ कांबळे,मोठेराव संतराम,केशव शिरुरे, शेख युनूस, रामकिशन खलंगरे, राजेंद्र शेलार, प्रकाश सोमवंशी,साजिद लखनगावे, श्रीमंत शेळके, माडगे मधुकर, अश्विन भोसले, रंजीत पाटील उपस्थित होते.

# महिला महाविद्यालय निर्मितीसाठी प्रयत्न करणार

## खासदार डॉ. अजित गोपछडे; महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात संवाद समारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. ६ सप्टेंबर-**

लातूर शहरातील नामांकित श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर यांना लवकरच महिला महाविद्यालयाचे मान्यता देण्यासाठी प्रयत्न करणार, असे आश्वासन खासदार डॉ. अजित गोपछडे यांनी केले.

ते येथील महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात आयोजित विरशैव लिंगायत सन्मान यात्रेअंतर्गत श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था विश्वस्तांचा सन्मान आणि शिक्षक शिकेत्तर कर्मचारी संवाद समारंभात प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. यावेळी विचारपीठावर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे हे होते. तर विशेष उपस्थिती म्हणून भाजपा निवडणूक प्रवास आयोजिका (लातूर शहर विधानसभा) च्या सौ डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, सचिव माधवराव पाटील टाकळीकर, संचालक राजेश्वर बुके, संचालक बसवराज येरटे, संचालक बाबुराव तरगुडे, सन्मान यात्रेचे प्रमुख संयोजक नितीन शेटे, राष्ट्रीय जंगम समाजाचे अध्यक्ष श्रावण जंगम, निखिल माळगे, बालाजी पाटील, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, उपप्राचार्य प्रा. बालाजी जाधव, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, कार्यालयीन प्रमुख नामदेव बेंदरगे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी जगत् ज्योती महात्मा बसवेश्वरांचे प्रतिमापूजन आणि प्रा. विश्वनाथ स्वामी, प्रा. गोविंद पवार आणि त्यांच्या चमू सादर केलेल्या स्वागत गीताने झाली.

पुढे बोलताना खासदार डॉ. अजित गोपछडे म्हणाले की, महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था ही महात्मा बसवण्णाच्या जातीअंताचा लढा पुढे चालवणारी शैक्षणिक संस्था असून सामाजिक समरसतेचा विचार या संस्थेमार्फत केला जातो. दीन दलित, उपेक्षित-वंचितांचा सन्मान येथे केला जातो. लिंगायतातील सर्व भेदभाव विसरून समाज एकत्रित आला पाहिजे. धर्मकारण, राजकारण, संस्कृती, उद्योग, ज्ञान, विज्ञान-तंत्रज्ञान या क्षेत्रात भरीव कामगिरी करून समाजाने आपली संघटन शक्ती दाखवली पाहिजे. जगत् ज्योती महात्मा बसवेश्वरांनी इसवी सनाच्या १२ व्या शतकात अनुभव मंटपाच्या माध्यमातून स्त्री-पुरुष समानता नोंदवली, त्यांनी स्त्रियांचा सन्मान केला. महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेने महिलांचा सन्मान करण्यासाठी स्वतंत्र अशा महिला महाविद्यालयाची मागणी केल्यास त्याला मान्यता मिळवून देण्यासाठी मी प्रयत्नशील राहील, असेही ते म्हणाले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना डॉ. अर्चना पाटील-चाकूरकर म्हणाल्या की, वीरशैव लिंगायत समाज हा भारतभर विखुरलेला समाज आहे. या समाजाला एकत्रित बांधण्यासाठी खासदार अजितजी गोपछडे प्रयत्नशील आहेत. वीरशैव लिंगायत सन्मान यात्रेच्या माध्यमातून समाजाला एक नवी दिशा, नवी आशा, नवी उमेद निर्माण करण्याचा प्रयत्न होत आहे, असेही त्या म्हणाल्या.

यावेळी बोलताना शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर म्हणाले की, लिंगायत समाज हा भाषिक दृष्ट्या अल्पसंख्यांक असा समाज आहे. या समाजाला भाषिक अल्पसंख्यांकांचा दर्जा मिळावा, महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था ही महात्मा बसवेश्वरांच्या आचार विचार प्रेरणेतून निर्माण झालेली शिक्षण संस्था आहे. या शिक्षण संस्थेला विद्यापीठाचा दर्जा मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जावेत, जेणेकरून समाजातील बहुजनांना शिक्षणाचे द्वारे खुली होतील, असेही ते म्हणाले. प्रास्ताविक वीरशैव लिंगात सन्मान यात्रेचे प्रमुख संयोजक नितीन भाऊ शेटे यांनी केले. तर आभार प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. रत्नाकर बेडगे व डॉ. राहुल डोंबे यांनी केले. या कार्यक्रमाला शहरातील अनेक लिंगायत कार्यकर्ते, महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थ्यांनी उपस्थित होते.

CMYK

# लातूर दिनांक

**लातूर तरुण भारत**, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केल

## शिवाजी महाविद्यालयास नॅक कमिटीची भेट

**उदगीर, दि. ६ सप्टेंबर-**

बेंगलोर येथील राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषद(नॅक) समितीने शिवाजी म हाविद्यालयात नुकतीच भेट दिली. या समितीम ध्ये नॉलेज कंन्सोर्टियम गुजरात येथील माजी संचालक प्रो.डॉ.नरेंद्र चौटालिया, तामिळनाडू येथील अंजा कॉलेज शिवकाशी चे माजी प्राचार्य प्रो.डॉ. पंड्याराजन वाल्लीमुथू यांची उपस्थिती होती. महाविद्यालयाचे हे तिसरे मूल्यांकन होते. ही समिती शिक्षणाच्या गुणवत्तेतील बिघाडाच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी



कार्य करते.याची स्थापना १९९४ मध्ये राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या शिफारशींना प्रतिसाद म्हणून करण्यात आली. महाविद्यालयात प्रवेश होताच राष्ट्रीय छात्र सेनेच्या कॅडेटने सलामी देऊन त्यांचे स्वागत केले. महाविद्यालयाचे प्राचार्य उप प्राचार्य आयक्यूसी चे समन्वयक यांनी याप्रसंगी त्यांचा येथे सत्कार केला. त्यानंतर समितीने विविध प्राधिकरणाला भेटी दिल्या, प्रेझेंटेशन पाहिले, महाविद्यालयाचे मूल्यांकन केले. महाविद्यालयाच्या वतीने त्यांचे स्वागत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ .अरविंद नवले, उपप्राचार्य डॉ .आर.एम. मांजरे,आयक्केशीचे समन्वयक डॉ.विष्णू पवार यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी , शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

## संक्षिप्त वृत्त



### राजीव गांधी पॉलिटेक्निकमध्ये शिक्षक दिन साजरा

**औसा, दि. ६ सप्टेंबर-**

राजीव गांधी इन्स्टिट्यूट ऑफ पॉलीटेक्निक लातूर येथे डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेस संचालिका माधुरी बावगे व प्राचार्य संतोष मेतगे यांनी पुष्पहार अर्पण करुन शिक्षकदिन साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी सर्व शिक्षकांना पुष्पगुच्छ देऊन शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयातील विद्यार्थिनी श्वेता कांबळे हिने मनोगतातून शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. तर अमिना बिजापुरे हिने शिक्षक व विद्यार्थी नाते पालकांप्रमाणे असते असे प्रतिपादन करत चर्चा घडवली. त्यानंतर प्रा.एस. एन. गायकवाड यांनी शिक्षक दिनाचे महत्त्व सांगताना आई वडिलानंतर शिक्षक गुरूच असतात. शिक्षकांकडून जे ज्ञान मिळते ते विद्यार्थ्यांनी अंगीकृत करावे असे मत व्यक्त केले. प्राचार्य संतोष मेतगे यांनी डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकुन राष्ट्र निर्मीतीचे कार्य शिक्षक करतात. असे मनोगत व्यक्त केले. तसेच प्रा माधव सोनहिवरे व प्रा.कविता ताडके यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. राजीव गांधी इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटेक्निक तंत्रनिकेतन महाविद्यालय यावर्षीचा उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार प्रा. के.डी. ताडके यांना देण्यात आला. यावेळी संतोष चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले तर करण आडे, नागेश तुपकर यांनी आभार व्यक्त केले. संस्थेचे अध्यक्ष भिमाशंकर बावगे, संचालिका माधुरी बावगे, प्राचार्य संतोष मेतगे, उपप्राचार्या योगीता मेतगे-बावगे, आय टी आय प्राचार्य एम.जी. सोनहिवरे सर्व विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



### शास्त्री शाळेत डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन जयंती साजरी

**उदगीर, दि. ६ सप्टेंबर-**

येथील भारतीय शिक्षण प्रसारक संस्था,अंबाजोगाई द्वारा संचलित लालबहादूर शास्त्री प्राथमिक शाळेत डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस शिक्षक दिन म्हणून व महानुभव पंथाचे संस्थापक श्री चक्रधर स्वामी यांचा अवतार दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून शालेय समितीचे अध्यक्ष व्यंकटराव गुरुमे तर,प्रमुख मार्गदर्शक म्हणून अभ्यासपूरक मंडळ प्रमुख माधव केंद्रे, ज्येष्ठ शिक्षिका सविता बोंडगे, विभाग प्रमुख सुधाकर पोलावार व श्रीमती सुरेखा कुलकर्णी उपस्थित होते. मुख्याध्यापक अंकुश मिरगुडे यांची विशेष उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ चा शाळेतील आदर्श शिक्षिका म्हणून ज्येष्ठ शिक्षिका सविता बोंडगेबाई व श्रीदेवी कबाडेबाई यांना मान मिळाला. शालेय समिती अध्यक्ष व्यंकटराव गुरमे, मुख्याध्यापक अंकुश मिरगुडे व व्यासपीठावरील मान्यवरांच्या यावेळी सत्कार करण्यात आला. अध्यक्षीय भाषणात शालेय समिती अध्यक्ष व्यंकटराव गुरमे यांनी केले. स्वागत व परिचय देवक काळे, सुनिता कांबळे यांनी केले. प्रास्ताविक सुरेखा कुलकर्णी यांनी केले. सूत्रसंचालन देवकबाई काळे, आभार मंजुषा पेन्सलवार यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता कल्याण मंत्राने झाली.



### शिक्षक दिनानिमित्त सेवानिवृत्ती शिक्षक गोविंदराव कुलकर्णी यांचा सत्कार

**शिरुर अनंतपाळ, दि. ६ सप्टेंबर-**

येरोळ (ता. शिरुर अनंतपाळ) येथील सेवानिवृत्त माजी शिक्षक गोविंदराव कुलकर्णी यांचा परिवारासह शिक्षक दिनी शाळा व ग्रामस्थांच्या वतीने सत्कार, सन्मान करण्यात आला. शिक्षक दिनी पूर्व राष्ट्रपती डॉ. राधाकृष्ण सर्वपल्ली यांच्या प्रतिमेचे पूजन सेवानिवृत्त शिक्षक गोविंदराव कुलकर्णी यांच्या हस्ते पूजन करून अभिवादन करण्यात आले. माजी सेवानिवृत्त शिक्षक गोविंदराव कुलकर्णी हे येथील शाळेला गेली तीन वर्षापासून स्वतःच्या पेन्शनमधून गरजू विद्यार्थ्यांना १५ ऑगस्टला शैक्षणिक साहित्य भेट म्हणून देत आहेत. यानिमित्त शाळेतील सर्व शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी शिवानंद भुसारे, प्रा. प्रभाकर चोचंडे, प्रभाकर बरदाळे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी मुख्याध्यापक धर्मपाल निचळे,शालेय समिती अध्यक्ष तानाजी दाडगे, पत्रकार शिवानंद भुसारे, वसंतराव पाटील, प्रभाकर चोचंडे, प्रभाकर बरदाळे, अमर माडजे पाटील, विजयकुमार माकणे, नितीन झाबरे, शिक्षक हामीद शेख, टी. डी. बिरादार, एम. एस. बिरादार, प्रकाश नागटिळक, यांच्यासह शिक्षक पालक विद्यार्थी उपस्थित होते.

## दरवर्षी एक हजार मराठा उद्योजक निर्माण करणार

### नरेंद्र पाटील; औसा मतदारसंघात मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**औसा, दि.६ सप्टेंबर-**

महामंडळाचा अध्यक्ष म्हणून मराठा समाजाला सर्वाधिक न्याय मिळवून देण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केला. यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठा समाजातील गोरगरीब तरुणांना उद्योग उभे करण्यासाठी साथ दिली.त्यामुळे राज्यात एक लाख मराठा युवकांना उद्योग करण्याची स्वप्नपूर्ती पूर्ण झाली आहे. आता जिल्हास्तरावर दहा हजार उद्योग उभे करण्याचा महामंडळाचा मानस असून यामध्ये औसा तालुक्यात दरवर्षी एक हजार मराठा तरुणांना उद्योगक करण्याची ग्वाही अण्णासाहेब आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी दिली आहे.

औसा मतदारसंघातील लाभार्थ्यांचा व लाभासाठी इच्छुक असलेल्यांचा मेळावा औसा येथे आयोजीत करण्यात आला होता. त्यावेळी अध्यक्ष पाटील बोलत होते. आमदार अभिमन्यू पवार, सारथीचे उपजिल्हाधिकारी राहूल जाधव, उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे, तहसीलदार घनश्याम अडसूळ,भाजपचे तालुकाध्यक्ष सुभाष जाधव, सभापती चंद्रशेखर सोनवणे, उपसभापती प्रा भिमाशंकर राचट्टे, संगायो समितीचे अध्यक्ष काकासाहेब मोरे, रोहयो समितीचे अध्यक्ष सदाशिव जोगदंड, मराठा सेवा संघाचे तालुकाध्यक्ष शाम भोसले, जिजाऊ ब्रिगेड श्रीमती माने, सकस मराठा समाजाचे अध्यक्ष प्रदीप मोरे, प्रा विद्याधर कांदे पाटील, उमेश पिंप्रे, गहिनीनाथ दळवे, प्रा सिताराम बापू, प्रशांत पाटील, शिवशाहीर संतोष साळुंके, युवराज बिराजदार, प्रविण कोपरकर, सोनाली गुळबिले यांची प्रमुख उपस्थिती होती.



#### नरेंद्र पाटील यांची उल्लेखनीय कामगिरी : आ. पवार

औसा तालुका भूकंपग्रस्त असून या ठिकाणी दरवर्षी १ हजार उद्योजक निर्माण करण्याचा आपला मानस आहे . अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळातून नरेंद्र पाटील यांनी केलेले काम उल्लेखनीय आहे . मराठा समाजाचे मुले शिकले पाहिजेत त्यांना नौकऱ्या मिळाल्या पाहिजेत ते उद्योगाक झाले पाहिजेत यासाठी महायुतीच्या सरकारने सातत्याने काम केले जात आहे . तसेच औसा तालुक्यातील मराठा समाजातील तरुणांना मिळावा . यासाठी औसा तहसील कार्यालयात एक स्वतंत्र अधिकाऱ्यांची नेमणूक केली जाईल असे आ. अभिमन्यू पवार यांनी सांगितले.

अध्यक्ष नरेंद्र पाटील म्हणाले , १ लाखाचा टप्पा पार करणे सोपे नव्हते. यासाठी ८ हजार ६०० कोटीचे कर्ज बँकेने देऊन तुमच्यावर विश्वास ठेवला आहे. यामधून ८५० कोटींचे व्याज परतावा देण्यात आला आहे . घेतलेले कर्ज वेळेवर कर्ज फेडत असल्याने मराठा समाजावर बँकांचा विश्वास वाढला आहे. मराठा समाजावर गेल्या अनेक वर्षांपासून कॉंग्रेसने अन्याय केला. महामंडळाच्या स्थापनेनंतर कॉंग्रेसच्या काळात महामंडळाला लूटण्याचे काम त्यावेळी कॉंग्रेसनेच केले आहे.तर उध्दव ठाकरे यांच्या काळात या महामंडळाकडे साधे डोकावूनही पाहिले गेले नाही. त्यानंतर राज्याचे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी काम करताना या महामंडळाला स्वायत्तता देण्यासह खऱ्या अर्थाने न्याय देण्याचे काम केले आहे. असा स्पष्ट खुलासा अण्णासाहेब आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी यावेळी केला. या मेळाव्यात शेतीपूरक किंवा इतर व्यवसाय करु इच्छिणाऱ्या मराठा तरुणांची नोंदणी या मेळाव्यात केली गेली. या मेळाव्यात ६५० तरुणांना लाभ देण्यात आला.

## उत्पादन खर्चावर आधारित शेतमालाला भाव द्या : शिवकुमार नागराळे

### मनसेच्या कँडल मार्च आंदोलनास शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**औसा, दि. ६ सप्टेंबर-**

केंद्र सरकारने शेतमालाला जाहीर केलेला व बाजारात मिळत असलेल्या भावामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडत आहेत. यामुळे उत्पादन खर्चावर आधारित शेतामालाला भाव द्यावा, अशी मागणी मनसेचे जिल्हाध्यक्ष शिवकुमार नागराळे यांनी केली आहे.

औसा तालुक्यातील बिरवली येथे कँडल मार्च आंदोलन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. जिल्हा सचिव धनराज गिरी, तालुकाध्यक्ष मुकेशकुमार देशमाने, संघटकृ महेश बनृसोडे, राजेंद्र कांबळे, जिवन जंगाले, गोविंद चव्हाण उपस्थित होते.

जिल्हाध्यक्ष शिवकुमार नागराळे म्हणाले, निसर्गाच्या असमतोलात शासनाने घेतलेले धोरण शेतकऱ्यांसाठी धोकादायक ठरत आहे. पेरलं तर पिकेल याची ग्यारंटी नाही. हातात आले तर बाजारात हमीभाव मिळत नाही. असे दरवर्षी होत आहे. त्याचप्रमाणे यावर्षी सोयाबीनला केंद्र सरकारने ४,८९२ रुपये क्विंटलला दर जाहीर केला आहे. तर बाजारात ४५०० रुपये पर्यंतचा दर मिळतो आहे. अवघ्या महिनाभरात नवे सोयाबीन बाजारात त्यावेळी बाजारात तीन ते चार हजाराच्या आतून दर मिळणार आहे.



शासनाने खरेदी केंद्र सुरु केली तरी सर्वच शेतकऱ्यांचा माल या केंद्रात खरेदी केला जाऊ शकत नाही. यासाठी विक्री होणाऱ्या कृषी बाजार समितीत हमी भावापेक्षा कमी दराने होणारी विक्री बंद करावी. अन्यथा बाजारात विकलेल्या शेतकऱ्यांना हमीभावातील तफावत थेट खात्यावर द्यावी, अशी मागणी जिल्हाध्यक्ष नागराळे यांनी यावेळी केली.


यावेळी मनसेच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या कँडल मार्च आंदोलनात गावातील ५०० हून अधिक शेतकऱ्यांनी सहभागी होत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. ग्रामपंचायत सदस्य तथा माजी सैनिक बालाजी पवार यांनी मनसेत प्रवेश केला. सुरेश चव्हाण, विकास लांडगे, नवनाथ माचवे, अतिक सय्यद, अनंत भिसे, नवनाथ माचवे, युवराज आळणे, प्रवीण कठारे, समाधान फुटाणे, विवेक मावरकर, अमोल थोरात, तानाजी गरड,अनिल गुळवे, ज्ञानेश्वर गरड, नवनाथ कुंभार, देवानंद आळणे, संतोष कुंभार, नितीन गरड, धनराज चिखले उपस्थित होते.

## भाजपाचे देवीदास काळे यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. ६ सप्टेंबर-**

भाजपचे लातूर शहर जिल्हाध्यक्ष देवीदास काळे यांचा वाढदिवस आज ५ सप्टेंबर रोजी लातूर शहरातील विविध भागात विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला.

काळे यांनी मातोश्री आश्रमाला भेट देवून तेथील वृद्धांसोबत अल्पोपहार घेवून त्यांचे आर्शिवाद घेतले. विविध मंदिरात काळे यांच्या हस्ते पूजा करण्यात आली. शासकीय रुग्णालयातील रुग्णांना फळे वाटप करून रुग्णांच्या नातेवाईकांना अन्नदान करण्यात आले. प्रभाग १ मध्ये विकास कामांचा शुभारंभ करण्यात आला. महात्मा गांधी चौकात वृक्षारोपण, कातपूर रोड येथील मतिमंद विद्यार्थ्यांना फळे व खाऊ वाटप करण्यात आले.



रामलिंगेश्वर मंदिरात मुख्य अभिष्टचिंतन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. तसेच विशेष म्हणजे देवीदास काळे यांच्या हस्ते महिलांना इ श्रम कार्ड वाटप करण्यात आले. यावेळी भाजपचे माजी खासदार डॉ. सुनिल गायकवाड, भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष ॲड. गणेश गोमचळे, आबाजी चौगुले, माजी उपमहापौर दिपक सूळ, माजी नगरसेवक रवी सूडे, सरचिटणीस शिरीष कुलकण, प्रवीण कस्तुरे, मीनाताई भोसले, रागिणीयादव, गोपाळ वांगे, अजय भूमकर, चंद्रकांत खटके , संजय गिर , ललित तोष्णीवाल, अभिजीत मुनाळे, राहुल भुतडा, संतोष तिवारी, आबेद सय्यद, व्यंकटेश सरवदे, बालाजी मारकडे, राजकुमार गोजमगुंडे, बाबा कांबळे, भरत लोंढे राजकुमार सोनवणे यांच्या वतीने देवीदास काळे यांना शुभेच्छा देण्यात आल्या.



## गुरुदेव विरजानंद दंडी जिवन गौरव पुरस्काराने मुख्याध्यापक बाबुराव पेठे सन्मानित

**तभा वृत्तसेवा,**
**शिरूर अनंतपाळ, दि. ६ सप्टेंबर-**

शिरूर अनंतपाळ तालुक्यातील थेरगाव येथील आदर्श मुख्याध्यापक बाबुराव ग्यानोबा पेठे यांना शिक्षक दिनानिमित्त हिंदू स्वाभिमान प्रतिष्ठान पुणेच्या वतीने देण्यात येणारा यंदाचा गुरुदेव विरजानंद दंडी जिवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

यावेळी माजी आमदार बब्रुवान खंदाडे, प्रमुख वक्ते राहुल सोलापूरकर (सुप्रसिध्द सिने अभिनेते) प्रमुख पाहुणे माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे, माजी मुख्याध्यापक प्रभाकर कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती. सूत्रसंचालन सतीश हानेगावे यांनी केले तर आभार हिंदू स्वाभिमान प्रतिष्ठानचे सचिव उत्तमराव गोविंदराव दंडीमे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी कृष्णकुमार गोयल (अध्यक्ष) हिंदु स्वाभिमान प्रतिष्ठान पुणे, राजाभाऊ गोलांडे (उपाध्यक्ष), उत्तमराव दंडीमे (सचिव) हिंदू स्वाभिमान प्रतिष्ठानचे सर्व संचालक मंडळ यांनी प्रयत्न केले

## तरुणांना स्थैर्य देण्यासाठी सन्मान यात्रेत सहभागी व्हा

### आचार्य गुरुराज स्वामी; वीरशैव लिंगायत सन्मान संवाद यात्रा सोहळ्याचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**अहमदपूर, दि. ६ सप्टेंबर-**

वीरशैव लिंगायत समाज हा प्रामाणिक, कष्टाळू, स्वाभिमानी, निर्वेशनी, चारित्र्यसंपन्न असून सर्वच क्षेत्रांमध्ये अग्रगण्य समाज आहे . परंतु राजकीय पटलावर तो काजव्याप्रमाणे दिसत आहे त्यामुळे समाजाचे संघटनीकरण आणि नव तरुण तरूणीना दिशा व त्यांच्या हाताला सर्वतोपरी काम देण्याच्या हेतूनेच वीरशैव लिंगायत सन्मान संवाद यात्रेत तरुण तरुणींनी व समाज बांधवांनी संवाद यात्रेचे प्रमुख खासदार डॉक्टर अजित गोपछडे यांना बळ द्या असे आग्रही प्रतिपादन भक्ती स्थळाचे प्रमुख आचार्य गुरुराज स्वामी यांनी केले.

ते वीरशैव लिंगायत सन्मान संवाद यात्रा सोहळ्याच्या शुभारंभ प्रसंगी भक्ती स्थळ येथे आयोजित कार्यक्रमात आशीर्वचन प्रसंगी बोलत होते.



यावेळी व्यासपीठावर प. पू. गुरुपादेश्वर शिवाचार्य महाराज गिरगावकर, प पू डॉ वीरपाक्ष शिवाचार्य महाराज मुखेडकर, सन्मान संवाद यात्रेचे प्रमुख राज्यसभेचे खासदार डॉ. अजित गोपछडे, भाजपा च्या अर्चनाताई पाटील चाकूरकर, प्रदेश उपाध्यक्ष बसवराज पाटील कोळखेडकर,भाजपाचे माजी जिल्हाध्य गुरुनाथ मगे, संयोजक नितीन शेटे, राष्ट्रीय जंगम संघटनेचे अध्यक्ष श्रावण जंगम, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष बालाजी पाटील चाकूरकर, भाजपा उद्योग आघाडीचे प्रांत संयोजक अमरनाथ खुरपे, सिनेट सदस्य ॲड. युवराज पाटील, राजाभाऊ मजगे, ओमभाऊ पुणे, शिवशंकर धुपे यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.

प्रास्ताविक राजकुमार मजगे, सूत्रसंचालन राम तत्तापुरे यांनी तर आभार प्रा. प्रताप पाटील यांनी मानले.यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा त्यात किर्तन केसरी शिभप भगवंतराव बाबा पाटील चाभरगेकर, डॉ. ऋषिकेश पाटील, उमाकांत कासनाळे, महाराष्ट्र शासनाच्या क्रांतीज्योती सावित्रीबाई आदर्श शिक्षक पुरस्कार विजेत्या आशा रोडगे- तत्तापुरे, सामाजिक कार्यकर्ते सहदेव होनाळे, वीरभद्र गंगाधर शेळके आणि चाकूर तालुक्यातून शिभप चंद्रकांत स्वामी महाराज, चापोलीचे तंटामुक्तीचे अध्यक्ष प्रभूप्पा होनराव, उद्योजक शिवकुमार होळदांडगे, उद्योजक माधवराव हाळे, सामाजिक कार्यकर्ते विश्वनाथ पाटील यांचा खासदार डॉ. अजित गोपछडे यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. संवाद यात्रा यशस्वी करण्यासाठी ॲड. निखिल कासनाळे, अभय मिरकले, रवि महाजन, संदीप चौधरी,प्रा विश्वंभर स्वामी शिवकुमार उटगे, राजकुमार कल्याणे, प्रा.धीरज शेटकार, अक्षय काडवादे, प्रशांत बिबराळे, गणेश शेटकार, शंकर भुरे यांनी परिश्रम घेतले.

## लिंगायत वधू-वर मेळाव्यानिमित्त रविवारी लातुरात बैठक

**लातूर, दि. ६ सप्टेंबर-**

लिंगायत महासंघ शाखा उदगीरच्यावतीने रविवार दिनांक २९ सप्टेंबर रोजी रघुकूल मंगल कार्यालय, उदगीर येथे वीरशैव लिंगायत समाजाचा ६ वा. राज्यव्यापी वधू-वर परिचय मेळावा आयोजित करण्यात आला आहे. त्यानिमित्ताने रविवार दि.८ सप्टेंबर रोजी पत्रकार भवन तहसील कार्यालयाशेजारी लातूर येथे सकाळी ११ वाजता नियोजनाची बैठक बोलावण्यात आली असल्याचे लिंगायत महासंघाचे प्रदेश सरचिटणीस चंद्रकांत कालापाटील यांनी सांगितले आहे.

या बैठकीत लातूर शहरात नाव नोंदणी सुरू करणे, तसेच सर्व तालुक्याला नाव नोंदणीसाठी प्रतिनिधी नेमणे तसेच प्रमुख पाहुणे ठरविणे, तसेच लिंगायत महासंघाचे मुखपत्र म्हणून सुप्रभात वैभव या साप्ताहिकाचा शुभारंभ करणे तसेच अन्य बाबींवर चर्चा होणार आहे. या बैठकीला मार्गदर्शन करण्यासाठी लिंगायत महासंघाचे प्रांताध्यक्ष प्रा.सुदर्शनराव बिरादार, प्रदेश सरचिटणीस चंद्रकांत कालापाटील, जिल्हाध्यक्ष करिबसवेश्वर पाटील, जिल्हा संघटक काशिनाथ मोरखंडे, जिल्हा सरचिटणीस चंद्रकांत तोळमारे, लातूर शहराध्यक्ष शिवदास बुलबुले उपस्थित राहणार असल्याचे लिंगायत महासंघाचे प्रदेश सरचिटणीस चंद्रकांत कालापाटील यांनी सांगितले.